ब्रह्मानंद देशपांडे

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २९६५

# ३ शोध निबंध

REFBK-0023731

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

( क्रू. मा. प. )
५०००-१२-८२

संदर्भ निबंध
२९६५
23739
१२।१।८३

# तीन शोधनिबंध

ब्रह्मानंद देशपांडे

REFBK-0023731

**तीन शोधनिबंध**

ब्रह्मानंद देशपांडे

□

© अंबरीष देशपांडे

□

**सौ. यमुना देसाई**
**परिचय प्रकाशन**
औरंगपुरा
औरंगाबाद ४३१ ००१.

□

जयहिंद प्रिंटिंग प्रेस
सन्मित्र कॉलनी
औरंगाबाद ४३१ ००१.

□

**मूल्य : २१ रुपये**

□

मुखपृष्ठ : पंढरीनाथ सासमकर



**गुरुवर्य कुरुंदकर सर**

आदरणीय सर,
या ग्रंथाची प्रस्तावना लिहिण्याचे
आपण मान्य केले होते. पण
त्या आधीच सर्व सोडून निघून
गेलात.
हा ग्रंथ
तुमच्या स्मृतीस
अर्पण करताना
मन होरपळून निघत आहे.

— ब्रह्मानंद देशपांडे

## वंदनीय आणि स्नेहशील

पुजनीय महंत श्री नागराजबाबा

पुजनीय महंत श्री बीडकर बाबा, सातारा.

पुजनीय महंत श्री गोपीराज बावा, ऋद्धिपुर.

माननीय योगीराजशास्त्री कपाटे

पुजनीय श्री धुंडिराजबाबा पाटंगणकर, बीड.

माननीय उमाकांतबुवा गोसावी, बीड.

मा. देविसिंहजी चौहान

मा. डॉ. यू. म. पठाण

माननीय दत्तात्रेयरावजी शिऊरकर, न्यायाधीश, सहकार न्यायालय, औरंगाबाद.

श्री. रा. रा. कमलाकररावजी देशपांडे

श्री. रा. रा. कमलाकररावजी काळे

अ‍ॅड. प्रेमानंदजी माळवे, प्रा. सुधाकर लखपती

कु. उषा हस्तक, श्री. प्रभाकररावजी भालेराव, सौ. मीनाक्षी कानडे,

श्री. रंगय्या, शेख लतीफ.

## अनुक्रम


| | |
|---|---|
| एकनाथ महाराजांची गुरुपरंपरा | एक ते सदतीस |
| राजमठाचे नसलेले रहस्य | अडोतीस ते अडुसष्ट |
| चांगदेव राउळ–एक चिंतन | एकोणसत्तर ते एकशेतीन |
| ग्रंथ संदर्भ | एकशे तीन ते एकशे दहा |

# ग्रंथ लिहिण्यास कारण की ....

'तीन शोधनिबंध' मधील तिन्ही लेख खंडणपर आहेत. हे खंडणपर लेख लिहिण्यामागचा हेतू कुणाशी वाद उकरून काढावा असा नाही. हा सगळा वाद कुणा एका विशिष्ट व्यक्तीविरुद्ध अथवा मतप्रणालीविरुद्ध नसून गेल्या काही वर्षांत मराठी साहित्य संशोधन क्षेत्रात ज्या अपप्रवृत्ती निर्माण होऊ लागल्या आहेत त्यांच्याविरुद्ध आहे.

उपलब्ध पुराव्यांचा कालानुक्रम न तपासणे, त्यांच्या सत्यासत्यतेचा कस न ठरविणे, ते पुरावे परस्परविसंगत आहेत यांचीही छाननी न करणे, त्यांच्या आधारावर तकलादू अनुमाने काढणे, त्या अनुमानांना बेमालूमपणे सिद्धांतांचे स्वरूप देत संशोधनाचे इमले उठविणे अशीही विचित्र शोध पद्धती आहे.

पण ह्याही गोष्टीविषयी आमचा फारसा कटाक्ष नाही. कमी अधिक प्रमाणात ह्या चुका सर्वच अभ्यासकांच्या हातून घडतात. काही अपसिद्धांत निर्माण होतात. पण विरोधी जाणारा पुरावा पुढे येताच खरा अभ्यासक त्याला सामोरा जातो. वादाची धूमाळी माजते. सत्यासत्यतेच्या ह्या कसोटीला आतापर्यंत कुणी बाद ठरविले नव्हते.

पण आपल्या सिद्धांतांच्या विरोधी जाणाऱ्या पुराव्यांची वा लिखाणाची दखलच न घेणे, ते पुरावे नोंदविणाऱ्या अभ्यासकांना 'संस्कृतीपूजक', 'प्रतिगामी' अशा शेलक्या विशेषणांचा आहेर करणे, आपलेच चुकीचे आणि अफलातून सिद्धांत पुन्हा पुन्हा मांडीत राहणे, आपल्या विरोधी लिखाण झालेच नाही असा डौल घालीत हळूवार, भावनाशील, शोधवेडया संशोधकाचा पायघोळ वेश धारण करणे हे आतापर्यंत कधी घडले नव्हते. आमचा वाद ह्या प्रवृत्ती-विषयी आहे.

मराठी साहित्य संशोधनाच्या क्षेत्रात या नवीन संशोधनाच्या विरोधी जाणाऱ्या पुराव्यांची नोद करणे इतकाच मर्यादित हेतू या लिखाणामागे आहे.

परिचय प्रकाशनाच्या सौ. यमुनाबाई देसाई, जयहिंद प्रिंटिंग प्रेसचा कर्मचारी वर्ग आणि आमचे मित्र चित्रकार पंढरीनाथ सासमकर यांच्या सहकार्याचे ऋण मानावे तेव्हडे थोडेच.

पिनाक–फणी–बालेन्दु–भस्म–मंदाकिनीयुता ।
पवर्ग–रचिता–मूर्ती अपवर्गप्रदायिनी ।
हे वाग्मयङ्पुष्प श्रीघृष्णेश चरणी अर्पण ।

**– ब्रह्मानंद देशपांडे**

महाशिवरात्र, शके १९०३
सोमवार २२ फेब्रुवारी १९८२

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२८६५
अ. क्र. 23039
शाखा (स्थळ

# एकनाथांची गुरुपरंपरा

## १. महाराष्ट्र–महोदयाचा अग्रदूत :

श्रीएकनाथमहाराजांचे मराठी साहित्यातले स्थान एकमेवाद्वितीय आहे. भागवतधर्माच्या मंदिराचा ते एक भक्कम असा आधारस्तंभ आहेत. त्यांचे जीवन आणि साहित्य सर्वस्पर्शी आणि मानवतावादाच्या उत्कट भावनेने भारलेले असे आहे. त्यांचा जन्मही अशा काळात झाला की जो काळ मराठी वाङ्मयाच्या इतिहासात अंधःकारयुग म्हणून ओळखला जात होता. पण स्वतःच्या ग्रंथकर्तृत्वाने त्यांनी हे अंधःकारयुग उजळून टाकले.

चतुःश्लोकी भागवत, हस्तामलक, स्वात्मसुख, आनंदलहरी, चिरंजीवपद, अनुभवामृत, शुकाष्टक, आनंदानुभव, एकादश स्कंधावरची प्रचंड टीका, भावार्थ रामायण हा अपूर्व ग्रंथ या प्रमुख आणि गुणवत्ताशाली ग्रंथकर्तृत्वाशिवाय अक्षरशः अनेक पदे व गौळणी, भारुडे, अभंग, आरत्या असा हा नाथमहाराजांचा प्रचंड ग्रंथसंभार आहे. या सर्वांमधून बहुजनसमाजाच्या उत्थानाविषयी त्यांची तळमळ, स्वधर्माचा तीव्र अभिमान, प्रगाढ ज्ञान, सूक्ष्म निरीक्षण, अर्थगंभीर भावमधुर रचना हे श्रीनाथांचे काव्यगुण प्रकर्षाने प्रकट होतात. अशा ह्या महानुभावाच्या चरित्राचे आणि साहित्याचे अनुशीलन महाराष्ट्राला सदैव लाभदायकच ठरेल. महाराष्ट्र–महोदयाचा हा अग्रदूत संशोधकांच्या, टीकाकारांच्या आणि इतिहासज्ञांच्या अभ्यासाचा गंभीर विषय व्हावयास हवा. तसेच त्यांच्या बोधसरितेच्या उगमाचे–गुरुपरंपरेचेही–शास्त्रशुद्ध अध्ययन व्हावयास हवे आणि म्हणूनच आम्ही ह्या उपक्रमास आज प्रवृत्त झालो आहोत.

## २. श्रीएकनाथ महाराजांची गुरुपरंपरा :

श्रीएकनाथ महाराजांची गुरुपरंपरा सर्वप्रसिद्ध आणि सुविख्यात आहे. ती 'नारायण–विधी–अत्रिनाथ । दत्त–जनार्दन–एकनाथ' ह्या लोकप्रिय भजनात रूढही झाली आहे. पैठण शहरी श्री एकनाथ महाराजांच्या वंशजातही 'दत्त–जनार्दन–एकनाथ हीच गुरुपरंपरा सांगितली जाते, मानली जाते आणि कीर्तन–भोजन प्रसंगी उद्घोषिली जाते.

श्रीजनार्दनस्वामी हे प्रख्यात दत्तोपासक संत होते. निजामशाही काळात ते देवगिरी-दौलताबादच्या किल्ल्याचे किल्लेदार होते. ते शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन ब्राह्मण असून त्यांचा जन्म चाळीसगाव–खानदेश येथील देशपांडे घराण्यात झाला होता. त्यांना श्री दत्तात्रेयांचा साक्षात्कार होता आणि उपदेशही लाभला होता. अशा अधिकारी पुरुषाचे शिष्यत्व श्री एकनाथ महाराजांना लाभले आणि त्यांनी आपल्या गुरुचे नाव अजरामर केले ही गोष्ट सर्व महाराष्ट्राला सुपरिचित आहे.

परंतु अलीकडेच श्री एकनाथांच्या ह्या गुरुपरंपरेविषयी नवीन माहिती उजेडात आली आहे. ती या प्रचलित मताला धक्का देणारी आहे. तिच्याच सत्यासत्यतेचा कस या लेखात तपासायचा आहे.

## ३. एकनाथांच्या गुरुपरंपरेविषयी नवी माहिती :

नाथांच्या गुरुपरंपरेविषयी नवी माहिती उजेडात आणण्याचे श्रेय श्री. वासुदेव सीताराम बेंद्रे यांना आहे. श्रीगोंदे अथवा चांभारगोंदे येथील प्रख्यात मुस्लीम संत श्री शेखमहंमद बाबा यांचा 'योगसंग्राम' त्यांनी संपादित केला आहे. या ग्रंथाला जोडलेल्या प्रस्तावनेत त्यांनी ही नवीन माहिती प्रथम उजेडात आणली.

शेख महंमदबाबा श्रीगोंदेकर हे प्रख्यात मुसलमान संत होऊन गेले. त्यांचा 'योगसंग्राम' हा अठरा प्रसंगांचा (अध्यायांचा) ग्रंथ, 'पवनविजय' ह्या नावाचा दुसरा ग्रंथ आणि इतर काही फुटकर रचना प्रख्यात आहेत. महाराष्ट्र–संतमंडळात शेख महंमद ह्यांना चांगला मान आहे. 'ज्ञान्याचा एका, नाम्याचा तुका आणि कबीराचा शेखा' हे वचन प्रसिद्ध आहे. शेख महंमद ह्यांचे योगसंग्राम, पवनविजय आदी ग्रंथ पूर्वी प्रकाशित झाले होतेच. परंतु ऐतिहासिक कागदपत्रे आणि विस्तृत विवेचन ह्यांची जोड देऊन त्यांचे नीट

संपादन प्रथम श्री. वेंद्रे ह्यांनीच केले. यांत त्यांनी शेख महंमदाविषयी दिलेली माहिती आणि नाथांच्या गुरुपरंपरेशी त्यांचा आलेला संबंध यांचे वर्णन पुढे देत आहे.

शेख महंमद यांचे वडील राजे महंमद. आईचे नाव पुल्हलेशा अथवा फुलाई. यांचा जन्म केज– धारूर कडे झाला. राजे महंमद हे सुफींच्या कादिरी शाखेपैकी होते. सुफींच्या भारतात चार प्रमुख शाखा आहेत. त्यांची नावे कादिरी, सुऱ्हावर्दी, चिश्ती आणि नक्शबंदी अशी आहेत. यापैकी कादिरी शाखेत महंमद गौस कादिरी हा प्रख्यात पुरुष झाला. हा इ. स. १४२८ मध्ये भारतात आला. इ. स. १५१७ त मरण पावला. ह्याला सिकंदरशहा ह्या लोदी घराण्यातील सुलतानाने आपली मुलगी दिली होती. ह्याचा शिष्य म्हणजेच शेख महंमदाचा बाप राजे महंमद आणि राजे महंमदाचा शिष्य म्हणजेच सय्यद चांद कादिरी हा होय. म्हणजेच ह्या कादिरी शाखेची गुरुपरंपरा अशी मांडता येईल.

सय्यद महंमद गौस कादिरी
( भारतात वास्तव्य इ. स. १४२८ ते १५१७ )
|
राजे महंमद
( शेख महंमदाचा पिता )
|
सय्यद चांद साहेब कादिरी
|
शेख महंमदबाबा श्रीगोंदेकर

अशी ही शिष्यपरंपरा 'शिजरा– जदि – कादिरी' ह्या शेख महंमदबाबाच्या मठातील बाडावरून कळते. [१]

स्वतः शेख महंमद बाबा श्रीगोंदेकर आपल्या 'योगसंग्राम' ह्या विख्यात ग्रंथाच्या पंधराव्या प्रसंगाचा ( अध्यायाचा ) प्रारंभ पुढील प्रमाणे करतात.

ॐ नमोजी सद्गुरू चांदबोधले
त्यांनी जानोपंता अंगिकारले ।
जानोबाने एका उपदेशिले
ऐक्यत्त्व गुणे ॥१५, १॥ [२]

अर्थात् कादिरींची विस्तृत शिष्यपरंपरा आता अशी होईल.

सय्यद महंमद गौस कादिरी
|
सय्यद राजे महंमद
|
सय्यद चांद साहेब कादिरी
|
- शेख महंमद
- जनार्दन
  - एकनाथ

ही झाली ' योगसंग्राम ' ह्या ग्रंथावरून कळून येणारी माहिती. पण ही परंपरा बळकटपणे सिद्ध करण्यासाठी श्री. वा. सी. बेंद्रे ह्यांनी पुढील आधार नोंदविले आहेत.

१. चतु:श्लोकी भागवत श्रीएकनाथांना प्राप्त होण्याविषयीचे एकनाथांचे स्वत:चे विवेचन.

२. दत्तात्रेयाचे श्रीजनार्दनस्वामी आणि एकनाथांना मलंगवेशात दर्शन.

३. इतर सांप्रदायिक उल्लेख.

श्री. बेंद्रे यांनी नोंदविलेली माहिती शक्यतो विस्ताराने पुढे दिली आहे.

## ४. श्री. बेंद्रे यांचे विवेचन :

अ. चतु:श्लोकी भागवताचे शेवटी श्रीएकनाथ महाराजांनी आपणास चतु:श्लोकी भागवत कसे प्राप्त झाले हे सांगितले आहे. गुरुपदेशानंतर तीर्थयात्रा करीत भ्रमण करीत असता श्रीएकनाथ आणि जनार्दनस्वामी नासिक–जवळील चंद्रावती नगरीस प्राप्त झाले. तेथे ते चंद्रभट नामक ब्राह्मणाचे घरी वसतीसाठी राहिले. त्या चंद्रभट नावाच्या ब्राह्मणाने चतु:श्लोकी भागवतावर निरूपण केले. ते ह्या गुरुशिष्यांना ऐकावयास मिळाले. ते ऐकून श्रीजनार्दनस्वामी प्रफुल्लित झाले. आणि त्यांनी एकनाथ महाराजांना ते ' गुह्यज्ञान ' मराठीत आणण्याची आज्ञा केली.

हा चतु:श्लोकी भागवतावर संस्कृतातून निरूपण करणारा चंद्रभट ब्राह्मण म्हणजेच सय्यद चांद कादिरी अथवा चांद बोधले असे बेंद्रे सांगतात.

ब. नाथांचे पारंपरिक चरित्रकार तीन १. केशव २. महिपती आणि ३. नव्याने पुढे आलेला कृष्णदास जगदानंदनंदन. हे तिघेही दत्तात्रेयाने जनार्दन-

एकनाथ ह्यांना मलंगवेषाने दर्शन दिले, कुत्रीचे दूध काढून तो प्रसाद जनार्दन-एकनाथ ह्यांना दिला नाथांनी तो अव्हेरला असे सांगतात. स्वतः शेख महंमदाच्या अभंगातही ह्या घटनांचे वर्णन

त्रिपदा पिळिली कुत्री पान्हायेली
उच्छिष्ट कृपा लाधली जानोबासी [३]

असे आले आहे.

पैठणचे प्रख्यात संत श्री कृष्णदयार्णवांनीही 'नाथांनी एका यवन साधूला जेऊ घातले म्हणून पैठणस्थ ब्राह्मणांनी त्यास वाळीत टाकले' अशी कथा दिली आहे. हा मलंग अथवा फकीर किंवा यवनवेषधारी साधू म्हणजेच चांद कादिरी अथवा चांद बोधले असे श्री. बेंद्रे यांचे मत आहे.

एकनाथांचे शिष्य मुकुंदराज, नाथांचेच पणतू शिवराम स्वामी कल्याणीकर, देवनाथ मठातील पारंपरिक माहिती ह्या मताला दुजोरा देणारी आहे. तेव्हा श्रीजनार्दन स्वामींचे गुरू दत्तात्रय नसून सूफी संप्रदायी सय्यद चांद कादिरी होते असे ठरते. श्री. वा. सी. बेंद्रे यांचे हे प्रतिपादन येथे शक्य त्या विस्ताराने नोंदविले आहे.

## ५. डॉ. रा. चिं ढेरे ह्यांचे विवेचन :

याच मताचा पाठपुरावा प्रसिद्ध संतवाङमय-संशोधक श्री. ( आता डॉक्टर ) रामचंद्र ढेरे ह्यांनी केला आहे. आणि त्यात बेंद्रे ह्यांच्या मतास पूर्ण मान्यता देऊन काही नवीन पुरावे आणि स्पष्टीकरणे देण्याचा प्रयत्न केला आहे.

श्री. बेंद्रे ह्यांचे मत पूर्णपणे मान्य करून डॉ. ढेरे ह्यांनी गंगानाथ मठ-परंपरा आणि कृष्णदास जगदानंदनंदन ह्या कवीच्या प्रतिष्ठानचरित्र (एकनाथ चरित्र ) यांतील माहिती नोंदविली आहे.[४] चंद्रभट चांदबोधले हेच मूळ चंद्रभट ब्राह्मण. ते कालान्तराने सूफी झाले.[५] असे सांगून नाथांच्या रचनेवरचा सूफी प्रभाव मान्य केला आहे. परंतु सूफी हे हिंदुधर्मासहिष्णू आणि मंदिरविध्वं-सक असल्यामुळे नाथ आपली गुरुपरंपरा स्पष्टपणे सांगत नाहीत[६] उलट मुसल-मानांवर चिडून प्रहार करतात. नाथांच्या ह्या सत्यापलापामागे त्यांचे सनातनी मन उभे आहे. केशव, महीपती हे नाथांचे पारंपरिक चरित्रकार मात्र नाथ-चरित्रातील[७] ही क्रांतीकारी घटना ( परमगुरु मुसलमान सूफी साधू असणे ) सनातनीपणाने झाकाळून टाकतात.[८]

असे डॉ. ढेरे यांचे विवेचन आहे. वाचकांच्या मनात किल्मिष राहू नये म्हणून थोडासा पाल्हाळ करूनच श्री. बेंद्रे आणि डॉ. ढेरे यांचा पूर्वपक्ष विस्ता-राने मांडला आहे. आता त्यांच्या मतांचे परीक्षण करू या.

## ६. चंद्रभट आणि चांदबोधले एक नव्हेत :

नाथांचा प्रथम ग्रंथ म्हणजे चतु:श्लोकी भागवत. हा ग्रंथ त्यांनी जनार्दनस्वामींचे शिष्यत्व पत्करल्यानंतर थोड्याच दिवसात लिहिला. पारंपरिक माहितीनुसार श्रीएकनाथांना गुरूपदेश–प्राप्ती 'खर' नाम संवत्सर फाल्गुन वद्य ६ शके १४६७ या वर्षी झाली. नंतर उभयता गुरु-शिष्य तीर्थयात्रेला निघाले. मार्ग क्रमित असता

गोदावरी उत्तरतीरी । चौ योजनी चंद्रगिरी
श्रीजनार्दन तेथवेरी । दैवयोगी फेरी स्वभावे गेलो ।।१०१८।।
तो अतिदीर्घ चंद्रगिरी । तळी चंद्रावती नगरी
स्वये चंद्रनाम द्विजवरी । वस्ती त्याचे घरी सहज घडली ।।१०१९।।
तेणे चतु:श्लोकी भागवत । वाखाणिले यथार्थ युक्त
तेणे श्रीजनार्दन अद्‌भुत । जाला उत्पुलित स्वानंदे पैं ।।१०२०।।
तेणे स्वानंदे गर्जोन । स्वमुखे स्वये जनार्दन
बोलला अति सुखावून । हे वर्णी गुह्यज्ञान देशभाषा ।।१०२१।।

(श्री एकनाथकृत चतु:श्लोकी भागवत)

ह्याच प्रसंगाचे वर्णन महिपतीने भक्तलीलामृतात केले आहे ते असे

ऐसा पंथ क्रमिता फार । तंव एक ग्राम लागले थोर
ते स्थली चंद्रभट द्विजवर । वैष्णववीर पैं होता ।।[८]

त्याने रात्री चतु:श्लोकी भागवताची व्याख्या केली. ती श्रीजनार्दन आणि एकनाथ ह्यांना आवडली. नंतर हा चंद्रभट ब्राह्मण जनार्दनपंतांबरोबर देवगिरीला आले. आणि

पूर्ण बोध ठसावला जाण । यास्तव पालटे नामाभिधान
चांदबोधला त्याजकारण । सर्वत्र जन बोलती ।। [९]

पुढे ह्याच चंद्रभटास समाधी घेण्याची इच्छा झाली.

त्याची इच्छा जाणोनी पाही । समाधीस बसला विदेही
परी यवन उपद्रव करतील काही । मग एक युक्ती तिही योजिली ।।

... ... ... ... ... ... ...

जैसी अविंधाची मदार जाण । तैसेचि वर रचिले स्थान ।। [१०]

चंद्रभटाविषयी हे दोन्ही उल्लेख पाहिले म्हणजे चंद्रभट आणि चांदबोधले हे एक नव्हत हे तेव्हाच कळून येते.

१. श्री. बेंद्रे आणि श्री. ढेरे ह्यांच्यामताप्रमाणे चांदबोधले हे श्रीजनार्दनस्वामींचे गुरु. अर्थात् स्वामींनी एकनाथांना उपदेश देण्याआधी स्वतःला चांदबोधले ह्यांचा गुरुपदेश झाला असला पाहिजे. अर्थात् श्रीजनार्दन आणि एकनाथ हे द्विवर्ग गुरुशिष्य तीर्थाटनाला निघाले तेव्हा जनार्दनस्वामी आपल्या गुरुला म्हणजे ( बेंद्रे–ढेरे मतानुसार ) चांदबोधले ह्यांना पूर्णपणे ओळखत होते असे म्हणावे लागेल. ( आणि आपल्या गुरुच्याही गुरुचे-परमगुरुचे नाव चंद्रभट, चांदबोधले, चांद कादिरी असे काहीसे आहे हे श्रीएकनाथांना माहीत असण्याची शक्यता गृहीत धरली पाहिजे. ) पण श्रीएकनाथांच्या वरील वर्णनावरून स्पष्ट दिसते की एखाद्या अपरिचित ब्राह्मणाकडे उतरावे त्याप्रमाणे हे उभयता गुरुशिष्य चंद्रभटाच्या घरी उतरले आहेत. महिपतीचीही साक्ष तशीच आहे. चतुःश्लोकी भागवतावरील टीकेतील

श्री जनार्दन तेथवेरी । दैवयोगे फेरी स्वभावे गेलो ।
स्वये चंद्रभट द्विजवरी । वसती त्याचे घरी सहज घडली ॥

ह्या ओव्या आणि महिपतीचा –

तै स्थली चंद्रभट द्विजवर । वैष्णववीर पै होता ॥

हा उल्लेख स्वच्छपणे असे दाखवितात की सहजपणे भ्रमण करीत असता चंद्रभट नामक अपरिचित ब्राह्मणाच्या घरी ते उतरले आहेत.

२. अन्यत्र श्री. बेंद्रे ह्यांनी असाही एक मुद्दा मांडला आहे की स्वतःची गुरुपरंपरा मांडताना श्री एकनाथांनी

आता नमु दत्तात्रेया । जो कां आचार्यांचा आचार्या ॥

असा दत्तात्रेयांचा श्रीकारहीन उल्लेख केला आहे. अर्थात श्रीदत्तात्रेय हे नाथाचे परमगुरु नव्हेत. हे विवेचन जर मान्य केले तर ते श्री. बेंद्रे ह्याच्यावरच उलटणार आहे. कारण चतुःश्लोकी भागवतातील श्रीजनार्दनस्वामी ह्यांच्या नावामागे श्रीकार आहे. पण चंद्रभटाच्या नावामागे तो मुळीच नाही. त्याचा उल्लेख सरळच ( द्विजवर ) 'ब्राह्मण श्रेष्ठ' असा आहे. मग जर दत्तात्रेयाचे नावामागे श्रीकार नाही म्हणून त्यांचे नाथपरमगुरुत्व नाकारायचे तर हा श्रीकारहीन चंद्रभट नाथांचा परमगुरू कसा ?

३. श्री. बेंद्रे ह्यांचे असेही विवेचन आहे की एकनाथी–भागवतातील दत्तात्रेयांचे वन्दन हे कुळगोत्र आणि मातापितरांच्या वंदनानंतर आले आहे. म्हणून दत्तात्रेय हे नाथांचे परमगुरु नव्हेत. हाही मुद्दा श्री. बेंद्रे ह्यांच्यावरच उलटणारा आहे. कारण, जर मग चंद्रभट अथवा चांद बोधले हे नाथांचे परमगुरु समजायचे असतील तर त्यांचा अतिशय कोरडा, श्रीकारहीन उल्लेख चतुःश्लोकी भागवताच्या शेवटून अठराव्या ओवीत आलेला आहे.

४. चंद्रभटाने चतुःश्लोकी भागवताचे जे विवरण केले ते संस्कृत भाषेतून केले असे नाथांच्या वर्णनावरून स्पष्ट आहे. नाथ म्हणतात

तेणें स्वानंदे गर्जोन ।
श्रीमुखे स्वये जनार्दन ।।
बोलिला अति सुखावून
हे वर्णी गुह्यज्ञान देशभाषा ।।१०२१।।
तैं माझी मध्यम अवस्था
नेणे संस्कृत पदपदार्था
बापआज्ञेची सामर्थ्यता
वचने यथार्थ प्रबोध झाला ।।१०२२।।

( श्री एकनाथकृत चतुःश्लोकी भागवत )

अर्थात चंद्रभटाचे चतुःश्लोकी भागवतावरचे प्रवचन विशुद्ध संस्कृतात होते हे स्पष्ट आहे. आणि म्हणूनच चंद्रभट म्हणजे चांद बोधले नव्हत हे स्पष्ट आहे.

५. यावर ढेरे ह्यांनी असे ठोकून दिले आहे की चंद्रभट हे मूळ व्युत्पन्न संस्कृतज्ञ ब्राह्मण पण कालांतराने ते सूफी झाले असावेत. अर्थात् ह्या धर्मांतरासाठी पक्का पुरावा श्री. ढेरे नोंदवित नाहीतच. केवळ 'झाले असावेत' म्हणून वेळ मारून नेतात. महिपतीनेही त्यांचे नाव पालटून चांद बोधले झाले असे ठोकून दिले आहे. त्याचाच अनुवाद श्री. ढेरे ह्यांनी केलेला दिसतो. शिवाय तेच चांदसाहेब कादिरी असे श्री. बेंद्रे ह्यांचे मत आहे. अर्थात नाथांच्या ह्या तथाकथित परमगुरूची नामांतरे झाली ती अशी

चंद्रभट–चांद बोधले–चांद कादिरी.

६. या विवेचनावर आणखी एक आक्षेप असा घेता येईल की, चंद्रभटासारखा भागवतावर अतिशय रसाळ प्रवचन करणारा व्युत्पन्न द्विजवर आणि वैष्णव वीर आयुष्याच्या उत्तरार्धात का होईना सूफी कशासाठी होईल ? तशी शक्यता मनाला पटत नाही.

आपली कल्पना अशी की सूफी हा इस्लाममधील अध्यात्मप्रवण पंथ हिंदुधर्मसहिष्णू अर्थात् हिंदुधर्माला जवळचा असणारा आहे. पण ही कल्पना अज्ञानमूलक आहे. विद्वानांची मते नेमकी उलट आहेत.

अ. सूफीपंथाचे प्रगाढ अभ्यासक चंद्रबली पांडेय म्हणतात. 'सुफीयो में अध्यात्मविकास चाहे जिस ढंगसे हुआ हो उसका चलनेका मार्ग सदैवही इस्लाम रहा है। हम उस तसव्वुफ को तसव्वुफ को भलेही कह ले की जिसमे अल्लाह व रसूल की उपेक्षा हो पर सूफी उसे सच्चा सूफी माननेसे रहे । '[१]

ब. श्री. सेतुमाधवराव पगडी हेच मत मांडतात.

'कट्टर मुस्लीम धर्माचरणाविरुद्ध ठाकणारे बौद्धीक बंडखोर सूफी होत असे श्री. न. र. फाटक यांचे मत आहे. पण वस्तुस्थिती मात्र अगदी उलट आहे सूफींनी 'नमाज,' तिलावत (कुराणपठण), अवराद (विशेष प्रार्थना) नियमीतपणे केल्याच पाहिजे यावर सूफीपंथाचा कटाक्ष आहे. [१२]

अर्थात्, केवळ साधनामार्गात किंचित् साम्य आहे म्हणून सूफी हे हिंदुधर्मसहिष्णू ठरत नाहीत. गजनीच्या महमुदाने आपल्या नाण्यावर

अव्यक्तमेकं ईश्वर : अवतार नृपती महमूद असा संस्कृत लेख कोरला म्हणून तो हिंदूप्रेमी ठरत नाही.

क. उलट सूफी हे हिंदूचे छळक होते. मूर्तिभंजक होते. मुस्लीम आक्रमणाचे अग्रदल (Vanguard) म्हणूनच ते भारतात आणि विशेषत: महाराष्ट्रात आले. महाराष्ट्रात सूफी साधुंचे अनेक दर्गे आहेत. पण सर्वत्र सुफींविषयी ते 'इस्लामवरील संकट दूर करण्यासाठी धावून आले आणि देशी मांडलिक राजांचा पराभव करून, मूर्तींचा आणि मंदिरांचा विध्वंस करून तेथे मशिद वा दर्गा स्थापिते झाले' अशाच कथा सांगितल्या जातात. त्यांची काही ठळक उदाहरणे अशी आहेत सरवर मकदूम (कंधार), अब्दुल अजीज शाहबाबू (पातूर), मुंतजबोद्दीन जर्जरीबक्ष (खुल्दाबाद-औरंगाबाद जिल्हा), मौलाना शरीफ (पैठण), शाह दूलेरहमान (अचलपूर) शाह हयात कलंदर, शाह सुलेमान माही-सवार (कान्होबाची मढी-अहमदनगर जिल्हा). या सर्वच ठिकाणच्या कथा या सूफी संतांचे मूर्तीभंजन आणि हिंदूवरील अत्याचार विस्ताराने सांगतात. [१३]

असे असता चंद्रभटासारखा व्युत्पन्न, संस्कृतज्ञ वैष्णववीर आपला भागवतपंथ सोडून सूफी होईल हे विधान बुद्धीला पटत नाही. त्यासाठी बलवत्तर पुराव्याची आवश्यकता हे सहजच दिसते. तो पुरावा नोंदण्याची जबाबदारी श्री. ढेरे यांच्यावर आहे.

## ७. चांदबोधले म्हणजे दत्तावतारी सत्पुरुष नव्हेत :

श्रीएकनाथांनी अतिशय स्पष्टपणे आपल्या परमगुरुचे नाव श्रीदत्तात्रेय असे सांगितले आहे. परंतु शेख महंमदबाबा श्रीगोंदेकर, शिवरामस्वामी कल्याणीकर, कोणी एक मुकुंदराज नामक कवी आणि गंगानाथ - गोपाळनाथ मठातील परंपरा ह्यांच्यावरून जनार्दनस्वामींच्या गुरुचे नाव चांदबोधले असे निष्पन्न होते आणि म्हणून श्री. ढेरे चांद बोधले म्हणजेच दत्तावतारी सत्पुरुष

असा मेळ घालून दाखवतात आणि कृष्णदास जगदानंदनंदन ह्याच्या ' प्रतिष्ठान चरित्र ' ह्या एकनाथचरित्रपर ग्रंथातून त्याची पुष्टी होते असे मत मांडतात.

आपण ह्या सत्पुरुषांचे लिखाण मुळापासून घेऊन श्री. ढेरे ह्यांच्या मताचे परीक्षण करू.

## अ. शेख महंमदबाबा श्रीगोंदेकर यांची साक्ष :

शेख महंमदबाबांनी आपल्या योगसंग्राम ह्या विख्यात ग्रंथाच्या १५ व्या अध्यायात प्रारंभीच

ॐ नमोजी सद्‌गुरू चांदबोधले
त्यांनी जानोपंता अंगीकारले
जानोबाने एका उपदेशिले
ऐक्यत्व गुणे ।। [१४]

असे चांदबोधले ह्यांच्या चरणी नमन केले आहे. याच ग्रंथात इतरत्र 'तुम्ही महावरिष्ठ दिगंबरू ' (प्रसंग २, ओवी २७), 'सिद्ध अविनाश दिगंबरा' (प्रसंग ३, ओवी १), अशी विशेषणे चांदबोधले यांच्यासाठी वापरली आहेत. आता यात श्रीदत्तात्रेय असा चुकूनही उल्लेख नसता श्री. ढेरे ' दिगंबर ' हे चांदबोधल्यांचे पर्यायनाम त्यांचे दत्तात्रेयाशी ऐक्यत्त्व सूचित करणारे आहे ' असे दडपून लिहिले आहे.

श्रीचांदबोधले हे आपले गुरु दत्तावतारी सत्पुरुष आहेत अशी जर शेख महंमदबाबांची श्रद्धा असती तर ती नोंदवावयास त्यांना कोणती हरकत होती ? तेही ही माहिती एकनाथांप्रमाणेच लपवून सत्यापलाप करतात असे म्हणावे काय ? ते आपल्या गुरुचे नाव पंधराव्या अध्यायापर्यंत सांगत नाहीत यावरून काय समजायचे ? यावर पुढे विवेचन येईलच.

## ब. शिवरामस्वामी कल्याणीकर ह्यांची साक्ष :

शिवरामस्वामी कल्याणीकर हे एका कन्नड वळणाच्या छंदातून गुरु-परंपरा सांगतात ती अशी

मुख्य आदि शिवगुरु दत्तयोगिराज बरवा चंद्रआश्रम या जनीच
जनार्दनू जाण ।
एक नायक तोचि पूर्णानंद होऊनि शिवमुखी प्रकटोनि गीताचंद्रिका
प्रकटी ।। [१५]

अर्थात् शिवरामस्वामी कल्याणीकरांना

शिवगुरु (श्रीशंकर)
|
दत्तयोगीराज
|
चंद्रआश्रम
|
जनार्दन
|
एकनाथ

अशी परंपरा अभिप्रेत दिसते. वास्तविक शिवराम हा आनंदसांप्रदायी असून त्याची गुरुपरंपरा श्रीदत्तात्रेय–सदानंद–रामानंद–निर्मलानंद (विमलानंद),–गंभीरानंद–ब्रह्मानंद–सहजानंद–ब्रह्मानंद–पूर्णानंद (नारायण)–शिवराम अशी आहे.

### क. मुकुंदराज ह्यांची साक्ष :

उत्तम हा ठाव नाव दौलताबाद
तेथ योगिराज चांदबोधले
महा हे प्रतापी पुण्य आणि पवित्र
वसविले क्षेत्र देवगिरी
चंद्रबोधल्यांनी बोधविला बोध
लाधला प्रसाद जनार्दना
जनार्दन म्हणे आलो शरणागत
करावे पुनीत पतितासी
जाला निजलाभ प्रसाद उच्छिष्टाचा
दास हा स्वामीचा जनार्दन
तयाचा अंकित झाला एकनाथ
केले हे सनाथ समर्थांनी
तयाचे कृपेने वसति गंगातीरी
एकनाथे केली योगसमाधी
तयाचा मी दास योगी मुकुंदराज
सांगे निजगुज रामनाथा
आमची परंपरा चंद्र हा बोधला
प्रसाद लाभला आम्हाप्रती

चंद्र बोधला मूळ जनार्दन खोड
शाखा पल्लव गोड एकनाथ
तयाचे हे फळ आम्ही घनदाट
सेविती उत्कृष्ट साधूसंत
मुकुंदराज म्हणे ऐक रामनाथा
वंशावळी कथा सांगितली[१६] ।।

यातूनही चंद्रबोधले–जनार्दन–एकनाथ–मुकुंदराज–रामनाथ ही परंपरा निघते.

**ड. गोपाळनाथ परंपरेची साक्ष :**

नारायणापासूनी वोध झाला
तेणे मुखे तो विधी पूर्ण झाला
त्या पूर्ण बोधासी लिहून पत्री
केला सुखी तो निजपुत्र अत्रि ।।
महाराज दत्तात्रेयाचे कृपेने
पुढे चंद्र बोधासी ऐक्यत्व बाणे
कृपे बोधराजा जनार्दन प्रबोधी
जनार्दन कृपे एकनाथा समाधी[१७] ।।

**इ. गंगानाथ मठातील परंपरेची साक्ष :**

मागे राहिले अनुसंधान
जोशी मठाचे अभिसंधान
दत्तात्रेये केले संबोधन
चांद बोधल्याशी ।।
**चांद बोधले हठयोगी**
**तेणे दत्तात्रेय उपासने लागी**
**यत्न केला तो प्रसंगी**
**सांगता न ये ।।**
अनुष्ठान मंत्र जप
साधने साधली अमूप
ते सांगता वाढेल रोप
वटबीजांचे जैसे ।।
प्रसन्न करुनि श्रीदत्त
उपदेश लाभला असंभूत

अपारा नाथी जगविख्यात
कीर्ति वाढली ।।
तयाचे बोधप्रताप
जनार्दनासि साक्षरूप
त्यांनो बोधले एकनाथा जगदीप
जगामध्ये[१८] ।।

ह्यातून श्रीदत्तात्रेय–चांद बोधले–जनार्दन–एकनाथ अशी परंपरा निघते.

## ८. ह्या परंपरांचे परीक्षण :

वर वर पहाता या सर्व परंपरा बेंद्रे–ढेरे यांच्या मतांची पुष्टी करतांना दिसतात. पण किंचित बारकाईने पहाताच याच परंपरा त्यांच्या मताविरुद्ध जातांना दिसतील.

अ. श्री. बेंद्रे आणि ढेरे यांच्या मताप्रमाणे जनार्दन स्वामींचे गुरु चांदबोधले हे दत्तावतारी सत्पुरुष होते.[१९] शेख महंमदाने आपल्या गुरुला ‘ अविनाश दिगंबरु ’ म्हणताच ढेरे त्यांची पर्यायी नाव दत्त-दिगंबर होते असे ठरवून मोकळे झाले आहेत. परंतु एक शेख महंमद सोडून सर्वच परंपरा दत्तात्रेयांना चांदबोधल्याचे गुरू मानतात. गंगानाथी परंपरा तर चांदबोधल्यांनी श्रीदत्तात्रेय प्राप्तीसाठी अतोनात परिश्रम केले हे आवर्जून सांगते. अशा अवस्थेत चांदबोधले म्हणजेच दत्तावतार अथवा दत्तावतारी महापुरुष हे समीकरण कसे टिकणार ?

ब. शेख महंमदाच्या सूफी गुरुपरंपरेविषयी माहिती देणारे शिजरा-जदि-कादिरी नावाचे प्रकरण बेंद्रे ह्यांनी नोंदविले आहे. त्यात तर शेख महंमदाचे गुरु चांद कादिरी आणि त्यांचेही गुरु राजे महंमद ( शेख महंमदाचे वडील ) अशी गुरुपरंपरा आहे. एकनाथांनी स्वतःच्या परमगुरुचे नाव निःसंदिग्धपणे ‘ दत्तात्रेय ’ असे दिल्या चांदबोधले म्हणजेच दत्तात्रेय हे समीकरण डॉ. ढेरे ह्यांनी मांडले. आता शिजरा–जदि–कादिरी आणि गोपाळनाथ, गंगानाथ परंपरा आणि शिवराम स्वामी कल्याणीकर यांच्या माहितीचा मेळ घालण्यासाठी राजे महंमद म्हणजेच दत्तात्रेय अथवा दत्तावतारी सत्पुरुष असेही मांडून दाखवावे. आणि राजे महंमदांच्या पत्नीशी पुन्हलेशा अथवा फुलाई–हिच्याशी श्रीदत्तात्रेयांचा विवाहही उरकून टाकावा.

याचाच अर्थ असा की प्रतिष्ठानचरित्र, मुकुंदराज – परंपरा, गंगानाथ-गोपाळनाथ मठपरंपरा, शिवरामस्वामी कल्याणीकर यांची माहिती आणि शेख महंमदाची माहिती यांचा अजिबात मेळ नाही. ह्या परंपरा परस्परपूरक नाहीत

तर परस्पर विसंगत आहेत. यातील मुकुंदराज कोण आणि तो एकनाथांचा 'सांप्रदायी' होता की नाही हा आणखी एक वेगळाच घोटाळा आहे. प्रतिष्ठान चरित्र या ग्रंथाची विश्वासार्हता संशयातीत नाहीच.

## ९. शिजरा–जदि–कादिरी :

शेख महंमदाची गुरुपरंपरा सांगणारे शिजरा – जदि – कादिरी हे छोटेसे प्रकरण श्री. बेंद्रे ह्यांना श्रीगोंदे येथील शेख महंमदबाबांच्या मठातच उपलब्ध झाले. शिजरा म्हणजे गुरुपरंपरा. शिजरा–जदि–कादिरी म्हणजे कादिरी शाखेच्या बोधाची परंपरा. भारतात सूफींचे चार प्रमुख संप्रदाय आहेत ते १. चिश्ती २. नक्शबंदी ३. सुहरावर्दी ४. कादिरी असे आहेत. [२०]

यातील कादिरी पंथाचा सर्वश्रेष्ठ पुरुष म्हणजे अब्दुल कादर अल जिलानी. त्याच्या नावावरून ह्या संप्रदायाला कादिरी संप्रदाय हे नाव पडले. त्याचा मृत्यू इ. स. ११६६ मध्ये झाला. कादिरी पंथाचा भारतात येणारा प्रथम महत्त्वाचा प्रचारक म्हणजे सय्यद महंमद गौस कादिरी. हा भारतात इ. स. १४२८ मध्ये आला. त्याला प्रख्यात लोदी सुलतान सिकंदर लोदी ह्याने आपली कन्या दिली होती. हुमायूँही त्याला मानत असे. सय्यद महंमद गौस कादिरी हा ग्वालेर येथे रहात असे. म्हणून त्यास 'ग्वालेरी' म्हणत. त्याचा शिष्य शेख बहलोल नामेकरून होता. पुढे ह्या शेख बहलोलास मिर्जा हिंदालाने ठार मारले. सय्यद महंमद गौस कादिरी ह्याचे 'मेराजनामा', 'अवराद–इ–गौसिया', 'जवाहिर–इ–खमसा' इत्यादी अनेक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. [२१]

शिजरा–जदि–कादिरी हे प्रकरण आम्हास प्रत्यक्ष पहावयास मिळाले नाही. परंतु श्री. बेंद्रे ह्यांनी 'योगसंग्राम' हा ग्रंथ संपादित असता त्याचा काही भाग उद्धृत केला आहे तो असा.

१. इलाहे बहुरमत खीरके खिलाफत बर हाजरत
सय्यद अब्दुल रज्जाक ताजोद्दीन कादिरी
रजी अल्लाह अन होत्ताला अनहो रशीद

|

२. हजरत सय्यद महंमद गांवस ग्वाल्हेरी कादरी रजिअल्लाह ..

|

३. हजरत सय्यद राजे महंमद कादिरी ...

|

४. हजरत सय्यद चांदसायेब कादिरी ...

|

५. हजरत सय्यद महंमद सायेब कादिरी ...

अर्थात् ह्यातून अब्दुल रज्जाक–महंमद गौस–राजे महंमद–चांदकादिरी–शेख–महंमद अशी कादिरी शाखेची गुरुपरंपरा निघते.[२२]

परंतु सुफींच्या इतिहासाप्रमाणे शिजरा–जदि–कादिरीमधील ही गुरु–परंपराही चुकीची ठरते. सुफींच्या इतिहासाप्रमाणे ग्वाल्हेर येथील प्रख्यात सूफी संत सय्यद महंमद गौस कादिरी हा अब्दुल रज्जाक ताजोद्दीन ह्याचा शिष्य नसून त्याच्या गुरुचे नाव शेख हमिदुद्दीन हसूर असे होते.[२३] अर्थात् शिजरा–जदि-कादिरी हे प्रकरण लिहिणाराला सूफीमताचा आणि कादिरी शाखेचा इतिहासही नीटपणे ज्ञात नव्हता हे उघड आहे. जिथे शेख महंमदाच्या मठात स्वतः शेख महंमदाच्याच गुरुपरंपरेची माहिती चुकीची सांगितली जाते तिथे त्याने एकनाथ महाराजांच्या गुरुपरंपरेविषयी सांगितलेली माहिती स्वीकारण्यास संकोच वाटल्यावाचून रहात नाही.

## १०. मुकुंदराजाची साक्ष :

दुसरी साक्ष तथाकथित एकनाथशिष्य मुकुंदराज ह्यांची आहे. याची गुरुपरंपरा सांगणारा अभंग वर दिलाच आहे. त्यावरून काही शंका निर्माण होतात त्या अशा. त्याने सांगितलेली गुरुपरंपरा चांदबोधले–जनार्दन–एकनाथ–मुकुंद–रामनाथ अशी आहे. यावरून तो एकनाथ संप्रदायी असावा असे वाटते. गुरुवर्य डॉ. म. रा. जोशी ह्यांनी एका नरसिंहसुत नामक कवीची माहिती सांगताना म्हटले आहे ' चांदोरकरांनी संतकाव्यसूचीत ह्याच्या नावावर मुकुंद-चरित्राची नोंद केली असून त्यांच्या मते हा मुकुंद एकनाथचरित्रकार आहे. एकनाथ–मुकुंदनाथ–रामनाथ अशी एक परंपरा वा. सी. बेंद्रे यांनी शेख महंमद काव्यसंग्रहात दिली आहे. तर डॉ. हर्षे यांना एका ज्ञानदेवी प्रतीवर एकनाथ–मुकुंदनाथ–रामानंद–हरिहरानंद अशी नावे आढळली.' यावरून गुरुवर्य डॉ. म. रा. जोशी ह्यांनी पुढीलप्रमाणे परंपरा मांडली आहे.

एकनाथ
|
मुकुंदनाथ
|
नरसिंहसुत | रामानन्द | रामनाथ
|
हरिहरानन्द (रामानन्द शिष्य)

आता यावर आमचे विवेचन असे[२४]

अ. हा मुकुंदराज आपल्याच शिष्याला आपली गुरुपरंपरा का सांगतो आहे ? निदान माझ्या माहितीत तरी अभंग रचून स्वतःची गुरुपरंपरा सांगणारा हा पहिलाच सत्पुरुष होय. आणि गुरुची परंपरा न जाणता त्याचे शिष्यत्व पत्करणारा रामनाथही धन्यच होय.

शिवाय हे मुकुंदराज स्वतःला योगी मुकुंदराज म्हणवून घेतात हे महाराष्ट्राच्या इतिहासात तरी अद्वितीयच आहे. शिवाय हे मुकुंदराज चांदबोधले ह्यांना मूळ, जनार्दन स्वामींना खोड, एकनाथांना शाखा पालव ठरवून स्वतःला मात्र

'तयाचे हे फळं आम्ही घनदाट । सेविती उत्कृष्ठ साधुसंत '

असे स्वतःलाच 'घनदाट उत्कृष्ठ फळ' ठरवून मोकळे झाले आहेत. हा अभंग मुकुंदराजांचा वाटतच नाही. तो रामनाथांचा असावा. बेंद्रे आणि ढेरे मात्र तो मुकुंदराजांचा म्हणतात.

ब. हे मुकुंदराज एकनाथांचे शिष्य त्या अर्थी तुकारामाचे समकालीन ठरतात. 'स्वस्ति श्रीमन्नृप शालिवाहन शके हेमळ ।।१५७९।। बि नामसंवत्सरे ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी शुक्रवार ( १५ मे १६५७ ) इत्यादी पुष्पिका असलेले त्यांचे ग्रंथही उपलब्ध आहेत असे श्री. बेंद्रे सांगतात.

क. याच मुकुंदराजाच्या वर्णनपर एक पंचक श्री. बेंद्रे यांनी उद्धृत केले आहे ते असे.

मुकुंदराज सतगुरु संत पंचाक्षरी गाभा
स्मरता आसनी शयनी दर्शनात उभा ।।धृ।।

........ .......................

........ .......................

जडित चिद्रत्नांचे अमोल्य निजतेज
जडले हृदयी त्या अर्थाचे विवेकसिंधुचे गुज
जगी जीवन केसरिनाथ अवतरले सहज
जयत्पाल शिवदीन उद्धरला घेतली पैज ।।५।।

शेख महंमद आणि तुकाराम ह्यांचा समकालीन हा मुकुंदराज विवेकसिंधूचा कर्ता आणि जयत्पाल–शिवदीन ह्या दोघांचाही उद्धारक कसा असू शकेल. हे पद पैठण येथील प्रख्यात संत शिवदीनकेसरी ह्यांनी विवेकसिंधुकर्त्या आद्यकविकीर्ती मुकुंदराजांविषयी लिहिलेले दिसते.

ड. या मुकुंदराजाचा रामनाथाशिवाय केशव नामक शिष्य असल्याचेही बेंद्रे सांगतात. त्याचेही एक पद त्यांनी उद्धृत केले आहे. त्यात

विवेकसिंधूची चिद्रत्ने । लेवविली मज यत्ने ।।[२५]

या शब्दात मुकुंदराजाला विवेकसिंधूचा कर्ता बनविले आहे.

इ. हा केशव कोण ? याविषयी रामदासी संप्रदायातील प्रचंड कोश 'दासविश्रामधाम' कर्ते आत्मारामबुवा गोसावी सांगतात

धन्य ब्रह्मवेत्ते सत्पुरुष गोसावी
मुकुंदराजाचा सांप्रदायी
विवेकसिंधू आदि अर्थ हृदयी
जडलासे पूर्ण निपुण योगी ।।[२६]

म्हणजे हा केशव बिदरच्या बादशहाची हागणी बंद करणाऱ्या आणि बादशहावर वजन ठेवणाऱ्या चांदबोधले ह्यांचा, स्वतःच्या अधिकाराने मुस्लीम राज्यातील शुक्रवारची सुटी गुरुवारी करून घेणाऱ्या जनार्दन स्वामींचा अथवा स्वतःच्या क्रांतदर्शी व्यक्तित्त्वाने आणि कवित्व–तपस्येने अखिल महाराष्ट्राला प्रातःस्मरणीय ठरलेल्या श्रीएकनाथांचा नाही तर मुकुंदराजांचा सांप्रदायी आहे. म्हणजेच तो एकनाथशिष्य मुकुंदराज सांप्रदायी नसून आद्यकविकीर्ती विवेकसिंधुकार मुकुंदराजांचा सांप्रदायी आहे असे ठरते.

ई. शिवाय गुरुवर्य म. रा. जोशी ह्यांनी ज्ञानदेवीच्या ज्या प्रतीकडे लक्ष वेधले आहे तेथे तर ज्ञानेश्वर-निवृत्तीनाथ-सोपाननाथ-एकनाथ-मुकुंदनाथ असा क्रम असून रामानंद आणि हरिहरानंद ह्यांना नमने आहेत. यात तर ज्या चांदबोधल्याविषयी 'चांदबोधला मूळ' असे मुकुंदराज सांगतात त्याचा मुळीच उल्लेख नाही.

## ११. श्रीकृष्णदास जगदानंदनंदनकृत प्रतिष्ठान चरित्र :

एकनाथ दर्शन खंड १ ला या श्री. बळवंत गिरीराव घाटे यांनी प्रकाशित केलेल्या ग्रंथात श्री. र. ह. कोटणीस यांचा एक लेख 'नाथांची चरित्रे' या शीर्षकाचा आहे. (पृ. २४८–२६०) त्यात त्यांनी 'श्रीकृष्णदास जगदानंदनंदनकृत प्रतिष्ठान चरित्र' ह्या ग्रंथाची माहिती सांगितली आहे. हेच नाथांचे आद्य, प्रामाणिक आणि शास्त्रशुद्ध चरित्र आहे असे त्यांनी वारंवार आवर्जून सांगितले आहे आणि श्रीकृष्णदास जगदानंदनंदन हा इतिहासाचार्य राजवाड्यांइतका चिकित्सक संशोधक–चरित्रकार आहे अशीही भलावण केली आहे.[२७]

प्रतिष्ठान–चरित्र हा ग्रंथ यापूर्वीच श्री. र. ह. कोटणीस ह्यांनी प्रख्यात कवी श्री. साधुदास ह्यांच्या प्रस्तावनेसह संपादिला आणि तो श्री. वा. वि. भट ह्यांनी १९४७ साली प्रकाशित केला आहे. तीच प्रत प्रस्तुत लेखकासमोर आहे.

अ. श्रीकृष्णदास जगदानंदनंदनाने चंद्रशेखर नावाचा दोन वेळा उल्लेख केला आहे. तो असा

श्रीदत्तात्रेय आदिपुरुष । तोचि चंद्रशेखर प्रत्यक्ष
त्या चंद्रशेखराचा निःशेष । पूर्ण शिष्य जनार्दन ।। अध्याय १ ओवी २८ ।।
... ... ... ... ... ... ..
एकनाथासि करिता बोध । तव आला चांदबोध
चंद्रशेखर महासाधु । अवतार प्रसिद्ध दत्तात्रेयाचा ।।६७।।
तो सप्तताड उंची गहन । अवचिता देखिला जनार्दन
सवेचि होऊनि हास्यमान । जाला संपूर्ण ते ठायी ।।६८।।
समागमे असती दोनी श्वान । ते प्रत्यक्ष कामधेनु जाण
जेथे बैसला जनार्दन । तेचि स्थान ठाकिले ।।६९।।
देखोनि सद्‌गुरु चंद्रशेखर । जनार्दने केला नमस्कार
वृत्तांत जाणिला समग्र । मग चंद्रशेखर संतोषला ।।७०।।
चंद्रशेखरे तांबूल चघळोनी । घातला एकनाथाच्या वदनी
म्हणे वाचाल होसी ब्रह्मज्ञानी । ऐसे सांगुनी अदृश्य झाले ।।७१।।
।। अध्याय दुसरा ।।

ह्यातून चंद्रशेखर (चांदबोध)–जनार्दन–एकनाथ अशी गुरुपरंपरा निघते आणि श्री. ढेरे ह्यांना एकनाथांच्या गुरुपरंपरेचे गूढ सुटल्यासारखे वाटते. पण प्रत्यक्ष तसे घडत नाही.

## १२. प्रतिष्ठानचरित्राचे परीक्षण :

आता प्रतिष्ठान–चरित्र ह्या ग्रंथाचे परीक्षण करू. हा ग्रंथ कोल्हापूर–जवळील हातकणंगले जवळील वाठार येथील तथाकथित नाथ–वंश–शाखेतील आहे. वाठार हा गाव वारणा नदीच्या काठी असून तेथे ब्राह्मणांची १२–१३ घरे आहेत. येथे नाथांच्या वंशाची एक शाखा नांदते आहे असे म्हणतात. त्यातील उद्धव बिन गणेश गोसावी ह्यांनी वाठार गाव संपादन केला असे सांगितले जाते. तशी राज्याभिषेक शक ३२ ( इ. स. १७०५ ) ची सनदही संपादकांनी उद्धृत केली आहे.[२८] ही सनद राजा शिवछत्रपती ह्यांनी उद्धव बिन गणेश गोसावी यांना 'पार्थिव संवत्सर पौष्य शुद्ध दशमी गुरुवार' या दिवशी दिली आहे. या सनदेत राजा शिवछत्रपती यांनी उद्धव बिन गणेश गोसावी यांस

'आपण श्री. ... ... स्वामींचे नातू पैठणी आजिवरी स्वामीचा मठ आहे तेथे रहात होतो' असे म्हटले आहे. आता श्रीएकनाथास पुत्र एकच आणि ते म्हणजे हरिपंडित. असे असता हे उद्धव बिन गणेश एकनाथांचे नातू कसे ठरणार ? हरिपंडितांनाही कुणी गणेश नामक पुत्र वा उद्धव नामक पौत्र नव्हता हे निराळेच. अर्थात् सनद विश्वासार्ह वाटत नाही.

पैठण येथील नाथांची वंशावळ आणि वाठार येथील कवी साधुदास ह्यांनी नोंदविलेली वंशावळ यात अतिशय तफावत आहे.

**पैठण येथील नाथ वंशावळ**

- श्रीएकनाथ महाराज
  - हरि पंडित
    - प्रल्हाद
      - रंगोबुवा
    - मेघःशाम
      - प्रल्हाद
      - शामजी
      - नारायण
      - कुशाबा
    - राघोबा

**वाठार येथील वंशावळ**

- श्रीएकनाथ महाराज
  - गोदा (लीला) विश्वंभर
    - मुक्तेश्वर
  - हरिपंडित
    - उद्धव
      - गणेश
        - उद्धव ( वाठार गाव संपादन करणारे ? )
          - शामजी
      - मल्हार
    - कुशाबा
    - राघोबा
  - गंगा
    - पुंडाजी

अर्थात् ह्या दोन्ही वंशावळी एकमेकींशी पूर्णपणे विसंगत आहेत असे तेव्हाच दिसते आणि याही वंशावळीत उद्धव बिन गणेश हे नाथांचे नातू नाहीतच. वंशावळीत सहसा मुलींची नावे येत नाहीत. इथे नाथ कन्यांची नावे कशी आली कोण जाणे ?

## १३. प्रतिष्ठानचरित्राचा रचनाकाळ :

या प्रतिष्ठानचरित्राच्या रचना–काळाविषयी कवी साधुदास लिहितात ' प्रतिष्ठान–चरित्र ह्या नाथांच्या चरित्र ग्रंथाच्या काळाविषयी सबळ पुरावा आपल्या हातात नाही. याची प्रत वाठार वंशावळीतील ' उद्धवात्मज शामजी ' यांच्यासाठी लिहिल्या गेलेली आहे. उद्धवात्मज शामजी हे नाथांपासूनचे सहावे पुरुष. दर पिढीला तीस वर्षे ह्याप्रमाणे कालानुक्रम काढला तर उद्धवात्मज शामजी हृयांचा काळ नाथांनंतर १८० वर्षे येतो. नाथांचा निर्वाण शक १५२१ (इ. स. १६०० अंदाजे). अर्थात् उद्धमात्मज शामजी हृयांचा काळ इ. स. १७८० असा येईल. प्रत नकलण्याइतका ग्रंथ सर्वमान्य होण्यासाठी ५० वर्षे तरी तो आधी लिहिला गेला असला पाहिजे असे गृहीत धरल्यास शके १६२० (इ. स. १६९८) हा ' प्रतिष्ठान–चरित्र ' ग्रंथाच्या रचनेचा काळ येतो. '

परंतु ग्रंथाच्या शेवटी नकलेचा शक स्वच्छच ' शके १७१७ राक्षस संवत्सर आषाढ शुद्ध दशमी रविवारी तद्दिनी समाप्त ' असा दिला आहे.[२९] श्री साधुदास ह्यांच्या म्हणण्याप्रमाणे ग्रंथ नकल करून घेण्याइतका सर्वमान्य होण्यासाठी त्याला ५० वर्षांचा कालावधी देऊ. अर्थात् ( १७१७–५० = १६६७ ) शके १६६७– ७० म्हणजेच इ. स. १७४८ च्या आसपास या ग्रंथ-रचनेचा काळ येतो आणि तो उद्धव बिन शामजी यांच्या काळास जुळतीही कारण साधुदास ह्यांनीच उद्धव बिन शामजी ह्यांचा काळ १६७० सुमार असा दिला आहे. अर्थात् ही सर्व गणिते अंदाजाचीच. कारण या प्रतिष्ठान चरित्राची एकच एक प्रत, तीही वाठार येथील तथाकथित नाथवंशीयासाठीच कुणा ' शामभटात्मज रामभटेन लिखितं ' ( हे नाव कृत्रिम वाटते )–अशी. अर्थात् ग्रंथ नकल करण्याइतका सर्वमान्य होण्यासाठी ५० वर्षे लागतील इत्यादी गोष्टी अधांतरीच रहातात. अर्थात् हा ग्रंथ अगदी अलीकडचा म्हणजे शके १७१७ च्याच आसपासचा आहे असे वाटते.

## १४. प्रतिष्ठान चरित्रातील विसंगती :

शिवाय हे नाथचरित्र अनेक बाबतीत केशव ( शक १६८२ ) आणि महिपति ( शके १६८४) यांच्या नाथचरित्राशी आणि पैठण येथे नाथांच्या वंशात प्रचलित असलेल्या मौखिक परंपरांशी जुळत नाही. काही ठळक स्थळे खालीलप्रमाणे नोंदविता येतील.

१. प्रतिष्ठानचरित्रानुसार नाथ हे गृहत्याग करून जनार्दनपंतांकडे गेले नाहीत तर त्यांना चक्रपाणी ह्यांनीच तिकडे पाठविले.

२. जनार्दनस्वामी देवगिरी येथे रहात नसून अहमदनगर येथे रहात होते असे प्रतिष्ठानचरित्र सांगते.

३. प्रतिष्ठानचरित्रानुसार नाथांची सासुरवाडी विजापूर वा वैजापूर येथील नसून नाथ-पत्नी ह्या देवगिरीच्या त्रिविक्रमभट नामक ब्राह्मणाच्या कन्या होत.

( वजापूर येथील देशपांडे घराण्यात मात्र आपल्या घराण्यातील कन्या नाथांना दिली होती अशी परंपरा चालत आलेली आहे. या मुलीचे नाव गिरिजा असून तिच्या पित्याचे नाव कोन्हेर मेघःशाम असे होते असे ते सांगतात. आम्हाला ही माहिती वैजापुरकर देशपांडे ह्यांचे विद्यमान वंशज श्री. कमलाकर-रावजी देशपांडे यांच्याकडून मिळाली. त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच.)

४. संत नामदेवांच्या नावावर असणारी परिसा भागवताची कथा इथे नाथांच्या नावावर टाकली आहे.

५. सर्वात मुख्य आक्षेप म्हणजे हा कृष्णदास जगदानंदनंदन नाथांच्या एकनाथी भागवत, रुक्मिणी स्वयंवर, भावार्थ रामायण, ज्ञानेश्वरी शुद्धीकरण ह्यांचा अजिबात उल्लेख करीत नाही. नाथांचा हा प्रचंड वाङ्मय-पराक्रम त्याच्या गावीच नाही. उलट केशव आणि महिपती ती माहिती आवर्जून देतात.

ह्या सर्व गोष्टींवरून आणि विशेषतः कृष्णदास जगदानन्दनंदन ह्या ग्रंथकर्त्याच्या नाथांच्या ग्रंथकर्तृत्वाविषयी असलेल्या अज्ञानावरून 'प्रतिष्ठान चरित्र' ह्या ग्रंथाच्या प्रामाण्याविषयी शंका वाटते. निश्चित संशोधन होऊन या ग्रंथाच्या प्रामाण्याचा कस ठरेपर्यंत तो सर्वस्वी प्रमाण मानू नये.

## १५. केशवाचे नाथचरित्र :

केशव हा श्रीएकनाथ महाराजांच्या संप्रदायातील असून तो नाथांच्या वंशजाचाच शिष्य होता. त्याने आपली परंपरा

आदिनारायण–ब्रह्मा (विधी)–अत्रिनाथ–दत्तात्रेय-जनार्दन–एकनाथ–राघव-माधव–त्र्यंबक–केशव अशी दिली आहे.

यातील राघव हा एकनाथांचा नातू. हरिपंडित वडिलांवर रुसून काशीला गेले. सवे दोन्ही मोठी मुले नेली. धाकटा राघव नाथांजवळ राहिला. त्यांच्यामागे उभा राहून धृपद धरी. केशवाचा गुरू माधव हा राघवाचा नातू. अर्थात केशवाची बोधपरंपरा प्रत्यक्ष नाथांच्या वंशातून आलेली

आहे. शिवाय देवगिरीला सूर्यकुंडावर स्नान करण्यासाठी गेलो असता प्रत्यक्ष नाथांनी साक्षात्कारदर्शन देऊन 'अभेदभावार्थाचा बोध' केला अशीही हकीकत केशवाने लिहिली आहे. केशवाने आपले नाथचरित्रही देवगिरीवर—नाथ वास्तव्याचे स्थानीच लिहिले आहे. त्याच्या नाथचरित्र लेखनाचा काल शके १६४२ असा असून त्यात ३१ अध्याय आणि २६१६ ओव्या आहेत.

केशवाने स्पष्टपणे नाथांचे परमगुरु म्हणून श्रीदत्तात्रेयाचे नाव दिले आहे. त्याची गुरुपरंपरा नाथवंशजांच्याद्वारे आलेली असल्यामुळे आणि त्याने आपला ग्रंथ देवगिरी ह्या नाथवास्तव्याच्या स्थळीच लिहिला असल्यामुळे केशवाच्या माहितीवर विश्वास ठेवणे भाग आहे.

## १६. केशव आणि चंद्रभट ब्राह्मण :

केशवाने दत्तात्रेयाचे मलंग वेशात जनार्दनस्वामी एकनाथ ह्यांना दर्शन देणे हा प्रसंग तिसऱ्या अध्यायात आणि जनार्दनस्वामी-एकनाथ तीर्थयात्रेसाठी निघून चंद्रमाभटाच्या घरी वसतीस रहाणे हा प्रसंग पाचव्या अध्यायात वर्णन केला आहे. हे सर्व स्वत: एकनाथांनी दिलेल्या माहितीशी सुसंगतच आहे. हा चंद्रमाभट जनार्दनस्वामी-एकनाथांबरोबर तीर्थयात्रेसाठी आला पण तोच पुढे सूफी चांदकादिरी वा चांदबोधले होऊन देवगिरी किल्यासमोर समाधी घेता झाला ही हकीकत केशवाने मुळीच दिलेली नाही. ती दिली आहे वृथा पाल्हाळाविषयी प्रसिद्ध असलेल्या महिपतीने. असो.

याचाच अर्थ असा की चंद्रभट म्हणजेच मलंगवेषधारी दत्तात्रेय म्हणजेच जनार्दनाचे गुरु हे बेंद्रे आणि ढेरे यांना अभिप्रेत असलेले समीकरण केशवाला अजिबात ठाऊक नव्हते. त्यामुळे केशव सत्यापलाप करीत आहे हे श्री. ढेरे यांचे विधान लटके पडते. केशवाला पुढे हाच चंद्रभट वा चांदबोधला सूफी साधू वगैरे झाला असे ठाऊक असते तर आधी मलंगवेषाने त्याचे नाथ—जनार्दनांना दर्शन आणि नंतर यात्रानिमित्ताने अनोळखी ब्राह्मणाकडे उतरावे तसे चंद्रभटाकडे उतरणे रंगविण्यास त्यास बरेच प्रयास पडले असते.

## १७. महिपतीचे नाथचरित्र :

महिपतीने एकनाथचरित्र दोन वेळा लिहिले. एकदा भक्तविजय ग्रंथात (शके १६८४) आणि दुसऱ्यांदा भक्तलीलामृत ग्रंथात ( शके १६९६ ).[१०] हे दुसरे नाथचरित्र विस्तृत ( अध्याय १३–२४ ) असून ते जवळजवळ केशवकृत नाथचरित्राची केलेली नकल होय आणि म्हणून प्रथम लेखनाच्या वेळी दत्तात्रेयाने एकनाथ–जनार्दनांना दोन वेळा मलंग वेषात दर्शन दिले असे

 एकनाथांची

म्हणणाऱ्या महिपतीने दुसऱ्यांदा लिहिताना या दोन प्रसंगांचा एकच प्रसंग केला आहे. कारण दुसऱ्यावेळी त्याच्यासमोर केशवकृत नाथचरित्र होते.

महिपती अतिपाल्हाळिक लिहिणारा लेखक खरा. पण चंद्रभट वा चांदबोधले हेच जनार्दनस्वामींचे गुरु अशी त्याचीही माहिती नव्हती. एकनाथ-जनार्दन आणि चंद्रभट ब्राह्मण ह्यांची पूर्वी ओळख नव्हती आणि तीर्थयात्रेत ते त्याच्या घरी सहजच उतरले असेच महिपती मानीत होता हे त्याच्या

मग एकनाथ आणि जनार्दन
तयासमीप बैसती येऊन
म्हणति धन्य आजिचा सुदिन
जाहले दर्शन संताचे ।।१४.३३।। (भक्तलीलामृत)

महिपतीने चतुःश्लोकी भागवत वाचलेले होते याची अन्यत्र साक्ष आहे. पण एकनाथांनी चंद्रभटाच्या गावाचे नाव स्पष्टपणे चंद्रावती नगरी दिल्या–वरही त्याला ते शोधता आले नाही. उलट त्याने संतविजय ग्रंथात खास रामदासांचा अभंग उध्दृत करून ' गोदावरी उत्तर तीरी । चौ योजन चंद्रगिरी ' असा नाथांनी स्पष्ट उल्लेखिलेला चंद्रगिरी पर्वत कोल्हापूरजवळ शोधायचा प्रयत्न केला आहे.

अशा ह्या महिपतीने चंद्रभट हा पुढे बोध ठसावल्यामुळे नाव बदलून चांद बोधला झाला. जनार्दनस्वामींनी त्याची समाधी ' यवन उपद्रव करतील काही ' या भीतीने कबरवजा बांधली या दोन गोष्टी सांगितल्या आहेत. यावर श्री. ढेरे ह्यांनी चंद्रभट हा पुढे सूफी झाला आणि त्याचे कादिरी सांप्रदायिक नाव सय्यद चांद कादिरी असे झाले असे म्हटले आहे. पण हे मत टिकत नाही. कारण

अ) तो काळच मुसलमान प्राबल्याचा होता. आहार–विहार, वेशभूषा, भाषा सर्वांवरच मुसलमानी छाया होती. स्वतः हिंदुपदपादशाही–संस्थापक शिवाजी महाराज मुसलमानी धर्तीचा वेश करीत. राज्यव्यवहारातले इस्लामी शब्द काढण्यासाठी त्यांना कोश रचून घ्यावा लागला. अशा अवस्थेत फकीर–वेश म्हणताच मुसलमानच डोळ्यासमोर उभा रहावा हे योग्य नाही. बरे इतके करून हा मुसलमान फकीरच जनार्दनस्वामींचा गुरु असे केशव-महिपती सांगत नाहीत. ते सांगतो शेखमहंमद.

ब) मग शेखमहंमदाची चांद कादिरी हे सूफी साधूच जनार्दनस्वामींचे गुरु ही साक्ष विचारात घेतली तर महिपतीची ' यवन उपद्रव करतील म्हणून चांदबोधले ह्यांची समाधी कबरवजा बांधली ' हे विधान लटके पडते. कारण

मग सूफी साधूच्या कबरीला यवनाच्या उपद्रवाची काय भीती ? बेंद्रे-ढेरे ह्यांनी केशव-महिपती आणि शेखमहंमद ह्यांच्या माहितीची सांगड घालण्याचा प्रयत्न केला आहे. पण केशव-महिपती प्रमाण धरताच शेखमहंमद लटका पडतो आणि शेखमहंमद प्रमाण धरताच केशव–महिपती बाद ठरतात असे प्रत्ययाला येते. आणि महिपतीही सर्वत्र मलंग वेशाने येणाऱ्या दत्ताला 'अनसूयासुत' असे म्हणून जनार्दनस्वामींचे गुरू पौराणिक दत्तात्रेय असल्याची आपली मान्यता नोंदवतोच.

## १८. कृष्णदयार्णव :

कृष्णदयार्णव हे पैठणचे भगवद्भक्त सत्पुरुष. हरिवरदा या विशाल ग्रंथाचे कर्ते. त्यांनी 'यवनाकृति देव' नाथांच्या घरी आले असता नाथांनी त्यांना श्राद्धान्न घालून पाठवले अशी कथा दिली आहे. अर्थात् हे नाथांच्या मानवतावादाचे उदाहरण आहे. हे 'यवनाकृति देव' नाथांचे परमगुरु होते असे कृष्णदयार्णव अजिबात म्हणत नाहीत. आणि परमगुरुला नुसते श्राद्धान्न खाऊ घालून पाठवणारे नाथही शिष्योत्तम खरेच.

## १९. मलंगवेश म्हणजे काय :

मलंग म्हणजे अवधूत अथवा विधिनिषेधरहित रहाणारा सत्पुरुष असे श्री. ढेरे म्हणतात. ही सूफी संज्ञा आहे असे ते म्हणतात. त्यांनी सूफी ग्रंथाचा आधार द्यावयास हवा होता. सूफी संप्रदायाची साक्ष काढू जावे तो मलंग साधूच हिंदू गोसाव्यांप्रमाणे राहत असे दिसते. विश्वभारती संस्थेतील प्रख्यात विद्वान प्रा. रामपूजन तिवारी आपल्या 'सूफीमत साधना और साहित्य' या ग्रंथात लिहितात.

"मलंग संप्रदायवाले हिंदूगोसाई साधुओंकी तरह पहाडोंमे– जंगलोंमे घूमते फिरते हैं। संतोंकी समाधीका दर्शन करते हैं और जहाँ बैठते वहाँ धूनी रमाते है। और अपने शरीरमे भस्म मलते हैं।

मलंग संप्रदायके संबंधमे संप्रदायकी इतिहासकी दृष्टीसे कुछ कहना कठीन है। साधारणत: इसे मदारी संप्रदायकी शाखा मानते है ··· ··· ··· वे जमनजत्तीके अनुयायी हैं। यह ( शब्द ) यवनयति हैं। संभव है की कोई मुसलमान साधक हिंदू यतीकी तरह अपना जीवन बीताता हो और उसके बहुतसे अनुयायी हो गये। लेकीन किसी निश्चित प्रमाण की अभावमे कुछ भी कहना कठीन है.।

कहते है कि जमनजत्ती जिंदाशाह मदारका शिष्य था।

मलंग शब्द किसी भी ऐसे साधुके भीख माँगनेवालेके विषयमे प्रयुक्त होता है, जो कि किसी भी संप्रदायके अंतर्गत न हो। मलंग खूब चरस पीते है, भंग खाते हैं और धूनी रमाये रहते हैं। शरीर मे खाक मलते है। भस्म और लंगोटी धारण करते है। माथेपर लंबे उलझे केश रखते है और उन्हें बांधते है। स्यालकोटके पसरूर तहसील मे झंगीशाह खाकीके मकबरेपर मलंग बराबर जाते है। कमरमे जंजीर या रस्सीकी करधनी लगाये रहते हैं। ( सूफीमतः साधना और इतिहास. पृ. ४२९, ५२९ )

यावरून एकूणच मलंगाचा वेश थोडा ओंगळ पण हिंदू संन्यासी माणसासारखाच असतो हे उघड आहे. या मलंगवेशात ( अवधूत वेशात ) दत्तात्रेयाचे येणे योग्यच आहे. वेश हिंदू संन्याशासारखा पण संज्ञा मात्र यावनी आ तत्कालीन भाषेत अनेक यावनी शब्द प्रवेशले होते. प्रधान या साध्या शब्दासाठी आपण पेशवा हा यावनी शब्द वापरतो. पेशवे काय मुसलमान होते? अर्थात् केशव–महिपती आदींची फसगत मलंग या यावनी शब्दाने झाली आहे. ( मलंग शब्दाची व्युत्पत्ती अमंगल वा मलांग पासून तर नसेल )

बेंद्रे–ढेरे यांच्या मतानुसार नाथांचा आद्य चरित्रकार असलेला कृष्ण-दास जगदानंदनंदन हा तर चंद्रशेखर वा चंद्रबोध हा दत्तात्रेयाचा मलंग वा यावनी वेशाचा अजिबात उल्लेख करीत नाही. केवळ तो सात ताड उंच होता एवढेच सांगतो. त्याने दिलेला उच्छिष्ठ तांबुलाचा प्रसाद एकनाथांनी अव्हेर-लेलाही नाही. नाथांच्या या आद्यचरित्रकाराची साक्ष प्रमाण मानली तर केशव महिपतींचा मलंग अगदी उडून जातो. स्वतः शेख महंमदांनीही आपल्या गुरुच्या–चांदबोधल्याच्या–मलंगत्वाचे कसलेही सूचन केलेले नाही आणि शिवाय मलंग हे कादिरी संप्रदायाचे नव्हेत. ते शाह मदारी ह्याच्या संप्रदायाचे. तेव्हा सय्यद चांद कादिरी हे मलंग वेशात हिंडणे आणि त्यांनी त्या वेशात एका–जनार्दनांना दर्शन देणे अंमळ कठीणच दिसते.

## २०. श्रीदत्तात्रेय आणि लोकविलक्षण वेश :

श्रीदत्तसंप्रदायाच्या अभ्यासकास वेगळे सांगावयास नको की श्रीदत्तात्रेय देवतेचा वेश आणि वागणे अगदी लोकविलक्षण असल्याचा संकेत आहे. दत्तात्रेयांच्या पारंपरिक वर्णनात त्यांच्या हातात मद्यपात्र, मदघूर्णित नेत्र आणि सवे सुंदरी असा लोकविलक्षण वेश असतो. साधकास ते नेहमीच कोडे वाटतात. मुद्दाम लोकविलक्षण वागून, खोटे बोलून फसवतात. लीळाचरित्रात त्यांचे वर्णन

'तंव ऐलाकडौनि श्रीदत्तात्रेय प्रभू पारधीयाचेनि वेखे बीजे करीत होते: खळीचा साउला: मालगंठी वेढला होता: डावीए श्रीकरी सुणेयांचि जोडि:

तीएचि काखे गडियाला: उजवीए श्रीकरी मांस: आणि सूरेचि करवती: ..
श्रीचरणी दुतळी उपाहानौ: सवे आउसे होती: ते खळिचा साउला परिवंट नेसली होती: खळीची चोळी लेइली होती: पाखेया गाठी दीधलीया होतीया: मोकळी वेणी: पाइ वाहाणा: '

'तव पैलाकडौनि श्रीदत्तात्रेय प्रभू मातांग वेखे बीजे करित असती: उभे धाटी साऊला नेसले होते: कटिप्रदेशी मांसभेदिती काती खोवली होती:… खांदावरि मांसाची कावडी: '

( लीळाचरित्र. उत्तरार्ध लीळा १४६, ४४१)

अर्थात् श्रीदत्तात्रेय लोकविलक्षण वेशाने दर्शन देतात ही भावना दत्त-उपासकांच्या संप्रदायाचा संकेत आहे. केशव महिपती याच संकेताचा अनुवाद दिसतात. फक्त त्यांचा काळ मुस्लीम वर्चस्वाचा म्हणून श्रीदत्तात्रेय मलंग वेशाने येतात. (की मलंग हे मातंग शब्दाचेच भ्रष्ट रूप असून त्यावर मलंग वेशाच्या कथेची कृत्रिम उभारणी झाली आहे ?)

## २१. गंगानाथ मठातील परंपरा :

पुणे येथील गोपाळनाथ- गंगानाथ मठाची परंपरा श्री. ढेरे ह्यांनी नोंदविलेली आहे. ती श्रीदत्तात्रेय-चांदबोधले-जनार्दन- एकनाथ- नित्यानंद -कृष्णानंद-विसोबानंद-मुऱ्हारनाथ-रंगनाथ-गोपाळनाथ- परमहंस- सहजानंद -सुभाननाथ-गोपाळनाथ-गंगानाथ अशी आहे. यातील गोपाळनाथांचा मृत्यू शके १६८८ मध्ये त्रिपुटी येथे झाला. त्यांनी 'सिरोमणी' आणि 'समाधिबोध' असे दोन ग्रंथ आणि काही स्फुट रचना केलेली आहे. गंगानाथ हे मूळचे गंगाराम कोथमिरे. त्यांची जाती धनगर. त्यांचीही काही पदे आहेत. ( महाराष्ट्र सारस्वत. आवृत्ती पाचवी. पृ. १००१ वरून)

हेच गोपाळनाथ त्रिपुटीचे गोपाळनाथ म्हणून ओळखले जातात. वऱ्हाडातील प्रख्यात संत सुरजी-अंजनगावचे देवनाथ महाराज त्यांच्याच परंपरेतील. देवनाथ महाराजांचा काळ इ. स. १७७९ ते १८२१ ( शके १७०१-१७२३ अंदाजे ) असा आहे. त्यांच्या गादीवर सध्या मनोहरनाथ नामक सत्पुरुष अधिकारी आहेत. त्यांची गुरुपरंपरा नारायण-विधी-अत्रिनाथ-दत्तात्रेय-जनार्दन-एकनाथ-नित्यानंद-कृष्णनाथ-विश्वनाथ-मुऱ्हारनाथ-रंगनाथ-गोपाळनाथ-गोविन्दनाथ-देवनाथ-दयाळनाथ – जयकृष्णनाथ- रामकृष्णनाथ-भालचंद्रनाथ-मारुतीनाथ-गोविंदनाथ-मनोहरनाथ अशी आहे. अशा अवस्थेत गंगानाथी परंपरा का प्रमाण मानायची आणि देवनाथी-दयाळनाथी का त्याज्य ठरवायची याचे स्पष्टीकरण अपेक्षित आहे. या देवनाथी परंपरेत चांदबोधले ह्यांचा अजिबात उल्लेख नाही.

## २२. आणखी काही गैरसमजुती :

याच ठिकाणी श्री. बेंद्रे यांच्या आणखी काही गैरसमजुती नोंदवितो.

अ) श्रीदत्तात्रेय प्रभू जनार्दनस्वामींचे गुरु होऊ शकत नाहीत हे दाखविण्यासाठी लिहितात ' आराध्य देव अगर ईश्वर ' 'श्रीगुरु' म्हणून उपदेश देऊ शकत नाही असा संत–साधुयोगी यांच्यात समज रूढ आहे.'[३१]

पण दत्तात्रेय हे जनार्दनस्वामींचे उपास्य दैवत कशावरून ? बेंद्रे यासाठी काहीही पुरावा देत नाहीत. श्री. ढेरे तर त्यांचे उपास्य दैवत कृष्ण होते असे सांगतात. ( अर्थात् श्री. ढेरेही पुरावा देत नाहीतच ). तेव्हा श्रीदत्त तेव्हा जनार्दनस्वामींचे उपास्य दैवत नसावे. होते असा पुरावा नाही.

उपास्य दैवतही गुरुपदेश देऊ शकते. श्रीसमर्थांना रामानेच गुरुपदेश दिला. औरंगाबाद जवळील भालगाव येथील प्रख्यात समर्थशिष्य त्र्यंबकराज ह्यांच्या समाधीवरचा गुरुपरंपरेचा उल्लेख करणारा

श्रीआदिनारायण चतुरानन वषीष्ठमुनी
रामचंद्र रामदास त्र्यंबकराज ।।

हा लेख पहा. यात श्रीरामचंद्रांना रामदासांचे गुरु मानले आहे.

ब) श्री. बेंद्रे असे लिहितात की अध्यात्ममार्गी हिंदू लोक गुरुचे नाव सहसा टाळतात.[३२] असे विधान बेंद्रे ह्यांनी करावे ह्याला एक कारण आहे. ते असे की स्वतः शेख महंमदाने आपल्या योगसंग्राम ग्रंथात गुरुचे नाव पंधराव्या अध्यायात दिले आहे आणि इतरत्र सर्वत्र केवळ ' दिगंबर ' असे म्हणून गुरुचा निर्देश केला आहे.

पण अध्यात्ममार्गी हिंदू लोक आपल्या गुरुचे नाव टाळतात हे खरे नाही. नाथांच्या भागवताचा एकही अध्याय जनार्दनस्वामींच्या स्तुतीशिवाय सुरू होत नाही आणि संपत नाही. हिंदू लोक गुरुचे नाव टाळतात असे मानले तर स्वतःची गुरुपरंपरा रामनाथ नामक शिष्याला सांगणाऱ्या मुकुंदराजाचा जो अभंग बेंद्रे ह्यांनी नोंदविला आहे त्याचे काय करायचे ? तस्मात् ह्या आक्षेपात काही अर्थ नाही.

## २३. शेख महंमद आणि चांद बोधले :

स्वतः श्रीशेखमहंमदाचा योगसंग्राम ग्रंथ आणि बरीच फुटकर कविता प्रसिद्ध आहे. पण योगसंग्राम ह्या ग्रंथात केवळ पंधराव्या अध्यायात शेख महंमदाने आपल्या गुरुचे नाव ' ॐ नमोजी सद्‌गुरु चांद बोधले । त्यांनी जानोपंता अंगिकारले । जानोबाने एका उपदेशिले । दास्यत्व गुणे ।। असा केला आहे.

आणि पुढे चांद बोधल्याने बादशहाची हागणी बंद करून त्याला चमत्कार दाखविल्याची कथा सांगितली आहे. ही कथा श्रीनृसिंहसरस्वतींच्या कथेचे अनुकरण दिसते. पण पंधराव्या अध्यायात ह्या दोन्ही गोष्टी सांगावयाचे प्रयोजनच काय ? मागील चौदाव्या अध्यायात देवदेवतांपेक्षा सद्‌गुरुची सेवा श्रेष्ठ असे निरुपण चालले आहे. पंधराव्या अध्यायात 'जनांचे पाखांड भूते भजन' यांचे वर्णन सुरू होते. पण मध्येच ( कुणीतरी मध्येच घुसडून दिल्यासारखे ? ) चांदबोधले आणि त्यांचे माहात्म्य आले आहे आणि 'हे सांगावया काय कारण। म्हणती शेख महंमदालागून । कोठील पुसा कोणाचा कोण। या लागी प्रगटिले। अशी संपादणी केली आहे. आणि मागे राहिले होते अनुसंधान। जनांचे पाखांडभूते भजन । ते अवधारा पुढे सांगेन श्रोत्या प्रश्निका ॥' अशी जुळवणूक केली आहे. चवदा अध्याय 'योगसंग्राम' ऐकणाऱ्या ह्या 'श्रोत्या प्रश्निकाला' शेख महंमद 'कुठले कोण' हे ठाऊक नसावे काय ? आणि ते सांगताना एको-जनार्दनाचा आडवळणी उल्लेख कशाला ? याशिवाय आणखी एका फुटकळ अभंगात चांदबोधले यांचे नाव शेख महंमदाने दिले आहेत. आपल्या महिमावान गुरुच्या प्रत्यक्ष नावाचा केवळ दोनदाच उल्लेख केला आहे. आणि हेही नाम सय्यद चांदसाहेब कादिरी असे सूफी संप्रदायातले नसून 'चांद बोधले' असे हिंदू धर्तीचे आहे.

## २४. चांदबोधले :

श्री. बेंद्रे आणि डॉ. ढेरे यांच्या लिखाणाचा घाट असा की चंद्रभट हेच नाथांचे परमगुरु. त्यांनीच चतु:श्लोकी भागवतावर टीका करून नाथांना ग्रंथकार्यासाठी प्रवर्तविले. तेच पुढे चांदबोधले झाले. चांद कादिरी म्हणून सूफी झाले. जनार्दनस्वामींनी त्यांची कबरवजा समाधी देवगिरी किल्ल्याच्या प्रवेशद्वारासमोर बांधली. नाथ मात्र स्पष्टपणे आपल्या परमगुरुचे नाव सांगत नाहीत.

नाथांचा जीवनक्रम असा. पैठण सोडून ते देवगिरीस आले. तेथे त्यांना जनार्दनस्वामींचा गुरुपदेश लाभला. ते दोघे तीर्थयात्रेला निघाले असता सहज अनोळखी ब्राह्मणाकडे उतरावे तसे चंद्रभटाकडे उतरले. अर्थात् चंद्रभट हे जनार्दन–स्वामींचे गुरु निश्चितपणे नव्हेत.

ते नाथांना ग्रंथकार्याची प्रेरणा देणारे आचार्य ही नव्हेत. उदाहरणार्थ पुढील ओव्या पहा.

जनार्दन म्हणती एकनाथा । सांगतो वचन ऐक आता
श्रीदत्तवरद तुझिया माथा । लाधला अवचिता निजभाग्ये ॥

चतुःश्लोकी जे भागवत । चंद्रभटे आणिलेसें सांगात
त्यावर टीका करावी प्राकृत । प्रांजळ बहुत ये स्थानी ।।[३३]

अर्थात् इथे श्रीदत्तात्रेयाने ग्रंथकार्यासाठी प्रवर्तविल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. चंद्रभटाने भागवत संस्कृतात वाखाणिले होते इतकेच.

असा हा व्युत्पन्न, भागवताचा अभ्यासक, वैष्णववीर पुढे सूफी झाला हे म्हणणे मनाला पटत नाही. सूफी होऊन त्याने केले काय तर

डोहो अखंडित
निजसंतांचा एकान्त
तेथे चांदबोधले जीवन्मुक्त
डोहो होऊनि खेळत रे[३४]

अशी कालियामर्दनपर, कृष्णभक्तीपर पदे. यासाठी सूफी कशास व्हावे लागते. बरे सूफी झाल्यावर त्यांना चांदबोधले हे नाव कसे चिकटले ?

## २४. शेखमहंमदाचा गैरसमज :

कृष्णदास जगदानंदनंदन, शिवरामस्वामी कल्याणीकर, गंगानाथ आणि गोपाळनाथ ह्या मठांच्या परंपरा शेख महंमदाला उत्तरकालीन आहेत. स्वतः शेख महंमदही चांद कादिरीच्या आयुष्याच्या अगदी शेवटी शेवटी त्यांना अनुसरले. हे त्यांच्या 'सरता किंकर जाहलो साचार', या उद्‌गारावरून स्पष्टच आहे.

जनार्दनस्वामी हे शके १४९७ मध्ये समाधिस्थ झाले.[३५] श्री. बेंद्रे-ढेरे मतानुसार चांद बोधले हे त्यांचे गुरु. त्यांची कबरवजा समाधी जनार्दन-स्वामींनीच बांधली. त्यांच्या आधी किमान ५ वर्षे म्हटली तरी शके १४९२ हा चांद बोधल्यांचा समाधीकाळ येतो. शेख महंमदाचा मृत्यू इ. स. १६६०च्या सुमाराचा (शके १५८२) आहे. त्यांना पूर्ण एक शतकाची आयुर्मर्यादा दिली तरी त्यांचा जन्मकाळ शके १४८२ असा येईल. अर्थात् चांद बोधले वा चांद कादिरी ह्यांच्या समाधीप्रसंगी ते अवघे १०-१२ वर्षे वयाचे असावेत. त्यांनी इतक्या लहान वयात चांद कादिरींचे शिष्यत्व पत्करले कारण चांद कादिरी हे शेख महंमदाच्या पित्याचे – राजे महंमदाचे – शिष्य होते. अशा अवस्थेत शेख महंमद जे काही सांगतात त्यावर जपूनच विश्वास ठेवावयास हवा.

जनार्दनपंत देवगिरीचे किल्लेदार. चांदकादिरी, राजेमहंमद, शेख महंमद आदी देवगिरी येथेच असत. अशा अवस्थेत जनार्दनस्वामी चांद कादिरी

यांच्याशी आदरयुक्त वर्तन ठेवीतही असतील. किल्लेदार हृया नात्याने आणि अध्यात्ममार्गी स्नेही हृया नात्याने त्यांनी त्यांची कबर बांधायलाही मदत केली असेल. हे पाहून अल्पवयी, अजाण शेख महंमदाला आपले गुरू, तेच जनार्दन स्वामींचे गुरु असे वाटले असणे स्वाभाविक आहे. तोच गैरसमज त्याने नोंदविला आहे. तोच शिवरामस्वामी कल्याणीकर, गंगानाथ–गोपाळनाथ मठ–परंपरेत शिरला आहे अशी भावना होते.

अन्यथा जनार्दनस्वामींनी ज्यांची कबरवजा समाधी राजरोसपणे बांधली त्या आपल्या परमगुरुचे नाव एकनाथ महाराज कशाला लपवतील ?

## २५. श्रीएकनाथांचे क्रांतिकारी व्यक्तिमत्त्व :

एकनाथांनी हिंदू–तुर्क संवाद आदी प्रकरणे रचून मुसलमानांवर आणि पीरांची आदी पूजा करणारांवर कडक टीका रचली आहे म्हणून त्यांनी आपल्या मुसलमानी परमगुरुचे नाव अज्ञात ठेवले असे म्हणणे बरोबर दिसत नाही. नाथांचा कडाका अर्थातच मुसलमानांच्या बाह्य आचरणावर आहे. बाह्य आचरणाला महत्त्व देणाऱ्या ब्राह्मणांवरही त्यांनी ' ब्राह्मण–महार ' संवादाद्वारे कोरडे ओढले आहेतच. स्वतःच्या परमगुरुविषयी ते समाजाच्या भीतीने मौन पाळतील असे वाटत नाही. उलट त्याकाळी तर कितीतरी ब्राह्मण कुटुंबे पीरा–अवलियांच्या नादी लागली होती. वेदमूर्ती सुलतानभट्ट अशी नावे ठेवली जात होती. परतूर (जि. जालना) येथील देशपांडे घराणे एका बोधले बाबा नामक पीराचे उपासक आहे. ते रोजे पाळतात. तेव्हा नाथांना समाजाची भीती वाटली वगैरे म्हणण्यात स्वारस्य नाही.

शिवाय नाथांनी आपल्या परमगुरुचे नाव लपवायचे आणि त्यांना अगदी समकालीन असणाऱ्या शेख महंमदाने ते उघड सांगायचे म्हणजे आपण तोंडावर पडू एव्हढी तरी समज नाथास असेल असे आम्ही गृहीत धरतो.

महाराजांना श्राद्धभोजन घालणारे, अंत्यजाचे मूल तापल्या वाळूतून उचलून आणणारे, गर्दभास गंगाजल पाजणारे, ब्राह्मण–महार संवाद लिहिणारे नाथ परमगुरुचे नाव लपवतील हे खरे वाटत नाही.

आपले गुरू शेख महंमद हे मुसलमान असल्याचे मुधा पांगुळ स्पष्टपणे सांगतो, त्याच्याही पेक्षा नाथ दुर्बल हृदयाचे होते काय ?

## २६. काही विसंगती :

श्री. बेंद्रे आणि ढेरे यांनी स्वतःला अभिप्रेत असलेली नाथांची गुरु-परंपरा सिद्ध करण्यासाठी उलट–सुलट विधाने केली आहेत.

चंद्रभट हा ब्राह्मण. याचेकडे आपण ' दैवयोगे फेरी स्वभावे गेलो ' असे नाथ म्हणतात. बेंद्रे हे तेथे नाथ तेथे मुद्दाम आडवळणाने गेले असे म्हणतात. [३६] हा चंद्रभट म्हणजेच चांदबोधले, तोच चांदसाहेब कादिरी, तोच चंद्रबोध, तोच चंद्रआश्रम, तोच चंद्रशेखर महासाधू अवतार प्रसिद्ध दत्तात्रेयाचा. चांदबोधले म्हणजेही दत्तावतारी सत्पुरुषच.

चंद्रशेखराचा गुरू दत्तात्रेय, चंद्रबोध, चंद्र आश्रम ह्यांचा गुरुही दत्तात्रेय, चांदबोधल्यांचे गुरुही दत्तात्रेयच. शिवाय चांदबोधले म्हणजेच चांद कादिरी आणि त्याचे गुरु म्हणजे राजे महंमद.

आता यासर्वच गोष्टी एकाच व्यक्तिमत्त्वात कशा बसणार ? पुन्हा ह्या कादिरी शाखेचा मळ पुरुष महंमद गौस कादिरी हा विख्यात सूफी होता असे म्हणायचे आणि खुद्द त्याच्याविषयीच चुकीची माहिती शेखमहंमदाच्या मठातून निघायची आणि या आधारांवर महापुरुष नाथांना खोटे ठरवायचे. असा हा प्रकार आहे. यात स्पष्टपणेच दिसणारी विसंगती अशी

१. स्वतः श्रीएकनाथ आपल्या परमगुरुचे नाव स्पष्टपणे पौराणिक दत्त असे सांगतात. त्यांच्याकडेच रहाणारा त्यांचा नातू मुक्तेश्वरही तेच सांगतो.

२. त्यांना थोडासा उत्तरकालीन असलेला शेखमहंमद ते ' चांदबोधले ' आहे असे अनाहूतपणे अप्रासंगिकरीत्या सांगतो.

३. गंगानाथ मठपरंपरेत त्याचे नाव चंद्रबोध असे येते.

४. नाथानंतर एक शतकभराने लिहिणारा शिवरामस्वामी ते चंद्र-आश्रम असल्याचे सांगतो.

५. नाथांच्या एक बनावट चरित्रात ते चंद्रशेखर असे येते.

६. म्हणजेच चंद्रभट, चांदबोधले, चंद्रबोध, चंद्रआश्रम, चंद्रशेखर ही हिंदू नावे आहेत.

७. केवळ शिजरा–जदि–कादिरीमध्ये ते सय्यद चांदसायेब कादिरी असे येते. ही परंपराही अतिशय चुकीची आहेच. स्वतःची गुरुपरंपरा कादिरी असल्याचे शेखमहंमदही कुठे सांगत नाही. आणि तरीही स्वतःची सूफी गुरु-परंपरा लपविल्याविषयी नाथांना दोष द्यायचा हा काय प्रकार आहे. ?

## २७. स्वतः एकनाथांची साक्ष :

अशा अवस्थेत नाथांच्या गुरुपरंपरेविषयी स्वतः नाथांचीच साक्ष प्रमाण मानली पाहिजे. आपले गुरू जनार्दनस्वामी आणि त्यांचे गुरू पौराणिक दत्त असे नाथांनी स्पष्टपणे नोंदविले आहे.

करी सृष्टीचे रचन
तया न कळे ब्रह्मज्ञान
तो श्रीनारायण
शरण रिघे ।।
न कळे न कळे ब्रह्मज्ञान
म्हणोनि धरीतसे चरण
नारायण परिपूर्ण
उपदेशी ब्रह्मा ।।
ब्रह्मा अत्रिते सांगत
ब्रह्मज्ञान हृदयी भरत
अत्रिकृपे पूर्ण स्थित
दत्तात्रेय सांगतसे ।।
दत्तात्रेय कृपे पूर्ण
जनार्दनी पूर्ण ज्ञान
जगचि संपूर्ण
एकरूप तयासि ।।
एका जनार्दनी पूर्ण
ब्रह्मज्ञानाची खूण
बोधोनिया संपूर्ण
मिळविणे आपणीया ।। ३७

किंवा

आता नमू दत्तात्रेया
जो कां आचार्यांचा आचार्या
तेणे प्रवर्तविले ग्रंथकार्या
अर्थवावया निजबोधू ।।
... . .... ....... . ...... .. .....
दत्तात्रेय शिष्यपरंपरा
सहस्रार्जुन यदु दुसरा
तेणे जनार्दन तिसरा
शिष्य केला खरा कलयोर्गा ।। ३८

आणि यापेक्षाही स्पष्ट उल्लेख

गुरुप्राप्तीलागी सर्वथा
थोर जनार्दनासी चिंता

विसरला तिही अवस्था
सद्गुरु चिंतना चिंतनी ॥
देवो भावाचा भोक्ता
दृढ जाणोनी अवस्था
येणे झाले श्रीदत्ता
तेणे हात माथा ठेविला ॥
हात ठेवताचि तात्काळ
बोधु आकळिला सकळ
मिथ्या प्रपंचाचे मूळ
स्वरूप केवळ स्वबोधे ॥
कर्म करोनि अकर्ता
तोचि अकर्मात्मबोधु जाहला देता
देही असता विदेहता
देही तत्त्वतां आकळिली ॥
..............................
पूजा विधी करोनिया
जव जनार्दनु लागला पाया
तव गुप्त जाहला दत्तात्रेया
योगमायेचियेनि योगे ॥[३९]

इतक्या स्पष्ट शब्दात नाथांनी आपल्या परमगुरुचे नाव श्रीदत्तात्रेय सांगितले आहे. दत्तवर्णनपर नाथांचे काही अभंगही आहेत. भिक्षुगीताच्या शेवटीही नाथ

माझे निजगुरुचाही गुरु । श्रीदत्त परमगुरु
तो भिक्षुगीतार्थे साचारु । योग्या योगेश्वरु तुष्टला ॥ १००० ॥ [४०]

यात नाथांनी आपल्या परमगुरुचे नाव कौशल्याने अज्ञात ठेवले याचे तर अजिबात सूचन नाहीच उलट

त्या सद्गुरुची कथा । चुकूनी जाहलो बोलता
हा अपराध माझे माथा । ...

असे परमगुरुचे नाव प्रकट केल्याविषयीचे दिलगिरीचे बोलच नाथ बोलत आहेत.

## २८. नाथांच्या शिष्यसंप्रदायातील रूढ गुरुपरंपरा :

नाथांच्या शिष्यपरंपरांच्या अनेकानेक शाखा महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रात नांदत आहेत. त्यापैकी काहींच्या गुरुपरंपरा अशा

१. नाथांचे पणतू प्रख्यात कवी मुक्तेश्वर. हे नाथांच्याच घरी रहात होते. ते आपली गुरुपरंपरा अशी सांगतात

ॐ नमोजी विश्वंभरु । तो देव दत्तात्रेय जगद्गुरु
जनार्दना अभयकरु । कटाक्षेसि बाणला ।।
( मुक्तेश्वरकृत नाथचरित्र )

अर्थात् यातून श्रीदत्तात्रेय–जनार्दन–एकनाथ हीच गुरुपरंपरा निघते.[४१]

२. केशवाने दिलेली गुरुपरंपरा आदिनारायण–ब्रह्मा–अत्रिनाथ-दत्तात्रेय–जनार्दन–एकनाथ–राघव–माधव–त्र्यंबक–केशव अशी आहे. त्याला बोध देणारे पुरुष नाथांच्या वंशातील आहेत.[४२]

३. नाथांची एक शिष्यशाखा आजही आंध्र प्रदेशात नांदते आहे. त्यांची गुरुपरंपरा दत्त–जनार्दन–एकनाथ अशीच आहे. सीताराम–आंजनेय संवाद लिहिणारा लिंगमूर्ती ह्याच परंपरेतील आहे.[४३]

४. हेर्ले येथील श्रीविश्वंभरस्वामींच्या वृंदावनावरील लेखात दत्तात्रेय–जनार्दन–बाळकृष्ण–विठ्ठलकृष्ण अशी परंपरा उल्लेखिलेली आहे.[४४]

५. श्री. रा. ग. हर्षे यांनी 'ज्ञानदेवी' संशोधनासाठी ज्या प्रती जमविल्या त्यातील आनंदाश्रम प्रतीत (शके १५६५) रामाजी जनार्दन बहादूर-पूरकर याने आपली गुरुपरंपरा श्रीदत्तात्रेय-जनार्दन-एकनाथ–भिकाजी–रामाजी अशी दिली आहे.[४५]

६. याच ज्ञानदेवी संपादनासाठी संग्रहित पोथ्यांपैकी चांगदेव मठातील पोथीत श्रीदत्तात्रेय–जनार्दन–एकनाथ–चिदानंद–स्वानंद इत्यादी परंपरा आहे.

७. याच ज्ञानदेवी ग्रंथासाठी संग्रहित पोथ्यांपैकी तंजावर क्र. २ या पोथीत अतिशय सुंदर श्लोकातून श्रीदत्तात्रेय–जनार्दन–एकनाथ–गोपाल अशी परंपरा आहे. यात 'दत्तात्रे अवधूतं ममपरमगुरो योगचंद्रं भजामि' या श्लोकात दत्तात्रेयाला योगचंद्र हे विशेषण लावले आहे ते चिंत्य आहे.[४६]

८. सुर्जी अंजनगाव येथील देवनाथ मठाची गुरुपरंपराही नारायण–विधी–अत्रि–दत्तात्रेय–जनार्दन – एकनाथ – नित्यानंद – कृष्णनाथ – विश्वनाथ मु-हारनाथ–श्रीरंगनाथ–गोपालनाथ–गोविंदनाथ–देवनाथ–दयाळनाथ– जयकृष्ण बाळकृष्ण–रामचंद्र–भालचंद्र – मारुती – गोविंदनाथ – मनोहरनाथ अशी आहे. मनोहरनाथ सध्या गादीवर आहेत. ही परंपरा स्वतः मठाधिपती मनोहरनाथ महाराज ह्यांनी दिली आहे.[४७]

९. बीड येथील ढोकळे विठोबाच्या मंदिरातील सत्पुरुषांची परंपरा.

आदिनारायण उपदेश । ब्रह्मयासि केला
ब्रह्मा जो बोळला । अत्रिलागी ।।

अत्रिच्या प्रसादे । दत्तात्रेय झाला
अकल्पित लाधला । जनार्दना ।।

जनार्दन कृपे । येकपण उभा
गुरुत्वाची प्रभा । जीवानंद ।।

जीवाला प्रसादे । पुंडलिक झाला
तोचि तो लाभला । भानुदासा ।।

भानुदासा कृपे । आदिनाथ झाला
आदिमूळ लाभला । जगन्नाथ ।।

जगन्नाथ सेवेसी । विश्वनाथ झाला ।
प्रेमभावे सेवा । केली त्याने ।।

विश्वनाथ कृपे । आदिनाथ झाला ।
चरणावरी माथा । ठेवियेला ।।

ही परंपरा बीड येथील विठ्ठल-राम मंदिर येथील मठाधिपती श्री. उमाकांतबुवा गोविंदबुवा गोसावी ह्यांच्याकडून मिळाली. आम्ही त्यांचे आभारी आहोत.[४८]

तस्मात श्रीएकनाथ महाराजांनी आपल्या परमगुरुचे नाव लपवून ठेवले असे म्हणता येणार नाही. दत्त–जनार्दन–एकनाथ या स्वतः नाथांनीच सांगितलेल्या परंपरेला बाध येऊ शकत नाही.

## संदर्भ टीपा :


१. वा. सी. बेंद्रे, योगसंग्राम पृ. १६
२. तत्रैव, अध्याय १५. ओवी १
३. तत्रैव, पृ. १६
४. डॉ. रा. चिं. ढेरे, विविधा. पृ. १३९–१४०
५. डॉ. रा. चिं. ढेरे, श्रीनृसिंह सरस्वती, चरित्र आणि परंपरा, पृ. १३१
६. डॉ. रा. चिं. ढेरे, विविधा. पृ. १४२
७. तत्रैव
८. वा. सी. बेंद्रे, योगसंग्राम पृष्ठ ९ वरील महिपतीचे उद्धरण.

९. तत्रैव, पृ. १० वरील महिपतीचे उद्धरण.
१०. वा. सी. बेंद्रे, तुकारामाचे संतसांगाती पृ. ७८–७९
११. चंद्रबलि पांडेय, तसव्वुफ अर्थात् सूफीमत पृ. १२७
१२. सेतुमाधवराव पगडी, सूफी संप्रदाय पृ. १४
१३. तत्रैव, प्रकरणे ८–१४
१४. वा. सी. बेंद्रे, योगसंग्राम अध्याय १५ ओवी १
१५. तत्रैव, पृ. ३३ वर शिवरामस्वामीचे उद्धरण
१६. तत्रैव, पृ. ३२ वर मुकुंदराजाचे उद्धरण
१७. डॉ. रा. चिं. ढेरे, विविधा. पृ. १३८–१३९
१ . तत्रैव.
१९. तत्रैव.
२०. गुलाम सरवर, खजानेयत–उल–अस्फीया
२१. तत्रैव.
२२. वा. सी. बेंद्रे योगसंग्राम. पृ. १६
२३. गुलाम सरवर खजानेयत–उल–अस्फीया
२४. डॉ. म. रा. जोशी. विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक १९७१ पृ. १४३
२५. डॉ. वा. सी. बेंद्रे. योगसंग्राम पृ. ३२–३३
२६. दासविश्रामधाम, कांड ९२ ओवी ७३–७५
२७. र. ह. कोटणीस, नाथांची चरित्रे, एकनाथदर्शन खंड १ ला पृ. २५४
२८. र. ह. कोटणीस, प्रतीष्ठानचरित्र परिशिष्ठ
२९. तत्रैब, पृ. ११४
३०. ज. र. आजगावकर, महिपतीकृत एकनाथ–तुकाराम चरित्र
३१. वा. सी. बेंद्रे, योगसंग्राम पृ. ३५
३२. तत्रैव, पृ. २९
३३. महाराष्ट्र–सारस्वत, पाचवी आवृत्ती ( १९६३ ) पृ. १९४
३४. वा. सी. बेंद्रे, शेखमहंदबाबा यांचा कवितासंग्रह पृ. १३४
३५. डॉ. रा. चिं. ढेरे, दत्तसंप्रदायाचा इतिहास पृ. १३५
३६. वा. सी. बेंद्रे, योगसंग्राम पृ. ३५
३७. एकनाथी भागवत, अध्याय १
३८. तत्रैव
३९. तत्रैव

४०. ल. रा. पांगारकर, श्रीएकनाथ–चरित्र ( चर्तुथावृत्ति. १९२७ ) पृ. ३६ वर उद्‌धृत.

४१. पां. ना. कुलकर्णी, संशोधन–धारा. पृ. ३८

४२. डॉ. रा. चिं. ढेरे, विविधा पृ. १२०

४३. डॉ. श्री. रं. कुळकर्णी, नवनीत. ऑगस्ट ७१

४४. पां. ना. कुळकर्णी, संशोधनधारा. पृ. ६०–६१

४५–४६. रा. ग. हर्षे, ज्ञानदेवी. प्रस्तावना. पृ. १२–२०

४७. ना. दि. मायी, शरनीरा. पृ. २३

४८. उमाकांतबुवा गोसावी, बीड ह्यांनी दिलेली माहिती.

* *

२९९५

# राजमठाचे नसलेले रहस्य

## १. श्रीगोविंदप्रभूंचा राजमठ :

ऋद्धिपुरात श्री गोविंदप्रभू ज्या मंदिरात निवास करीत ते मंदीर राजमठ ह्या नावाने पंथात प्रसिद्ध आहे. हे मंदीर ऋद्धिपुरच्या महाजनांकडून म्हाइंभट ह्यांनी विकत घेतले आणि त्यावर ' तांबेयाचे पत्र ' केले. म्हणजेच ही खरेदी त्यांनी ताम्रपटावर नोंदविली. यानंतर श्री गोविंदप्रभू तेथे कायम निवासासाठी आले. आणि ह्या वास्तुला राजमठ हे नाव प्राप्त झाले असे समजले जाते.

ह्या ' राजमठ ' संज्ञेचा शोध घेणारा एक विस्तृत आणि अभ्यासपूर्ण लेख डॉ. रामचंद्र चिंतामण ढेरे ह्यांनी प्रकाशिला आहे.[१] हा लेख दीर्घ खरा पण त्यातील डॉ. ढेरे ह्यांची विधाने विवाद्य आणि ठिसूळ पायावर आधारलेली आहेत. महानुभाव पंथ आणि यक्षोपासना ह्यांचा सांधा जोडण्याचा त्यांचा प्रयत्न अकारण आणि दूरान्वयीत आहे. तो अभ्यासकांच्या आणि महानुभावीय उपासकांच्या मनातही अकारण गैरसमज निर्माण करणारा आहे. तस्मात् त्यांचे परीक्षण करणे अतिशय आवश्यक ठरते. आणि म्हणूनच आम्ही ह्या प्रपंचास उद्युक्त झालो आहोत.

## २. मूळ आधारच डळमळीत :

डॉ. ढेरे ह्यांच्या विस्तृत प्रतिपादनाचा मूळ आधार ' राजमठ म्हणजे नृसिंहमंदीर ' हा होय. पण हे गृहीत कृत्यच मुळात चुकीच्या पायावर आधारित आहे. कसे ते पहा.

डॉ. ढेरे म्हणतात ' राजमठ ही संज्ञा केवळ ऋद्धिपुरातील श्रीनृसिंह मंदीरापुरती मर्यादित नाही. **महानुभाव पंथीयांमध्ये कोणतेही नृसिंहमंदीर ' राजमठ ' म्हणून ओळखले जाते**. नरसिंह मठालाच राजमठ ही संज्ञा देण्याचा

प्रघात आहे असे (कै) डॉ. य. खु. देशपांडे लिहीतात. डॉ. वि. भि कोलते ह्यांनी स्पष्ट केले आहे की महानुभाव पंथात त्यांचे ईश्वरावतार–**विशेषत: श्री गोविंदप्रभू आणि श्रीचक्रधर स्वामी–ज्या ज्या नृसिहमंदीरात राहिले ती सर्व नृसिहमंदीरे राजमठ ह्या संज्ञेने ओळखली जातात** '

आम्ही डॉ. य. खु. देशपांडे [२] आणि डॉ. वि. भि. कोलते [३] ह्यांचे ग्रंथ मुळातून तपासून पाहिले. ह्या दोन्ही विद्वानांनी आपल्या विधानांना कसलाही आधार दिलेला नाही. शिवाय डॉ. य. खु. देशपांडे ह्यांच्या मते कोणतेही नृसिहमंदीर राजमठ ओळखले जाते. तर डॉ. वि. भि. कोलते ह्यांच्या मते केवळ महानुभावांचे ईश्वरावतार आणि त्यातही विशेषत: श्रीगोविंदप्रभू आणि श्रीचक्रधरस्वामी ज्या नृसिहमंदिरात राहिले तीच नृसिहमंदीरे राजमठ ह्या नावाने ओळखली जातात. ह्या दोन्ही विधानातील अंतराय जाणत्यांच्या सहज ध्यानी येणारा आहे.

बरे, ही आधारहीन विधाने स्वीकारली तरी ती पूर्णत: खरी नाहीतच हे आपण पुढे पहाणार आहोतच. तेव्हा अशा ह्या आधारहीन विधानांच्या पोकळ काष्ठस्तंभावर श्रीनृसिंहविषयक संशोधनाची इमारत डॉ. ढेरे ह्यांनी उभारावी याचे सत्कृद्दर्शनीच आश्चर्य वाटल्यावाचून रहात नाही.

### ३. कृष्णमुनी कवी डिंभ ह्याची साक्ष :

वरील आधारहीन विधाने घेऊन ती सिद्ध करण्यासाठी डॉ. ढेरे ह्यांनी कृष्णमुनी कवी डिंभ ह्याच्या काही ओव्या उद्‌धृत केल्या आहेत. [४] त्या अशा.

नृसिहे जेथ केली वसति । तेथ नृसिहमठ केला निगुती
तयासी राजमठ म्हणती । कलयुगी मुनीजन ॥ ४-१४ ॥
जेथ भयंकर रूप तेजिले । तेथ विश्वकर्मेनि नृसिंहालय केले
तयासी मुनीजनी ठेविले । राजमठ ऐसे ॥ ३७ ॥

येथे स्पष्टच दिसते की या दोन्ही ओव्यात श्रीनृसिंह मंदिराला आधी 'नृसिहमठ' अथवा 'नृसिहालय' असे म्हणून मगच त्याचा राजमठ हा पर्याय कृष्णमुनी कवी डिंभाने दिला आहे. यातून असा स्पष्ट ध्वनी निघतो की फक्त 'मुनीजनच' म्हणजे केवळ महानुभाव नृसिहमंदिरास राजमठ म्हणतात.

तयासी राजमठ म्हणती । कलयुगी मुनीजन ॥
तयासी मुनीजनी नाव ठेविले । राजमठ ऐसे ॥

या दोन्ही ओव्या पुरेशा बोलक्या आहेत.

कृष्णमुनी कवी डिंभ हा भरमसाठ अतिशयोक्तीने लिहिणारा, नव्या कथा आणि संकल्पना (Myths) ह्यांचा व्यर्थ फापटपसारा निर्माण करणारा उत्तरकालीन कवी आहे. त्याच्या काव्यांची शास्त्रशुद्ध चिकित्सा न करता डॉ. ढेरे त्याच्यावर विसंबले आहेत. त्याच्या साहित्यातील ह्या व्यर्थ निर्माण केलेल्या कल्पना–कथांविषयी आम्ही विस्तृत विवेचन अन्यत्र केले आहेच. (चक्रपाणी–चिंतन पृ. ५९–६९ पहा)

## ४. स्थानपोथीतील पाठभेद :

हीवरळी ( हल्लीचे जालना ) येथेही राजमठ नामक वास्तुमध्ये श्री चक्रधरस्वामींचा निवास घडला होता. मूळ लीळाचरित्रात आणि स्थानपोथीत केवळ राजमठ ह्या वास्तूचा उल्लेख आहे. लीळाचरित्रात हीवरळी ( जालना ) संबंधी जेव्हढ्या लीळा आहेत त्यात राजमठातील देवतेचा उल्लेख नाही. स्थानपोथीतील स्थानवर्णनातही ह्या राजमठातील देवतेचा उल्लेख नाही.

डॉ. वि. भि. कोलते ह्यांनी ' स्थानपोथी ' ह्या ग्रंथाचे संपादन करण्यासाठी ज्या हस्तलिखित पोथ्या मिळविल्या त्यातील 'क' आणि 'ख' ह्या प्रतीत

'दुर्गादक्षिणे गांवातु नरसिंहमठू : तयाचे महानुभावी नाव ठेविले राजमठू:'[५] असे वाक्य येते. ते पाठभेद म्हणून डॉ. वि. भि. कोलते ह्यांनी नोंदविले आहे. ह्या ' क ' प्रतीच्या कालाविषयी कसलेही विवेचन डॉ. वि. भि. कोलते ह्यांनी केलेले नाही पण ह्या पोथीत मूळ म्हणून स्वीकारलेल्या मजकुरापेक्षा बराच जास्त मजकूर आहे हे त्यांचे मत ध्यानात ठेवण्यासारखे आहे. या ' क ' प्रतीवर कृष्णमुनी कवी डिंभाचा तर प्रभाव नसावा ना अशी शंका सहजपणे निर्माण होते.

या सर्व विवेचनांवरून जे निष्कर्ष निघतात ते असे.

१. केवळ महानुभाव पंथीय लोकच नृसिंहमंदिराला ' राजमठ ' म्हणतात असा कृष्णमुनी कवी डिंभाचा अभिप्राय आहे.

२. ' राजमठ ' नामक ज्या वास्तूमध्ये उभय–अवतारांचे (श्रीगोविंद–प्रभू आणि श्रीचक्रधरस्वामी ह्यांचे) निवास घडले. त्यातील देवता–विग्रहाचे उल्लेख श्रीगोविंदप्रभूचरित्रात अथवा लीळाचरित्रात मुळात नाहीत.

३. अर्थात् राजमठांना नृसिंहमंदिर म्हणणे ही महानुभावांमध्ये उत्तरकालीन प्रवृत्ती आहे. ही उत्तरकालीन प्रवृत्ती कृष्णमुनी कवी डिंभासारख्या कल्पनांच्या बेलगाम वारूवर स्वार होणाऱ्या कवींकडून निर्माण झाली असण्याची शक्यता जास्त.



राजमठाचे

४. हीच प्रवृत्ती पंथात पसरत गेली. महानुभाव पंथीय महंतांनी हीच कथा (कै.) डॉ. य. खु. देशपांडे ह्यांच्या कानी घातली असावी. ती त्यांनी नोंदविली. त्याचाच अनुवाद डॉ. कोलते ह्यांनी केला. श्री. ढेरे ह्यांनी त्यावर आपल्या आधारहीन संशोधनाची इमारत उठविली हे चित्र आता स्पष्ट दिसते.

## ५. सर्वच नृसिंहमंदिरे राजमठ नव्हेत :

पण ही प्रवृत्ती उत्तरकालीन असल्याने लीळाचरित्रात वा श्रीगोविंद–प्रभूचरित्रात ज्या अनेकानेक नृसिह मंदिरांचे उल्लेख येतात त्या सर्वांनाच सरसकट राजमठ बनवून टाकणे महानुभावीयांनाही शक्य झाले नाही. ज्या नृसिंहमंदिरात श्रीगोविंदप्रभू अथवा श्रीचक्रधरस्वामी राहिले पण त्यांना राजमठ महानुभावांनीही म्हटले नाही अशी कितीतरी उदाहरणे दाखविता येतील.

१. नांदेड येथील नरसिह .. नांदेडी नरसिही अवस्थान[६]
... नृसिही भांडारेकारासी असक्ती उपनली

२. राहेर येथील नरसिंह ... नरसिंहू [७]

३. पैठण येथील नरसिंह ... अ) नरसिंहमढू जगती बाहेर उत्तरामुख[८]
ब) नरसिंहमठा अग्नेः गोदरीय बाईसांची भेटी[९]
... क) नरसिंह मठाचीयः जगतीबाहिर पसीमे पांडा १०ः पार्वती सोमनाथाचे देऊळः[१०]
... ड) नरसिंहापूर्वे नैऋत्येः जगती बाहिरः राजबीदीसि महादाश्रमाची भेटिः[११]

४. त्र्यंबक येथील नरसिंह ... त्रीयंबका नरसिंही अवस्थान[१२]

५. निफाडे येथील नरसिंह ... अ) गावापसिमे **नरसिंहमढ उत्तरामुख**[१३]
ब) नारायणमठा उत्तरे पांडा ३०ः **नदीचीए थडीए नरसिंहमढः पूर्वाभिमुखः** तेथ अवस्थानः दीस ७ः[१४]
क) मग नरसीह मठी अवस्थान जालेः[१५]

( यावरून निफाडे येथे दोन नरसींहमढ असावेत असे दिसते. )

६. सराळे येथील नरसिंह नरसिंहाचा मठी दीस ५ अवस्थानः लिंगा[१६]
वाव्ये पूर्वामुख नरसिंहमढूः तेथ अवस्थान[१७]

७. रावसगाव येथील नरसिंह मठ : अ) रामनाथी नरसिंही अवस्थान : दीस २०[१८]

ब) रामनाथा दक्षीणे नरसींह मठू : दक्षिणीली भींतीसी वोटा : पूर्व-पसीम : तेथ अवस्थान : दीक्ष १०[१९]

क) मग वोता वरलीकडे उतरले : पूर्व-भिमुख : नरसिंहाचे देऊळ : [२०]

८. बादाठाण येथील नरसिंह मठ : बादाठाणी वाव्य नरसीहमठू : गावातु ब्रह्मपुरीय नरसींहमठी अवस्थान : दीस ५[२१]

९. देऊळवाडा येथील नरसींहमठ : नरसींहाचेया उत्तरेचेया दारवंठेया बीजे करणे[२२]

: नरसींह चौकी आसन[२३]

: आता नरसींहाचे देऊळ : पसीमांमुख :

: आता नरसींहाचे चौकी आसन : पेखणे अवलोकणे : त्याग देणे : [२४]

१०. वाडेगाव येथील नृसिंहमंदिर : गोसावी नरसिंहाचेया देऊळा बीजें केले. [२५]

११. हातनौर येथील नृसिंहमंदिर : हातनौरांतु वाव्ये नरसींह पूर्वामुख : तेथ वस्ती : [२६]

१२. देऊळवाडा येथील नृसिहमंदिर : नरसिंहाचेया देऊळी भट एका कोणटा [२७]

१३. याशिवाय ऋद्धिपुरातील जे मंदिर उंचमढ म्हणून ओळखले जाई तेही नृसिहमदीरच असावे अशी शंका घेण्यास जागा आहे. स्थानपोथीतील पुढील वर्णन पहा.

ऊंचमढाचीए पाइरीया.. ......तथा दक्षिणे नरसिंहेसि खेळू : [२८]

वरील सर्व उदाहरणांवरून स्पष्टपणे दिसून येते की 'ज्या ज्या नृसिहमंदिरात उभय अवतारांचा निवास घडला ती सर्वच नृसिंहमंदिरे राजमठ म्हणून ओळखली जातात' हे विधान आधारहीन अतएव त्याज्य आहे. ज्या काही मंदिरांना राजमठ हे नाव पडले ते नृसिह या देवताविशेषावरून पडले असण्याची सुतराम् शक्यता नाही.

६. सामराज :

पण डॉ. ढेरे ह्यांचा अट्टाहास राजमठ हे नाव नृसिह ह्या देवताविशेषा-वरून पडले असेच दाखविण्याचा आहे. ते असे प्रतिपादन करितात की श्री नृसिंहालाच सामराज हे नाव आहे. साम-राज म्हणजे सौम्य नृसिह. अर्थात् साम म्हणजे सौम्य आणि म्हणून राजा म्हणजे नृसिह असे अजब गणिती समी-करण त्यांनी मांडले आहे. पैठणजवळ गोदातीरावर सेंदूरवादा आणि सांवखेड ही गावे आहेत. सेंदूरवादा ह्या गावाचे अपरनाम राजसदन असे आहे. डॉ. ढेरे ह्यांचे प्रतिपादन असे की ही दोन्ही ग्रामनामे सामराज ह्या नृसिंहनांवावरून पडलेली आहेत. शाम–साम–साव ह्या पूर्वपदार्धावरून सावखेड तर राज ह्या उत्तर–पदार्धापासून राजसदन हे नाव पडले असे त्यांचे प्रतिपादन आहे.

त्यांच्या ह्या प्रतिपादनातील घोटाळे अगदी सहज लक्षात येण्यासारखे आहेत, कसे ते पहा.

अ) सावखेड ह्या गावाचे नाव साव-साम-शामराज ह्या नृसिंह नावा-वरूनच पडले याला तरी आधार काय ? गाव आधी वसले आणि मग मूर्ती स्थापन झाली किंवा कसे हे तरी कोणत्या पुराव्याच्या आधारावर सांगता येईल ?

ब) शिवाय ह्या गावाचे प्राचीन नाव सांवखेड नाहीच मुळी. लीळा-चरित्रात तर ते स्पष्ट सांगवखेड म्हणून येते. उदाहरणार्थ

... (दाइंबा) उजुवाटा मध्याने रात्री सांगवखेडेया आले
... भूतानंदासि साती लेकी : एकी लेकि सांगवखेडा होती [२९]
... सांगवखेडा अवस्थान [३०]
... सांगवखेडा अदीती अवस्थान

अर्थात् सांगवखेडे (सावखेडे) येथे प्रख्यात नरसिंहमंदीर असून स्वामी आदित्य मंदिरात उतरले आहेत. हे उल्लेख पुरेसे स्पष्ट आहेत. अर्थात् सांवखेड हा सांगवखेड ह्या ग्रामनामाचा अपभ्रंश दिसतो.

क) शिवाय ‘सामराज’ ह्या नृसिंहनामाचे दोन खंड होऊन ‘साम-साव’ ह्या पूर्वपदाने सावखेड हे गाव वसले आणि उर्वरित ‘राज’ पदानें ५ मैल अंतरावरील ‘राजसदन’ (सेंदुरवादा) हे गाव वसले हा योगही अपूर्वच म्हणावा लागेल. शिवाय राजसदन हे सेंदूरवादा गावाचे पौराणिक वैकल्पिक अपरनाम आहे. ते जनसामान्यांच्या प्रचारात नाही हे वेगळेच.

ड) राजसदन (सेंदूरवादा) ह्या गावी श्रीनृसिंहमंदिर, श्रीनृसिंह–विषयक कथा, आख्यायिका ह्यांचा मागमूसही नाही. तरीही ते स्थान श्री-

नृसिंहाशी संबंधित असल्याचे श्री. ढेरे ह्यांनी प्रतिपादन करावे हे त्यांचे धाडस जबरच म्हणावे लागेल. सेंदूरवादा हे गणेशस्थान आहे. गणेश हा मूळचा यक्ष म्हणून राजा. म्हणून राजूर, राजनगाव अशी ग्रामनामे गणेशाशी संबंधित. अर्थात् राजसदन नावाचा नृसिंहाशी अजिबात संबंध नाही.

इ) बरे इतकेही करून सामराज ह्या पदातून राजा म्हणजे नृसिंह हा अर्थ डॉ. ढेरे कसा काय काढतात देव जाणे. विष्णू, शिव, दत्तात्रेय, श्रीकृष्ण आदी अनेक देवतानामांची वैकल्पिक रूपे 'राज' पदान्त आहे. उदाहरणार्थ नटराज, केशवराज, मोहिनीराज, गोविंदराज, गोपाळराज, वरदराज इत्यादी रूपे पहा. या ठिकाणी 'राज' पद महत्ता, गौरव आणि वैभव व्यक्त करीत नाही काय ? यातून शिव म्हणजेच राजा अथवा विष्णू म्हणजेच राजा, अशी निरर्थक समीकरणे मांडणे कितपत योग्य होणार आहे ?

## ७. राजा म्हणजे स्वामीही :

पण तरीही श्रीनृसिंह हा राजा म्हणविला जातो असे आधारहीन विधान करून डॉ. ढेरे राजा म्हणजेच यक्ष ह्या समीकरणाकडे वळले आहेत. आणि ज्याअर्थी कुबेर ह्या यक्षांच्या स्वामीला 'राजराज' म्हणतात त्याअर्थी राजा म्हणजे यक्ष हे समीकरण त्यांनी मांडले आहे.

पण आमच्या मते एव्हढ्या द्राविडी प्राणायामाची गरजच नव्हती. राजा ह्या शब्दाचा एक अर्थ यक्ष असा होतो हे अमरकोशाने स्वच्छच नोंदविले आहे.

राजा प्रभौ नृपे चंद्रे यक्षे क्षत्रिय कक्षयो :[३१]

हे अमर कोशातील वचन सुप्रसिद्धच आहे. पण शामराज म्हणजे सौम्य नृसिंह असा अर्थ घेतला तरी राजा म्हणजे नृसिंह आणि ज्याअर्थी राजा म्हणजे यक्ष त्याअर्थी नृसिंह म्हणजेही यक्षच असाच अर्थ का घ्यायचा ह्याचे कसलेही स्पष्टीकरण डॉ. ढेरे ह्यांनी दिलेले नाही. शामराज ह्या नृसिंहनामातील 'राजा' ह्या पदाचा अर्थ स्वामी असा का घेऊ नये याचे काहीही स्पष्टीकरण डॉ. ढेरे ह्यांनी दिलेले नाही.

अशा अत्यंत डळमळीत पुराव्याच्या आधारावर आपल्या कपोलकल्पित प्रमेयांची उभारणी करून डॉ. ढेरे श्रीनृसिंहाचे यक्षरूप सिद्ध करण्यासाठी प्रख्यात महानुभाव कवी नवरसनारायण ह्यांच्या शल्यपर्वाकडे वळले आहेत. शल्यपर्वातील शकुनीचे नरसिंह–साधन त्यांनी तपशीलाने वर्णन केले असून त्या आधारावर अनेक निष्कर्ष काढले आहेत.

## ८. शकुनीचे नरसिंहसाधन :

नवरस नारायण ह्या कवीच्या शल्यपर्व काव्यात शकुनीने पांडवाच्या नाशासाठी केलेल्या मंत्रतंत्राचे वर्णन आहे. शकुनी पांडवांचा नाश करण्यासाठी स्मशानात गेला. भुताखेतांना आव्हानून पांडवांचा नाश करण्यासाठी त्याने भुते आव्हानिली आणि ती पांडवसैन्यावर पाठविली. या भुताप्रेतांनी पांडवांच्या सैन्यात अतिशय अनर्थ मांडला. पण तो श्रीकृष्णाने आपल्या सामर्थ्याने निवारण केला.

या वर्णनानंतर शेवटी शकुनीने नरसिंहाचे आवाहन केले. मग नरसिंहाची अतिशय उग्र मूर्ती प्रकट झाली. यात प्रारंभापासूनच शकुनी नरसिंहसाधनेसाठी बसला होता असा ध्वनी डॉ. ढेरे का काढतात कोण जाणे ? त्यातही शकुनीने वेताळसाधना केली असे सांगत असता नरसिंहसाधन हे वेताळसाधनासारखे अथवा यक्षिणीसाधनासारखे आहे हे लिहिण्याची त्याची हातचलाखी और आहे.

नवरसनारायण हा नरसिंहाला वारंवार वीर म्हणतो असे डॉ. ढेरे दडपून लिहितात आणि नवरस नारायण नरसिंहाचा समावेश बावनवीरांमध्ये करतो असेही त्यांनी खुशाल लिहून टाकले आहे. यासाठी त्यांनी शल्यपर्वातील दुसऱ्या अध्यायातील ओवी क्र. २११, तिसऱ्या अध्यायातील ओवी क्र. ३५३, ३७५, ३८०, ३१४ आणि ३४९ या ओव्यांचे संदर्भ दिले आहेत. त्या ओव्या अशा

> बावनवीर अव्हानिले । नवनाटक असती आले ।
> सोळा चेटक चेटविले । स्मशानामाजी ।। २.२११ ।
>
> ......................................................
>
> एक स्मरती यकवीरा । येक बोबाती सिद्धेश्वरा ।
> यक म्हणती नरसिंहवीरा । ऐसे लोक नवसिताती ।। ३.२५३ ।।
> अवघा अग्नीचा कल्लोळ झाला । वीरवेताळ प्रकटला ।
> जनालागी प्रलयो केला । हलकल्लोळ ।। ३.२७५ ।।
> वीर वेताळ प्रकटला । म्हणोनी यव्हढा अग्नी कोपला ।
> मग श्रीकृष्ण बोलीला । ना भी ना भी म्हणौनी ।। ३.२८० ।।
> सकुनीया होमी बैसला । तेणे नरसिंहवीर चेतवीला
> तो जरी बाहिर निघाला । तरी घात सर्वांसी करील जान ।। ३.३१४

आणि तिसऱ्या अध्यायात ३४९ वी ओवीच नाही. ती आहे चवथ्या अध्यायात. आता यातून नरसिंहाला वारंवार वीर म्हटले आहे आणि शकुनीच्या बावन-

वीरात नरसिंहाचा समावेश आहे हे कसे समजावे ? उलट यातील दुसऱ्या अध्यायातील २५३ ओवी तर स्पष्टच सांगते आहे की भूतबाधापरिहारार्थ लोक नरसिंहाचे स्मरण करीत आहेत तसे ते एकवीरा, सिद्धेश्वर यांचेही करीत आहेतच. अशा अवस्थेत नरसिंह हा भुतावळीचा पुढारू आहे हे नवरस नारायणाला तरी मान्य नाही असेच दिसते.

## ९. नवरस नारायण–स्वतंत्र प्रज्ञेचा कवी :

नवरस नारायण हा स्वतंत्र प्रज्ञेचा कवी आहे. त्याने कित्येक प्रसंग स्वत: कल्पून शल्यपर्वात घातले आहेत. त्यातील अनेक प्रसंग मूळ महाभारतात नाहीत. त्या सर्वांची विस्तृत यादी शल्यपर्वाचे संपादक आणि प्रख्यात संशोधक गुरुवर्य डॉ. यू. म. पठाण ह्यांनी प्रस्तावनेत देऊन मूळ महाभारत आणि शल्यपर्व यातील कमीत कमी १४ प्रसंगांची तरी तफावत दाखविली आहे. [12] त्यात शल्याचे हे नृसिंहसाधन मूळ महाभारतात नाही असा स्वच्छ निर्वाळा डॉ. यू. म. पठाण ह्यांनी दिला आहे. मूळ महाभारताचे संकलन वा लेखन ज्या काळी झाले–अन्दाजे इसवीसनापूर्वी तीनशे– त्या काळात यक्षपूजा विशेषत्वाने प्रचलित होती. जैनधर्मग्रंथ, पतंजलीचे महाभाष्य, बौद्धधर्मग्रंथ, जातककथा, कथा, नाटके इत्यादीकातून त्या काळातील यक्षपूजेचे अनेकानेक उल्लेख येतात, यक्षांच्या मूर्ती मथुरा, पवाया, परखम, बडोदा, झींग–का–नगला, पटना, विदिशा, तक्षशिला, दीदारगंज, पितळखोरे आदी ठिकाणी सापडल्या आहेत. त्यांच्या उपासनेचा स्वतंत्र संप्रदाय असल्याचा उल्लेखही अभिलेखांमधून येतो. या संप्रदायासाठी 'गोष्टी' असा शब्द आलेला आहे.

असे असता ह्याच काळात रचल्या गेलेल्या महाभारतात शकुनीचे वीरसाधन अथवा नरसिंह साधन ह्यांचा मुळीच उल्लेख येत नाही हे विशेषत्वाने ध्यानात ठेवावे लागेल. आणि त्याबरोबरच हेही लक्षात ठेवावे लागेल की श्रीनृसिंहाचे 'यक्षत्व' सिद्ध करण्यासाठी डॉ. ढेरे ह्यांनी नोंदविलेले सर्वच आधार–नवरसनारायण, संतोषमुनी कृष्णदास, कृष्णमुनी कवी डिंभ, शहामुनी, आत्माराम, एकनाथ, रामदास ह्यांच्या रचनांमधील – हे शिवकालीन अथवा त्याही नंतरचे आहेत. सांस्कृतिक इतिहास संशोधनाच्या क्षेत्रात पुराव्याचा काटेकोरपणा अभिप्रेत नसतो हे मत एका मर्यादेपुरतेच सत्य आहे. कालानुक्रम, इतिहासातील राजकीय अथवा अन्य उलाढाली यांचा परिणाम सांस्कृतिक क्षेत्रात होतच असतो. तेव्हा उत्तरकालीन पुराव्यांच्या आधारे अनुमाने काढायची प्रवृत्ती इष्ट नव्हे.

## १०. महानुभावांवर निष्कारण आरोप :

डॉ. ढेरे ह्यांनी संतोष मुनी कृष्णदास, कृष्णमुनी कवी डिंभ शहामुनी आदी महानुभावीय कवींचे आधार घेऊन नृसिंहाचे 'वीरत्व' दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. नरसिंह हा यक्षिणीचा अवतार किंवा भुतावळीचा पुढारू असल्याचे दाखविण्याचा त्यांचा हा प्रयास आहे. यावर भाष्य करताना ते लिहीतात 'हे कवी महानुभाव पंथीय असल्यामुळे ते आपणास अमान्य असलेल्या देवतांचे विडंबन करतील ही शक्यता गृहीत धरली पाहिजे हे मला मान्य आहे.'

आम्ही आग्रहपूर्वक असे नमूद करितो की डॉ. ढेरे ह्यांचे हे विधान केवळ आधारहीनच नव्हे तर ते महानुभावपंथीयांवर अकारण अन्याय करणारे आहे. श्रीचक्रधरमुखीचे 'वैरीयाचा देवो झाला तरी तो काइ दगडे फोडावा' हे सूत्र महानुभावीयांना शिरसावंद्य आहे. त्यांनी वा त्यांच्यातील कविलेखकांनी आपणास अमान्य असणाऱ्या देवतांचे विडंबन करण्याचा कधीही प्रयत्न केलेला नाही.

वस्तुतः महानुभाव पंथीयांचे देवताचक्र हे स्वतंत्र प्रकरण आहे. यात देवतांचे थोवे ( थवे–समुदाय ) असून त्यातील काही देवता 'उचा' आणि काही 'निचा' आहेत. ( देवता एकी उचाः एकी नीचाः ) या पैकी यक्षिणी ह्या सर्वात खालच्या ९ व्या थोव्यातील देवता आहेत. महानुभाव तत्त्वज्ञाना-प्रमाणे 'विष्णू' हा अष्टभैरवांपैकी एक आहे. त्याने प्रेरणा केल्यामुळे यक्षिणीला नृसिंहअवतार घ्यावा लागला असे आहे. रामाविषयीही त्यांचे मत हेच आहे. अयोध्येतील 'राम अवतार' हा अष्टभैरवांपैकी विष्णुनामक ब्रह्मांडस्थ देवतेचा सात्विक विग्रह आहे असे महानुभावपंथीय मानतात ( राम शुद्ध सत्वाचा अवतारु ). उलट प्रल्हाद हा विष्णुदेवतेचा आणि हिरण्यकश्यपु हा रावणाचा भक्त होता. विष्णूने चेतविल्यामुळे यक्षिणीने नरसिंहाचा अवतार घेऊन हिरण्यकश्यपुला ठार मारले असे महानुभावांचे प्रतिपादन आहे. अर्थात् 'राम' नरसिंह हे विष्णू–अवतार आहेत ही धारणा महानुभावीयांनाही डावलता आली नाही हे स्पष्ट आहे.[३३]

## ११. शहामुनीचा सिद्धान्त बोध :

या प्रमाणे श्रीनृसिंह हा विष्णू–अवतार असल्याचे सत्य महानुभाव पंथीयांनाही मान्य असता डॉ. ढेरे यांनी शहामुनी ह्याची साक्ष काढली आहे आणि 'महानुभावीय आणि भागवत संप्रदायी अशा उभयविध संस्कारात

वाढलेल्या ' ह्या साधुकवीने नरसिंह हा यक्षिणीचा अवतार असल्याचे सांगितले आहे असे ते म्हणतात. त्याच्या 'सिद्धांतबोध' ह्या ग्रंथातील त्यांनी उद्धृत केलेल्या ओव्या अशा

नारसिंह अवतार घेवोनी यक्षिणी । प्रकटली विशाल स्तंभ चिरोनी ।
हिरण्यकश्यपु असुर विदारुनी । प्रल्हादा साह्य ती झाली ।। २६. १०४ ।।
महाविष्णूचे अवतार । ब्रह्मादिक हरिहर
इंद्र चंद्र भास्कर । गंधर्व सांब यक्षिणी ।। ८३ ।।
ज्यासी महाविष्णू आज्ञा करी । तोचि देव अवतार धरी ।
म्हणोनी पुराण उच्चारी । विष्णुची घेतो अवतार ।। २६.८४ ।।

आता यातही १०४ ही ओवी आधी उद्धृत करून ८३,८४ ह्या ओव्या नंतर उद्धृत करायच्या ही हातोटी विलक्षण आहे खरी. पण शहामुनीला स्वतःलाच नरसिंह हा विष्णूचा अवतार असल्याची स्पष्ट जाणीव आहे.

म्हणोनी पुराण उच्चारी । विष्णुचि घेतो अवतार

ह्या ओवीतून त्याने ती स्पष्टपणे नमूद केली आहे. नरसिंह हा या यक्षिणीचाच अवतार असे लिहित असताना डॉ. ढेरे ह्यांनी ह्या ओवीकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले आहे.

सारांश नरसिंह हा विष्णुचा अवतार आहे ही धारणा महानुभाव पंथीयांना डावलता आली नाही हे अतिशय स्पष्ट आहे. शहामुनीही तीच नोंदवितो. त्याची साक्ष डॉ. ढेरे ह्यांच्या फारशी उपयोगी पडणारी नाही.

## १२. शत्रुनाशासाठी नृसिंहपूजा :

डॉ. ढेरे ह्यांनी महानुभावेतर संतकवींपैकी श्रीएकनाथ, शेखमहंमद बाबा, श्रीसमर्थ रामदास, आत्माराम स्वामी आणि कलगी–तुऱ्याचे शाहीर हे नरसिंहाला वीरांच्या वा वेताळांच्या रांगेत बसवितात असे दाखविणे आहे.

एक तर हे सर्वच संतकवी उत्तरकालीन आहेत. दुसरे असे की जरी हे नरसिंहाला वीर वा वेताळांच्या रांगेत बसवितात तरी **तेच त्याचे मूळ रूप असावे असा तर्क कां करायचा** ? असा तर्क करण्यासाठी पूर्वकालीन बलवत्तर पुराव्याची आवश्यकता आहे.

आमचे असे प्रतिपादन आहे की भागवत संप्रदाय ही एक स्वतंत्र देवता–विज्ञान आहे. या देवताविज्ञानामध्ये विष्णूचा मूर्तीचे चार विग्रह योग, भोग, वीर आणि अभिचार ह्या नावांनी ओळखले जातात.

यात वीर मूर्तीची पूजा शत्रूहननासाठी होत असे तर अभिचारमूर्तीची पूजा जारण मारण उच्चाटन ह्यांच्यासाठी होई. शल्यपर्वातील शकुनीचे जे स्मशान-साधन डॉ. ढेरे ह्यांनी वर्णिले आहे त्यात तरी शकुनीने आधी जारण – मारणासाठी वीर वेताळ आव्हानून शेवटी शत्रूहनन आणि साम्राज्यप्राप्ती यासाठी नरसिंहाचे आवाहन केले आहे. उदाहरणार्थ शल्यपर्वातील

म्हणे पूर्ण आहुतीच्या अंती । नरसींहवीर बाहिर निघती ।
मग पांडवालागि प्रस्तुति । दहण करीते ॥४.३४९॥
पृथ्वीचेया रायाते । मारुनि राज्य करीन निरुते ।
ऐसे बळ नरसिंहाचे बहुते । धरिले थोर ॥४.३५१॥

येथेही साम्राज्यप्राप्ती, शत्रूहनन यासाठी नरसिंह उपासना करावी हा भाग नवरस-नारायण सुद्धा टाळू शकला नाही हे विशेषत्वाने लक्षात ठेवावे लागेल. साम्राज्यप्राप्तीसाठी नरसिंहव्रत करतात ही नोंद भारतीय संस्कृतीकोशात आहे.

ह्यात वीर आणि अभिचार मूर्तीचे उद्देश्य जवळजवळ सारखे असल्या-मुळे त्यांची गल्लत होणे सहज शक्य आहे. श्रीविष्णूच्या अभिचारमूर्तीच्या ह्या कल्पना केवळ ग्रांथिक नसून भीतरगाव (जि. कानपूर) येथील गुप्तकालीन विटांच्या मंदिरावर श्रीविष्णूची अभिचारमूर्ती आहे हे श्री. गोपीनाथराव यांच्यासारख्या महान मूर्तीविज्ञानवेत्त्याने नोंदवून ठेवले आहे. [३४]

## १३, पूर्वकालीन पुराव्यांचा अभाव :

आपण नोंदवीत असलेले सर्वच पुरावे उत्तरकालीन आहेत याची जाणीव होऊन की काय डॉ. ढेरे यांनी नृसिंहपूर्वतापिनी उपनिषदाचा आधार नोंदविला आहे. या उपनिषदामधून श्रीनृसिंहाविषयी

श्रीनृसिंहं महावीरं नमामि ऋणमुक्तये ।

एव्हढाच श्लोकार्थ उद्धृत केला आहे तर नरसिंहमंत्रराज या स्तोत्रामधील

उग्रवीरं महाविष्णुं ज्वलन्तं सर्वतोमुखं
नृसिंह भीषणं भयं मृत्युमृत्युं नमाम्यहम् ॥

यातील उग्र, वीर ही विशेषणे असता त्यावर भर देऊन नरसिंहाच्या 'महाविष्णू' ह्या स्वरूपाकडे सोयीस्करपणे डोळेझाक केली आहे. 'वीर' ह्या विशेषणावर नृसिंहतापिनी उपनिषदाचे जे निरुक्त आहे ते तात्विक शेरेमारीत निकालात काढले आहे. 'वीर हे नृसिंहाचे मूळ रूप असू शकते' हे विधान करण्याचा डॉ. ढेरे ह्यांना पूर्ण अधिकार आहे. पण यासाठी त्यांच्यावर पूर्व-कालीन भक्कम पुरावा नोंदण्याची जबाबदारी येऊन पडते.

भारतात यक्ष उपासना प्रबळ असण्याचा काळ म्हणजे इसवी सनापूर्वीचे सहावे शतक ते इ. स. ५ वे शतक. या काळामध्ये यक्षउपासनेचे संप्रदायही अस्तित्वात आले. मणिभद्र, पूर्णभद्र, गांगित, सूचिलोम, सुप्रवास आदी अनेकानेक यक्षांचे उल्लेख त्याकाळच्या जैन-बौद्ध ग्रंथांमधून आणि अभिलेखांमधून येतात. या यक्ष समुदायांमध्ये नृसिंहसदृश यक्ष वा सिंहमुखी यक्ष त्यांनी दाखवावयास हवा.

गुप्तकालापासून नरसिंह आणि वराह ह्या अवतार-विग्रहांची उपासना विशेषत्वाने प्रचलित झाली. देवगढ (जि. झांशी), एरण (जि. सागर) आदी ठिकाणच्या गुप्तकालीन मंदिरांवर नरसिंहाचे शिल्पपट आढळतात. एरण ह्या गावी राजा बुधगुप्त या गुप्त सम्राटाच्या काळचे मंदिर आहे. ते ऐरिकिण विषयाचे (एरण जिल्ह्याचे) विषयपती धन्यविष्णू आणि मातृविष्णू ह्यांनी बांधले. या मंदिरासमोरच्या स्तंभावरच त्यांचा लेख आहे.[३५] मंदिर जनार्दनाचे -( पुण्यजनांचा म्हणजे राक्षसांचा नाश करणारा म्हणून जनार्दन ) आहे असे म्हटले असले तरी मंदिरातील मूर्ती श्रीनृसिंहाची आहे. अर्थात् नरसिंह हा विष्ण-अवतार ही धारणा निदान गुप्त काळाइतकी जुनी आहे हे निश्चित आहे.

आता नरसिंह वा सिंहमुखी यक्ष ह्याचा समावेश जर विष्णुअवतारांमध्ये करण्यात आला असेल तर तो फारच महत्त्वाचा-मणिभद्र, पूर्णभद्र ह्यांच्यापेक्षाही महत्त्वाचा-यक्ष असला पाहिजे. तसा तो होता आणि नंतर त्याचा विष्णू-अवतारात समावेश झाला इत्यादी दुवे डॉ. ढेरे ह्यांनी नोंदवावयास हवेत.

## १४. सिंहमुखी यक्ष :

नरसिंह हा मूळचा सिंहमुखी यक्ष आहे असे विधान करून डॉ. ढेरे लिहितात ' मानवेतर प्राण्यांची मुखे असलेल्या अनेक यक्षमूर्ती मिळाल्या आहेत. गजाननमूर्तीच्या संदर्भात महामहोपाध्याय डॉ. वा. वि. मिराशी ह्यांना लिहिलेल्या पत्रात डॉ. वासुदेवशरण अग्रवाल लिहितात '..गणेश हा देवतारुपाने दाखविलेला नसून यक्ष म्हणून दाखविला आहे. त्यातून गजाननाची कल्पना उत्क्रांत झाली असावी ... '

' या गजवदन यक्षाप्रमाणेच सिंहवदन यक्षाचे अस्तित्व संभवनीयतेच्या कक्षेतील आहे. शिवगणांत सामील झालेल्या काशीनिवासी यक्षांचे वर्णन करताना त्यात सिंहमुखी यक्षाचा समावेश मत्स्यपुराणाने केला आहे. हा सिंहमुखी उग्र यक्ष जनमानसाच्या व्यापक श्रद्धेचा विषय आहे असे पाहिल्यावर भारतीय धर्मधुरीणांनी कौशल्याने त्याला विष्णूचा अवतार बनविले आणि त्याच्या

उग्रवीरत्वाचा नव्या अवतारकथेत उपयोग करून घेतला. यक्ष नरसिंहाचे हे वैष्णवीकरण म्हणजे भारताच्या सांस्कृतिक घडणीतील रहस्यमय घटना आहे.'

डॉ. ढेरे ह्यांच्या विवेचनपद्धतीची कल्पना यावी म्हणूनच हा उतारा विस्तृतपणे उद्धृत केला आहे. यातील विसंगती अगदीच सहजच लक्षात येतात. त्या अशा

१. डॉ. मिराशी ह्याना लिहिलेल्या पत्रात डॉ. अग्रवाल केवळ गजवदन यक्षाचा उल्लेख करतात आणि त्यातून गणेशमूर्ती उत्क्रांत झाली असावी असे सुचवितात.

२. या गजवदन यक्षावरून सिंहवदन यक्षाचे अस्तित्व संभवनीयतेच्या कक्षेतील आहे असा तर्क डॉ. ढेरे करतात.

३. आणि अगदी पुढच्याच वाक्यात संभवनीयतेच्या कक्षेतील हा सिंहवदन यक्ष 'भारतीय जनमानसाच्या व्यापक श्रद्धेचा विषय आहे' असे खुशालपणे लिहून मोकळे होतात.

४. त्यांच्या या संभवनीयतेला आधार म्हणजे मत्स्यपुराणातील शिवगणात सामील होणाऱ्या यक्षांच्या यादीतील सिंहामुखी यक्षांचा एकमेव शबल उल्लेख.

५. पण लगच ह्या सिंहमुखी यक्षाचे वैष्णवीकरण झाल्याचेही ते नोंदवून टाकतात. आता शिवगणात सामील होणाऱ्या यक्षांचे वैष्णवीकरण झाल्याचा मात्र कसलाही पुरावा नाही.

आमचे असे प्रतिपादन आहे की जर यक्ष देवतांचे उन्नयन झाले तर ते शिवगणात सामील होण्याची शक्यता अधिक. कारण शिव हा यक्ष, गंधर्व प्रमथ, कूष्मांड, शाकिनी, डाकिनी आदी भुतावळींचा स्वामी आहे. तो यक्षराज कुबेराचा सखाही आहे. भूतेश, प्रमथाधिप, उग्र, भीम आदी शिवाची नावे अमरकोशाने नोंदविली आहेतच. खुद्द डॉ. ढेरे ह्यांनी दिलेल्या मत्स्यपुराणातील उल्लेखावरूनही सिंहमुखी यक्ष हे शिवगणात सामील झालेले दिसतात. विष्णूच्या देवता चक्रात नव्हे.

## १५ नाग-नरसोबाची एकत्र पूजा :

नाग-नरसोबांची पूजा श्रावणात एकत्र केली जाते यावरून डॉ. ढेरे ह्यांनी मन:पूत अनुमाने काढून ठेवली आहेत. यक्ष आणि नाग यांचे संप्रदाय एकेकाळी सारखेच प्रभावी होते आणि त्यांच्यात फार मोठ्या प्रमाणात देवाण

घेवाणही झाली आहे. हे सत्य भारतीय विद्यांच्या सर्वच अभ्यासकांना मान्य झालेले आहे. नाग–नरसोबा यांच्या जोडीतील नरसोबा हा यक्षांचा प्रतिनिधी आहे. एरवी नागाबरोबर नरसोबाची पूजा श्रावणात करण्याचे प्रयोजन स्पष्ट होऊ शकत नाही असे त्यांचे विवेचन आहे.

यक्ष आणि नाग हे भारतातील संप्रदाय सारखेच प्रभावी होते हे खरे त्यांच्यात देवाण–घेवाण झाल्याची शक्यताही मान्य. (याचे कोणतेच पुरावे डॉ. ढेरे ह्यांनी नोंदविलेले नाहीतच.) पण नरसोबा या जोडीतील नरसोबा हा यक्षाचाच प्रतिनिधी कशावरून? मणिभद्र, पूर्णभद्र, हरिकेश आदी यक्ष हे यक्षदेवता समूहात प्रबळ असता केवळ संभवनीयतेच्या कक्षेतील हा सिंहमुखी यक्ष यक्षांचा प्रतिनिधी कसा ठरला ? हे दोन्ही संप्रदाय प्रबळ असता (इ. स. पूर्व ६ वे शतक ते इ. स. ५ वे शतक) त्यांची पूजा एकत्र असल्याचे उल्लेख आहेत काय ?

उलट आमचे तर आग्रहाचे प्रतिपादन आहे की नाग–नरसोबा ह्या जोडीत नरसोबा विष्णुरूप म्हणूनच आला आहे. कसे ते पहा.

अ. संपूर्ण भागवत संप्रदायाची उभारणी ज्या देवताशास्त्रीय पायावर झाली त्यात ऋग्वेदातील विष्णू, उपनिषदातील नारायणीय संप्रदाय आणि गोपालकांचा 'वीर' देव वासुदेव कृष्ण यांचा समावेश आहे. यातील उपनिषदातील नारायण हा क्षीरसागरवासी असून तो शेषशयन वा अनंतशयन आहे. ऋग्वेदातील विष्णूचा त्याच्याशी सांधा जोडण्यात आलेला आहे. आणि यातून नागावर शयन करणारा विष्णू असे देवतारूप सिद्ध झाले आहे. आणि म्हणून नागोबा – नरसोबा यातील नरसोबा हा विष्णूरूप आहे. नरसिंहाचे अपर नाम महाविष्णू आहे. एरण येथील नरसिंहमूर्ती आजही महाविष्णू म्हणून ओळखली जाते.

## १६. कुलदेव नरसिंह :

नरसिंह हा अनेक घराण्यांचे कुलदैवत आहे. म्हणून तो 'मूल देव' आहे असे डॉ. ढेरे म्हणतात. पण ऋग्वेदातील विष्णू हा मूलदेवच असण्याची शक्यता अधिक. तो शिपिविष्ठ आहे. तो सुफलीकरणाची देवता आहे. तो राजत्त्वाशी संबंधित आहे आणि म्हणून ती कुलदेव असणे अगदी शक्य आहे. त्याचाच अवतार म्हणून नृसिंह हाही कुलदेव मानला गेला आहे. विष्णू हा व्यंकटेश बालाजी रूपानेही अनेकांचा कुलदेव असतोच. पण तरीही विष्णूची उत्क्रांती ऋग्वेदातील इंद्र – आदित्य मंडळातून शोधली पाहिजे हे उघड आहे. याविषयी विवेचन पुढे येणार आहेच. श्रीविष्णूची पूजा 'शाळिग्राम' रूपाने होते.

शाळिग्राम म्हणजे विष्णूचा तांदळाच. सर्व प्रकारच्या शाळिग्रामांमध्ये नृसिंह शाळिग्राम सर्वश्रेष्ठ मानला जातो. श्रीनरसिंह सरस्वतींचे मूळ नाव शाळिग्राम होते. पण त्यांना म्हणत नरहरी.

## १७. स्वतः डॉ. ढेरेच साशंक :

आतापर्यंत आपण डॉ ढेरे ह्यांनी जमविलेल्या एकेका पुराव्याची छाननी करून त्याचा फोलपणा पाहिला. शिवाय पुराव्याची उलथा–पालथ हा तर त्यांच्या हातचा मळ आहे. शेख महंमदबावा श्रीगोंदेकर, श्रीएकनाथ, श्रीसमर्थ, आत्माराम ह्यांच्या काव्यातील नरसिंह हा ' भूतावळीचा पुढारु ' ठरविणारी वचने उद्धृत केल्यावर ते अशी शंका काढतात. ' ह्या वचनात उल्लेखिलेला नरसिंह हा परमेश्वर अवतार नरसिंहाहून वेगळा असा क्षुद्र देव आहे, नावापलीकडे त्याचा अवतार नरसिंहाशी काहीही संबंध नाही ... ही शंका स्थूलमानाने प्रबल वाटते ' यावर उत्तर देताना डॉ. ढेरे लिहितात ' विनायक आणि खंडोबा यांच्याविषयी श्रद्धाभाव बाळगणाऱ्या मराठी संतांच्या ग्रंथातून त्या दैवतांविषयी कितीतरी असे उल्लेख आलेले आहेत की ज्यातून त्या दैवतांच्या मूळ रूपांचे भान घडू शकते. नरसिंहाविषयीही नेमके हेच घडले आहे. शकुनीने स्मशानात आव्हानिलेला नरसिंह तोच आहे की जो ' मागे हिरण्याक्षावरी । स्तंभ फोडोनी निघाला बाहेरी.'

याचाच अर्थ असा की नरसिंह हा ' भुतावळीचा पुढारी ' असल्याविषयीची अवतरणे महानुभावेतर संतकवींची, त्यावर ' परमेश्वर अवतार नरसिंह आणि बावनवीरात समावेश असलेला नरसिंह एकच कसे असतील ?' ही शंका डॉ. ढेरे ह्यांची आणि उत्तर मात्र नवरस नारायण ह्या महानुभाव कवींकडून असा हा द्राविडी प्राणायाम आहे. त्यातही नवरस नारायणाला नरसिंहाने हिरण्यकश्यपू ह्याचा वध केला, हिरण्याक्षाचा नव्हे हे माहीत नाही हा भाग आहेच.

## १८. नरसिंह आणि मातृका :

असाच प्रकार डॉ. ढेरे ह्यांनी मत्स्यपुराणातील अंधकासुर वधाच्या कथेचा वापर करताना केला आहे. शिवाने अंधकासुराला मारताच त्याच्या रक्तबिंदूपासून असुर निर्माण होऊ लागले. ते रक्त पिण्यासाठी शिवाने मातृका निर्माण केल्या. पण त्या मातृका संपूर्ण जग भक्षिण्याची अनुज्ञा मागू लागल्या. तेव्हा शिवाने नरसिंहाचे ध्यान केले आणि नरसिंहाने ह्या मातृकांचे नियंत्रण केले असे सांगून डॉ. ढेरे ह्यांनी नरसिंह हा मातृकागणाचा नियंत्रक असल्याचा अन्वयार्थ लावला आहे.

पण मूळ मत्स्यपुराणातील तपशील पाहता वेगळेच दृश्य दिसते. अंधकासुराच्या रक्तापासून असुर निर्माण होऊ लागले तेव्हा शिव हा विष्णुला शरण गेला. तेव्हा विष्णूने शुष्करेवती नामक मातृका निर्माण केली आणि तिने असुराचे रक्त प्राशन केले. पण ही आणि इतर शिवनिर्मित मातृका जेव्हा त्रैलोक्य भक्षणाची आज्ञा मागू लागल्या तेव्हा शिवाने नृसिंहाचे ध्यान केले. श्रीनृसिंहाने स्वशरीरापासून तीन देवी निर्माण केल्या आणि विष्णूने पुन्हा बत्तीस देवी निर्माण केल्या. या शिवनिर्मित आणि विष्णु–नरसिंहनिर्मित देवी-मध्ये युद्धाचा प्रसंग ओढवला आणि शेवटी शांतता प्रस्थापित झाली.

या कथेतून नरसिंह हा मातृकागणांचा नियंत्रक ठरत असेल तर विष्णूही मातृकागणांचा नियंत्रक ठरतो. आणि तितकेच विष्णू आणि नरसिंह यांचे अतूट नाते आहे असेही ठरते. ही कथा शिवापेक्षा विष्णू–नरसिंह यांचे सामर्थ्य अधिक आहे हे दाखविण्यासाठी रचल्या गेली हे उघड आहे.

## १९ काष्टस्तंभाचे गूढ :

प्रल्हाद या भक्तराजाच्या कैवारासाठी श्रीनृसिंह काष्टस्तंभांतून प्रकट झाला हे सर्वश्रुत आहे. या काष्टस्तंभाचे गूढ उकलण्याचा आव आणित डॉ. ढेरे लिहितात, ' नृसिंह काष्टस्तंभातून प्रकट झाला. पूर्वी यक्ष वृक्षावर राहात. पुष्कळदा यक्षच वृक्षरूप असत. अन्तगडदसाओ ह्या जैन ग्रंथात मोग्गरपाणि नामक यक्षाने काष्टप्रतिमेतून प्रकट होऊन भक्ताचे रक्षण केले अशी कथा आहे - - - यक्ष नरसिंहाच्या काष्ठप्रतिमेचाच नरसिंह अवताराच्या कथेत काष्ट-स्तंभ झाला असला पाहिजे असे अनुमान या कथेच्या पार्श्वभूमीवर सुसंगत वाटते. '

आता ह्या ठिकाणी कथा सांगायची मुद्‌गरपाणि (मोग्गरपाणि) नामक यक्ष काष्टप्रतिमेतून प्रगट झाल्याची आणि अनुमान मात्र ' यक्ष नर-सिंहाच्या काष्टप्रतिमेचा काष्टस्तंभ झाला असला पाहिजे ' हे काढायचे हे विलक्षण आहे.

जशा यक्षांच्या काष्ठप्रतिमा असत तशाच त्या इतर देवतांच्याही असत, एव्हढे जरी त्यांनी ध्यानात ठेवले असते तरी ही कथा नृसिंह कथेशी जोडण्याचा मोह त्यांना होता ना. हाल सातवाहनाच्या गाथासप्तशतीमधील इंद्राच्या काष्ठ-प्रतिमेचा उल्लेख येथे जरूर ध्यानात घेण्यासारखा आहे.

दुसरे असे की अंतगडदसाओ ह्या ग्रंथातील ही यक्षकथाच नरसिंहकथेचे अनुकरण नसेल कशावरून ? ब्राह्मण ग्रंथातील कथा घेऊन त्यांना बेमालूम रूपे देण्याचे बौद्ध–जैनांची हातोटी सुपरिचित आहे. शिबी, श्रवणकुमार, विदुर,

जनक ह्यांच्या कथा जातककथांमध्ये जाऊन बसल्या आहेत. जैनांनी रामायण, महाभारत, मेघदूत, कादंबरी, बृहत्कथा, कौटिल्याचे अर्थशास्त्र यांना जैन साज चढविला आहे. जैन परंपरेने राम–लक्ष्मण आणि खरदूषण एकाच जैन तीर्थंकरांचे उपासक असू शकतात. तसाच प्रकार अंतगडदसाओमधील कथेचा असू शकतो. त्या कथेचा भावही इतकाच की देव भक्तासाठी काष्ठातूनही प्रकटतो. यापेक्षा अधिक ती कथा ताणण्यात अर्थ नाही.

शिवाय महाभारतात जी नृसिंहकथा येते त्यात काष्ठस्तंभाचा अजिबात उल्लेख नाही. अर्थात् नृसिंहकथेचे एक रूप काष्ठस्तंभ–विरहीत होते हे स्पष्ट आहे. शिवाय मूळ विष्णूच यज्ञ–यूपाशी–काष्ठस्तंभाशी–संबंधित आहे ते वेगळेच

## २०. हरिकेश यक्षाची कथा :

पूर्णभद्र यक्षाचा पुत्र हरिकेश. तो निःसीम शिवभक्त होता. पूर्णभद्रास आपल्या पुत्राची शिवभक्ती रुचत नसे. त्याने हरिकेशाला घराबाहेर काढून लावले. शेवटी शिवाने हरिकेश ह्यांचा उद्धार केला. डॉ. ढेरे ह्यांनीही ह्या कथेचा उल्लेख केलेला आहे. आणि ' ही कथा यक्षोपासनेवर शिवउपासनेने गाजवलेल्या प्रभावाचे स्पष्ट प्रत्यंतर घडविणारी आहे ' असे आपले मतही त्यावर दिले आहे.

ही कथा अगदी हुबेहूब नरसिंह कथेसारखी आहे. प्रल्हादाला त्याच्या पित्याने विष्णुभक्तीसाठी छळल्यानंतर विष्णूने नरसिंहरूपाने त्याचा उद्धार केला. मग प्रल्हाद–नरसिंहकथा ही विष्णुउपासनेने असुर–राक्षस संप्रदायावर गाजविलेल्या प्रभावाचे प्रत्यंतर घडविणारी आहे असे कां म्हणू नये ?

## २१. यक्षराक्षसांचा संहारक विष्णू–नरसिंह :

हिरण्यकश्यपू हा राक्षस होता. यक्ष राक्षस ह्या एकाच कोटीतील देवता. यक्षराज कुबेर आणि राक्षसराज रावण ह्यांचे बंधुत्व सुप्रसिद्धच आहे. यक्षराक्षसांचा मिळून राजा कुबेर हेही प्रसिद्धच आहे. ' वित्तेशो यक्षरक्षसाम् ' ( मी यक्ष आणि राक्षस ह्यांच्यामध्ये कुबेर आहे ) असे भगवंतांनी म्हटले आहेच. ज्या अर्थी नृसिंह हा ' राक्षस संहारितो ' त्या अर्थी तो यक्ष–राक्षस कोटीहून भिन्न देव असला पाहिजे.

यक्ष उपासना ही भारतात प्रबळ असता जैन–बौद्ध धर्मांचे प्रवर्तन झाले. त्यांनी यक्ष–उपासनेला आपल्या धर्मात हळूहळू सामावून घेतले. पण बुद्धाच्या वा महावीराच्या शासन – देवता वा अनुचर म्हणून. क्वचित

बुद्धाने वा महावीराने त्यांचा पराभव केल्याच्या कथा रचून दाखवून. कालिया-मर्दनाची कथाही अशीच आहे. या कथेत कृष्ण–उपासनेचा नाग–उपासनेशी संघर्ष आणि शेवटी नागाचा पराभव दाखवून नाग-उपासना ही कृष्ण-उपासनेला दुय्यम ठरविण्याचा प्रयत्न आहे. डॉ. वासुदेवशरण अग्रवाल ह्यांचे हे मत डॉ. ढेरे ह्यांनी स्वीकारलेही आहे. मग जर सिंहमुखी यक्षाला वैष्णव–उपासनेत सामील करून घ्यायचे असते तर विष्णूने त्याचा पराभव केल्याची कथा निर्माण केल्या गेली असती. त्याला एकदम विष्णूचा अवतार बनवून टाकणे हे डॉ. वासुदेवशरण अग्रवाल आणि त्यांचा अनुवाद करणारे स्वतः डॉ. ढेरे ह्यांच्या विवेचनाविरुद्ध जाणारे आहे.

नरसिंहाच्या अतिप्राचीन मंदिरांपैकी एक मंदिर एरण ( जि. सागर ) येथे आहे. बीना नदीच्या पात्राने वेढलेले हे अतिशय रम्य नगर राजा समुद्रगुप्ताचे ' स्वभोग नगर ' होते. तेथे श्रीनृसिंहाचे गुप्तकालीन भग्न मंदिर आहे. त्यातील नरसिंहमूर्तीला ' महाविष्णू मूर्ती ' असेच म्हणतात. या मंदिरा-समोर गुप्त-सम्राट बुधगुप्त ह्याच्या काळातील स्तंभलेख आहे. [३६] हा स्तंभ एरण ह्या विषयाचे विषयपती धन्यविष्णू आणि मातृविष्णू ह्या बंधूद्वयांनी उभारला आहे. ह्या लेखात महाविष्णू–नरसिंह यास पुण्य–जन–अर्दन ( पुण्य-जनांचा नाश करणारा ) म्हणून जनार्दन असे म्हटले आहे. पुण्यजन म्हणजे यक्ष आणि राक्षसही. अमरकोशात राक्षसांना पुण्यजन तर यक्षराज कुबेराला पुण्यजनेश्वर असे म्हटले आहे. अर्थात् विष्णू–नरसिंह ह्यांच्या विषयीची भावना ते यक्ष–राक्षसांचा नाश करणारे अशीच भारतीय जनमानसाने जोपासली आहे हे उघड दिसते.

उलट भारतीय जनमानसाची दुसरी एक लकब अशी नोंदविता येईल की, विष्णू हा जसा यक्ष–राक्षसांचा संहार करणारा तसा शिव हा त्यांचा स्वामी, प्रतिपालक. म्हणून नरसिंह हा जर मूळ सिंहमुखी यक्ष असता तर त्याचा समावेश शिवाच्या गणात होता. एका इतक्या क्षुल्लक यक्षाला ( की ज्याच्या अस्तित्वाचे मूळ पुरावेच शबलित आहेत ) विष्णूचा अवतार बनविणे भारतीय लोकमानसाच्या आणि देवताशास्त्राच्याही विरोधी जाणारे आहे.

## २२. इंद्र–नमुची कथा :

अर्थात नरसिंह कथेचे मूळ यक्षोपासनेत शोधणे फलप्रद नाही हे स्पष्ट दिसते. मत्स्यपुराणातील सिंहमुखी यक्षाचा पुसटसा उल्लेख आणि अगदी उत्तर कालीन कवींनी नरसिंहाला ' वीर ' म्हणणे एव्हढ्या आधारावर तसे करणे योग्य ठरणार नाही.

आमच्या मते नरसिंह कथेचे मूळ रूप इंद्र–नमुची या वैदिक कथेत शोधले पाहिजे ही इंद्र–नमुची कथा ऋग्वेद, शतपथ ब्राह्मण, तैत्तिरीय ब्राह्मण, वाजसनेयी संहिता आदी ग्रंथांतून आढळते.

नमुचीने शस्त्रा–अस्त्रापासून, पशु–मनुष्यापासून आणि दिवस–रात्री सर्वत्र अवध्यत्वाचा वर मिळविला होता. शेवटी इंद्राने त्यास समुद्र–फेनाचे वज्र करून मारले. हे नरसिंह कथेचे मूळ रूप आहे हे कुणालाही पटावे आणि विशेष म्हणजे नरसिंहाच्या नखांना नेहमीच वज्राची उपमा दिली जाते हेही लक्षात ठेवण्यासारखे आहे. या वज्रसम तिखट नखांचे स्मरण नवरस–नारायणालाही आहे.

नखे वज्राऐसी तिखटे । हात लांब विशाल बोटे
तारांगणा चपेटे । लागो शकति ।। प्रसंग ३, ओवी ३४४

ह्या ओवीत त्याने नरसिंहाचे आयुध नखे ही वज्रसम तिखट होती हे स्पष्ट-पणे नोंदले आहे.

नखे वज्रसी तिखट्ट । दाती शब्द खट्ट खट्ट
जिव्हा चंचळ चोखट्ट । जणू खड्ग रक्षणी [१७]

या नरसिंह–वर्णनपर घनाक्षरी छंदातही तोच भाव आहे. एकनाथांनाही नरसिंह-नखाची आठवण येताच वज्राची उपमा सुचते हे त्यांच्या

बाण सणसणाट । वज्र दणदणाट
नखे तिखे तिखट बोट । रागे फाडी पोट [१८]

ह्या घनाक्षरी छंदावरून स्पष्ट आहे.

जसे विष्णूच्या वामन अवताराचे मूळ विष्णूने तीन पावलात आकाश व्यापले ह्या वैदिक संकल्पनेत सापडले तसेच नमुची–इंद्र ह्या संघर्षात नृसिंह-अवताराचे मूळ आहे हे स्पष्ट आहे. देवासुर संग्रामात नमुची राक्षसांचा सेना-पती होता. हिरण्यकश्यपू हा हिरण्याक्षाचा सेनापती होता. त्यास इंद्राने मारले असे पद्मपुराण सांगते.

विष्णू हा इंद्रच आहे. तो उपेंद्र आहे. तेव्हा कालांतराने इंद्र उपासना मागे पडताच इंद्राच्या पराक्रमाची कथा त्याचा सखा विष्णू ह्याच्या अवताराची कथा बनली हे उघड आहे.

तेव्हा नरसिंह कथेचे मूळ इंद्र–नमुची संघर्षात आहे, तो यक्ष नाही हे उघड दिसते.

## २३. इंद्र–नरसिंह देवतेचे स्वरूप :

आता आपणास इंद्र–विष्णू–नारायण–नरसिंह आदी देवतासंकल्पनांचे स्वरूप नोंदविता येते. विष्णू हा इंद्रसखा आहे. तो सुफलीकरणाची देवता आहे. त्याचे वज्राशी अतूट नाते आहे. तो राजा आहे. राज्य–प्रदाता आहे. भारतीय लोकमानसात ह्या संकल्पना बद्धमूल आहेत. आजही पुत्र–प्राप्तीसाठी नाग–नारायण बळी हा विधी केला जातो. गर्भाधान प्रसंगी विष्णू–पूजा केली जाते. ' ना विष्णुः पृथिवीपतिः ' ही उक्ती प्रख्यातच आहे. राज्याभिषेक प्रसंगी सिंहासनावर आरूढ होताना विष्णूमूर्ती हाती घेऊन बसावे लागते. शिवाजी महाराज हे शिवाचे अवतार म्हणून लोकमानसात प्रख्यात असता ते राजा म्हणून आणि दुष्टसंहारक म्हणून कवींद्र परमानंद नेवासकर त्यांना विष्णूचा अवतार म्हणतो त्याचे रहस्य हेच आहे. राज्याभिषेक प्रसंगी हाती विष्णुमूर्ती धारण करूनच शिवाजी महाराज सिंहासनारूढ झाले हे सुविख्यातच आहे. तो साम्राज्यदायक आहे आणि म्हणून शकुनीचे नरसिंह साधन

> पृथ्वीचिया रायाते । मारुनि राज्य करीन नीरुते ।
> ऐसे बळ नरसींहाचे बहुते । धरीले थोर ॥ प्रसंग ४, ओवी ३५१ ॥

साम्राज्य प्राप्तीसाठीही आहे. नरसिंहाच्या ' सामराज ' ह्या विशेषणाचा ह्या सामराज्य प्राप्तीशी तर संबंध नसावा ना ? साम्राज्य प्राप्तीसाठी नरसिंह व्रत केले जात असे ह्याचा उल्लेख मागे आलाच आहे. विष्णूचा यज्ञीय–यूपाशी–यज्ञाच्या लाकडी खांबाशी–अती निकटचा संबंध आहे. नरसिंह–अवतारातील काष्ठस्तंभ हे या यज्ञीय यूपाचे तर परिणत स्वरूप नसावे ना ? अशीही शंका येते.

## २४. राजमठातच निवास कां ? :

आतापर्यंत आपण डॉ. ढेरे ह्यांच्या विविध विधानांचे परीक्षण करून त्यातील फोलपणा स्पष्टपणे पाहिला. पण डॉ. ढेरे एव्हढ्यावरच थांबलेले नाहीत. श्रीचक्रधर स्वामी राजमठात म्हणजे नृसिंहमठातच मुद्दाम कां निवास करून असा स्पष्ट प्रश्न उपस्थित करून ते लिहितात.

' गुंडम राउळ आणि चक्रधर स्वामी यांचा निवास अधिकतर राज–मठातच कां ? राजमठाविषयीच त्यांना इतकी ओढ कां ... चक्रधरस्वामींची विहरणपद्धती आणि प्रबोधनसरणी बुद्ध–महावीरांसारखी आहे. त्यांच्या विचार-विश्वावरही बुद्ध–महावीरांचा विशेषतः महावीराचा प्रभाव आहे. हे दोघेही धर्मचक्रप्रवर्तक प्रायः यक्षायतनात उतरत आणि यक्षानुयायांना आपल्याकडे आकर्षून घेत. बौद्ध जातककथांत आणि जैनागमात ह्या घटनांचे प्रत्यंतर पानो-

पानी येते. चक्रधरांनी बुद्ध–महावीरांची ही सरणी उचलली आणि यक्षायतनात म्हणजे राजमठात निवास करणे अधिक इष्ट मानले.'

हे सर्व विवेचन वाचून काय म्हणावे हेच आम्हाला कळत नाही. ह्याच्या इतके चमत्कारिक विधान करणे कुणालाही शक्य होणार नाही. वर्धमान महावीर आणि भगवान बुद्ध ह्यांच्या काळात यक्षोपासना अतिशय प्रबळ होती. पण तो काळ इसवी सनापूर्वी सहावे शतक असा आहे. त्या काळात यक्षभक्तांना आकर्षून घेण्यासाठी बुद्ध-महावीर हे यक्षायतनात उतरत असतीलही. त्याकाळी सर्वत्र यक्षपूजा प्रचलित होती तरी यक्षमंदिरे नसत. त्यांच्या मूर्ती उघडचा चौथऱ्यावर उभ्या केलेल्या असत. 'उत्थिताः आसकाः वैश्रवणस्य' असे यक्ष–चौथऱ्यांचे वर्णन सापडते. तेव्हा हे यक्ष–चौथरे निवासासाठी कसे निवडणार हा प्रश्नच आहे. यक्षमूर्ती प्रायः चौथऱ्यांवर असत हे डॉ. ढेरे ह्यांना मान्य आहेच. आणि पुन्हा भगवान बुद्धांच्या निवासस्थानाचे पुरावे जातककथां–मधून कसे शोधायचे हा आम्हाला न उलगडलेला भाग आहेच.

## २५. यक्ष-देवतांचे अधःपतन :

पण जैन आणि बौद्धधर्माच्या प्रसारानंतर यक्षोपासना झपाटचाने ओसरत गेली. यक्ष, यक्षिणी, अप्सरा, गंधर्व, नाग ह्यांना जैन-बौद्धांनी आत्मसात करून दुय्यम स्थान दिले. ते बुद्धाचे वा तीर्थंकराचे 'शासनदेव' (सेवक) झाले. भरहूतच्या स्तूपाच्या कठडचावर हे यक्ष नावनिशीवार उभे आहेत. (गांगीतो यखो, कुपिरो यखो, लोहितो यखो अशी त्यांची नावे त्यांच्या आकृतीवर कोरलेली आहेत.) ते भगवान बुद्धाचे (स्तूपाचे) दास्य करिताना दाखविले आहेत.

याहीपेक्षा त्यांचे अध.पतन सांचीच्या स्तूपावर पहावयास सापडते. तेथे त्यांची उंचीही कमी झाली असून ते तोरणांना आधार देताना दाखविल्या गेले आहेत. भारहूत येथील स्तूपावरील यक्षिणींची गरिमा आणि भारदस्तपणा मथुरा येथील नंतरच्या काळातील (कंकाली टीला येथील उत्खननात प्राप्त) यक्षिणींच्या मूर्तीमध्ये आढळत नाही. प्रख्यात कलासमीक्षक फोगेल ( Vogel ) ह्यांनी ह्या दोन काळातील यक्षिणीमूर्तींची तुलना करून यक्षिणींचे हे झपा–टचाने होणारे अध.पतन नोंदविले आहे. इसवी सनाच्या तेराव्या शतकात तर यक्ष–यक्षिणी ह्या देवता अतिक्षुद्र देवतांच्या कोटीत ढकलल्या गेल्या होत्या. 'भगवान महावीर अथवा भगवान बुद्ध हे यक्षायतनात उतरत ह्याची आठवण करकरून यक्षमंदिरात उतरणारे श्रीचक्रधर' त्यांना कर्मभूमीच्या सर्वात शेवटच्या थोव्यातील देवता मानतात हे नीट ध्यानी घ्यावे. इतकेच नव्हे तर

पंचाळेश्वर येथे यक्षिणी मंदिर असता स्वतःसाठी वेगळी गुंफा त्यांनी बाइसांची किंचित नापसंती असताही करविली ही गोष्ट काय दर्शविते ?

## २६. श्रीचक्रधर यक्षमंदिरात उतरत नसत :

अशा अवस्थेत मृतप्राय झालेल्या यक्षउपासनेचे स्मरण काढून आणि तेही नरसिंह म्हणजे यक्ष हे नरसिंहाचे संपूर्ण वैष्णवीकरण झाल्यानंतरसुद्धा अगदी मूळ रूप आठवून (तेही असिद्धच आहे.) आवर्जून यक्ष मंदिरात उतरतील हे सुतरां अशक्य वाटते. वस्तुस्थितीही तशीच आहे. श्रीचक्रधर स्वामी हे आदित्य, त्रिपुरुष, वनदेवी, जोगेश्वरी, तिकवनारायण, भोगनारायण, गणपती मठ, नागनाथ, ढोरेश्वर, जैन वसई आदी ठिकाणी यथाशक्य निवास करीत. नरसिंह वेगळा निवडून ते त्याच्या मंदिरात मुद्दाम रहावयास गेले उल्लेख लीळाचरित्रात अजिबात नाहीत.

श्रीचक्रधरस्वामी डोमेग्राम आणि हिवरळी येथे राजमठात राहिले. पण या दोन्ही मठातील देवतांची नावे लीळाचरित्रात येत नाहीत. उत्तरकालीन महानुभावीय लेखकांनी तेथे श्रीनृसिंहाच्या मूर्तीची अकारण कल्पना केली आहे.

या दोन्ही ठिकाणी स्वामी मुद्दाम आवर्जून वा हेतुतः गेलेच नाहीत. हिवरळी (जालना) येथे येताच ते तडक गावाबाहेरच्या वनदेवाच्या मंदिरात निघून गेले. सवे दादोस होते. ते वनदेवाच्या देवळाहून गावात आले. गावात दादोसांना आबाइसा, उमाइसा भेटल्या. त्या दादोसांच्या मागोमाग वनदेवाच्या देवळाकडे आल्या. स्वामींनी त्यांना वनदेवाच्या देवळाच्या छतावरून पाहिले आणि ते म्हणाले.

एथ अभ्यागते आलीः आता ग्रामांतर न किजे : [३९]

या दोन्ही स्त्रिया आल्यामुळे गावाबाहेरील वनदेवाचे स्थान सोडून स्वामी गावात राजमठी आले. अन्यथा त्यांना ग्रामांतराची प्रवृत्ती होती हे उघड आहे.

डोमेग्राम येथेही स्वामी छिन्नपाप गुंफेत चार महिने राहिले. त्यांना रेइनायकांनी विनंती केल्यामुळे ते गावात आले. तेथे तीन मठ होते. त्या तिन्ही मठात स्वामींचा सारखाच निवास असे. अर्थात राजमठात जाऊन रहावे असा त्यांचा मूळ विचार नव्हता. [४०]

## २७. श्रीगोविंदप्रभूंचा राजमठ :

श्रीगोविंदप्रभूंच्या राजमठाविषयीही डॉ. ढेरे यांची विधाने विपर्यस्त आहेत. ऋद्धिपूर जवळच देउळवाडा गाव आहे. तेथील दामूर्त नामक कोणी सामंत गोविंदप्रभूंना देउळवाडा येथे घेऊन गेला [४१] तेथे नरसिंहाचे प्रचंड प्रख्यात मंदिर होते. (आजही देउळवाडा येथील नृसिंहमंदिर प्रख्यातच आहे.) पण श्रीगोविंदप्रभू उतरले ते प्रतिमठी. [४२] नृसिंहमंदिरात नव्हे. प्रतिमठातून ते एकदा नृसिंह मंदिरात गेले. त्याचा स्पष्ट उल्लेख गोविंदप्रभूचरित्रात

' गोसावियासि नरसिंहाचा चौकी आसन : ' [४३]

असाच आहे. गोसावी ' बोनेयाचे परिएळ चाखती ' ते या नृसिंहमंदिरातील. डॉ. ढेरे समजतात त्याप्रमाणे ऋद्धिपूरच्या नृसिंहमंदिरातील नव्हे. देउळवाडा येथील स्थानाच्या वर्णनात ' नरसिंहाचे देउळ ' असाच उल्लेख स्थानपोथीत आहे. [४४]

२. श्रीगोविदप्रभू हे देउळवाड्याला असता ऋद्धिपूर येथे अरिष्टे उठली. केशव नायकांनी निरोप पाठवून देवगिरीहून विठलनायकांना बोलावून घेतले. प्रभूंना देउळवाड्याहून आणविले. मग म्हाइंभटांनी साठ आसू देऊन मठ विकत घेतला. त्यावर तांबेयाचे पत्र केले.

३. पण म्हाइंभटांनी विकत घेतलेल्या या मठात राहणे गोविंदप्रभूंना आवडेना. तेथे सर्व निघाल्याचे निमित्त करून ते राजमठी रहावयास गेले. श्रीनृसिंहाचे (नसलेले) यक्षरूप आठवून नव्हे. [४५]

४. या उलट ऋद्धिपूर येथील स्थानांच्या वर्णनात उंचमठाची जी स्थाने आहेत त्यात नरसिंहाचा स्पष्ट उल्लेख आहे. म्हणजे उंचमठात नरसिंहाची मूर्ती होती. याच मठातील ओवरीवर ते राहत असता सर्प निघाला तेव्हा त्यांना माच्यासकट उचलून राजमठात नेऊन घातले. त्यावेळी ते गमतीने ' चांगबोला, चांगबोला ' असे म्हणत होते. [४६] म्हणजे श्रीगोविंदप्रभू राजमठात रहावयास गेले ते एक नृसिंहमंदिर सोडूनच. उंचमठाच्या स्थानांची ही वर्णने पहा.

उंचमठाचिया पाइरिया : अनुक्रमे : व्यतिक्रमे आरोहण : पाइरिया ७

पटिळेसा गोदोहन : अनुवादु : १ : तेथचि घट भंगणे : २ : आपधवळ गाए म्हणणे : ३ : तथा दक्षिणे नरसिंहेसि खेळु : पटिसाळे फळीयाचा वोवरा : मांचेयावरि आसन : १ : ओवरेया खाली सर्पभय नटणे : तेथचि चांगबोला म्हणणे : १ : [४७]

या उताऱ्यावरून राजमठ हा म्हाइंभटांनी विकत घेतलेला मठ नव्हता आणि नृसिंहमूर्ती असलेल्या मंदिराला 'उंचमठ' हे नाव असू शकत होते हे स्पष्ट होते.

## २८. पैठण आणि सावखेडा येथील नृसिंह मंदिरे :

स्वामी पैठणात बहुत कालपर्यन्त राहिले. पण पैठणात प्रख्यात नरसिंह मंदिर असून ते तिकडे फिरकलेही नाहीत ही गोष्ट काय दर्शविते? हाच प्रश्न सावखेड येथील नृसिंह मंदिराचे विषयी आहे. स्वामी खडकुली, संगमेश्वर, जोगेश्वरी सवितानागनाथ आदी सावखेडच्या जवळील गावी अनेक दिवसपर्यंत राहिले पण ज्या सावखेडच्या नृसिंह मदिराचे डॉ. ढेरे इतके महत्त्व सांगतात (की तेथील सामराज नृसिंहावरून त्या गावाचे नाव सावखेड आणि ५ मैल अंतरावरील गावाचे नाव राजसदन पडले.) त्या नृसिंह मंदिरात त्यांनी एक तरी दिवस राहून 'यक्षोपासकांवर प्रभाव गाजवू' नये काय ?

श्रीचक्रधरस्वामी नृसिंह मंदिरात वास्तव्य करून कोणत्या यक्षउपासकांवर प्रभाव गाजवणार होते ? स्वामींनी डोंबाईचे भक्त रेइनायक, केदराचे भक्त राहीनायक, निर्वाणेची भक्त पचोळी धानाइसा, भागवतांचा मेळा जमविणारे डोड विहीर येथील राघव देव, शंकराचे भक्त राखसे रामदेव, पयोव्रती असलेल्या बाईसा, स्वतःच्या रसिकत्वाच्या आवर्तात असलेला माइसा हरी, हटमार्ग जाणणारा साळीवाहन राऊत, गोपाळमंत्राचे भेद जाणणारे कास्त हरिदेव पंडित, नाथपंथी उपदेशू असलेली आउसा, ब्रह्मचारी देव, नागा राउळी, परसनायक आदी अनेकांना आपल्या सामर्थ्याचे दर्शन घडविले. यात यक्षोपासक मुद्दाम निवडून काढून त्यावर प्रभाव गाजवण्याचे व त्यासाठी मुद्दाम यक्षायतनात उतरण्याचे प्रयोजन कुठे आहे ते समजत नाही. लीळाचरित्र तसे काहीही सांगत नाही.

सारांश असा की नृसिंह मंदिर आणि महानुभाव पंथ ह्यांच्यात कुठल्याही प्रकारचा अनुबंध गृहीत धरणे हेच मुळात अनावश्यक आहे. आणि या चुकीच्या गृहित कृत्यावर आधारलेला व्यासंग आणि निर्णय फलदायी ठरणार नाहीत हे उघड आहे.

वरील सर्व विवेचनावरून आपण निःसंशयपणे असे म्हणू शकतो की,

१. महानुभावीय साहित्यात सर्वच नृसिंह मठांना राजमठ म्हणत नसत.

२. महानुभावेतर साहित्यात तर नरसिंह मठाला कुठेही राजमठ म्हटलेले नाही.

३. यक्ष उपासकावर प्रभाव गाजविण्यासाठी श्रीचक्रधरस्वामी राजमठात उतरत असत हे विधान चमत्कारिक, अतिदूरान्वयित अतएव असिद्ध आहे.

४. महानुभावपंथ आणि नृसिंहमंदिरे यात कुठलाही अनुबंध गृहीत धरणे आनावश्यक आहे.

## २९. अभिलेखीय पुरावा :

आतापर्यंतच्या विवेचनावरून ' राजमठ ' या संज्ञेवरील डॉ. ढेरे ह्यांचे भाष्य बाद ठरवावयास हवे हे स्पष्टच होते. तेव्हा महानुभाव साहित्याच्या बाहेर ' राजमठ ' हा शब्द आढळतो की काय असा शोध घेतला पाहिजे आणि आनंदाची गोष्ट अशी की एका शिलालेखातच राजमठ हा शब्द आला आहे.

हा शिलालेख धुळे जिल्हयातील बळसाणे ह्या गावी असून तो एपिग्राफिआ इंडिकाच्या २६ व्या पुस्तकात पृष्ठ ३०९–३१३ वर प्रकाशित झाला आहे. [४८] लेख असा आहे.

ओळ १. अवंतु वो ब्रह्मपदाब्जरेणव : स्वपारसंसार समुद्रसेतवः
अघौककक्षक्षयधूमकेतव : सदैव पुण्योपचयैकहेतवः ॥

ओळ २. गोत्रे गार्ग्ये समाह्व समभवत्श्रीपद्नाभात्मज :
श्रीसोमेश्वरपंडित : कविसभालंकारवाचस्पति :
शाके षड्शचंद्रभि ११०६ प्रति

ओळ ३. यद्वाच : प्रचुरोपचार : चतुरा : श्रुत्त्वा बुधा सांप्रंतं
प्रख्यात्याद्य कवींद्रवाग्विलसति जाते सुमंदादरा : (॥)
तज्ज : श्री महलूकपंडित इह स्वीयै (:) प्रसिद्धै : (द्धो) गुणैर्य

ओळ ४. कृष्णस्य महीपते : करतले कर्ताशुपिच्छाचलाम्
गाणित्यांबुरुह प्रबोधतरणि धर्मज्ञ चिंतामणि स्थानेश्री
बलसाणके सुरसरिद्रम्या नदीसंगमे (॥) आकारयद्रा –

ओळ ५. जमठं च भग्नं निरंतरं ब्रह्मनिवासहेतो : स्थायी च कल्पशतेषु
भूयान्महोदय : पुण्यविवृद्धिहेतु ॥ शके ११०६

ओळ ६. दाण्डं सूत्रधारे –
– ण घटितं

राजमठ ह्या संज्ञेचा अर्थ स्पष्ट होण्याकरिता ह्या शिलालेखाचा ओळीनुसार संपूर्ण अर्थ देणे आवश्यक ठरते.

१. अपार अशा संसाररुपी समुद्राला पार करण्यासाठी सेतुरूप ठरणारे पापांचा नाश करण्यासाठी धूमकेतूरूप असे, पुण्यवृद्धीत सतत भर टाकणारे ब्रह्मपदाचे धूलिकण (ब्राह्मणांच्या पायाचे धूलिकण) आमचे रक्षण करोत.

२. गार्ग्य गोत्रात पद्मनाभाचा पुत्र सोमेश्वरपंडित हा कविसभालंकार वाचस्पती असा झाला. त्याचा पुत्र महल्लूकपंडित कृष्णनृपतीचा आवडता असा सभापंडित झाला. गणितात कमलाप्रमाणे, प्रबोधमार्गीचा सूर्य, धर्मशास्त्रात केवळ चिंतामणी ( अशा त्या महल्लूक पंडिताने ) बलसाणक गावी, सुरसरी नदीच्या संगमी भग्न झालेला राजमठ पुन्हा बांधून काढला – तो ब्राह्मणांनी निरंतर वसती करावी म्हणून. हे पुण्यकर्म स्थायी आणि शतकल्प राहो. पुण्याची वृद्धी होवो. शके ११०६. सूत्रधार दांड याने निर्माण केले.

या ठिकाणी स्पष्टपणे राजमठ हा शब्द आलेला आहे. त्याचा उपयोगही सांगितला आहे. राजमठ हे ब्राह्मणांच्या तात्पुरत्या निवासस्थानासाठी असत हे आता सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे. आता या नवीन प्राप्त झालेल्या अर्थाच्या प्रकाशात श्रीगोविंदप्रभू आणि श्रीचक्रधरस्वामी ह्यांच्या संदर्भात जो राजमठ संज्ञा येते ती तपासून पाहू.

## ३०. श्रीगोविंदप्रभूंचे निवासस्थान :

मागे आपण पाहिलेच आहे की श्रीगोविंदप्रभू देउळवाड्यास जाऊन राहिले असता त्यांच्या ऋद्धिपुरातील अनुपस्थितीमुळे ऋद्धिपुरात अरिष्टे उद्‌भवू लागली. म्हणून केशवनायकांनी विठ्ठलनायकांना निरोप पाठविला आणि श्रीप्रभूंना बोलावून घेतले. महाजनांनी विचार केला की

> गावी मठ : मंडप : देउळे असता राउळासि बिढार कैसे नाही : राउळ आणावे : स्वतंत्र बिढार देयावे :

यावरून ‘ महाजन देउळवाडेयासि आले. प्रतिमठी भेटी जाली : ’ महाजन आलेले पाहून ‘ गोसावी आंतु रीगति : बाहिरी नीगति : आणि हरिखैजति: ’ त्यांना ऋद्धिपूरला जाण्याची घाई झाली. म्हाइंभटांनी साठ आसू देऊन मठ विकत घेतला. ‘ म्हाइंभटी तांबेयाचे पत्र केले ’ मग गोसावी तेथे राहण्यासाठी आले.

पण ह्या सत्तेच्या मठात श्रीगोविंदप्रभू फार दिवस राहिलेच नाहीत. फुलांच्या वासाने तेथे सर्प निघाला. आणि श्रीगोविंदप्रभूंचा माचा उचलून राजमठी घातला. माच्यासकट श्रीप्रभूंना उचलताना ते ‘ चांगबोला : चांगबोला ’ असे विनोदाने म्हणत होते. यावरून स्वतःच्या सत्तेच्या जागेत न राहता अपरिग्रह वृत्तीने ते ‘ राजमठ ’ ह्या सर्वसाधारण ब्राह्मणांच्या धर्मशाळेसारख्या जागेत गेले हे उघड आहे. ते श्रीगोविंदप्रभूंच्या अपरिग्रही वृत्तीला तसेच श्रीगोविंदप्रभू आणि म्हाइंभट ह्यांच्यातील अनुबंधाला साजेसेच आहे. याविषयी स्पष्ट उल्लेख ‘ गोसावियांसि असावेयाचि प्रवृत्ती नाही ’. असा आहे.



**राजमठाचे**

## ३१. श्रीचक्रधरस्वामींचे निवासस्थान :

श्रीचक्रधरस्वामी दोन ठिकाणी राजमठ नामक वास्तूत राहिले. ते हीवरळी (जालना) येथे आणि डोमेग्रामी. पैठण हे ब्राह्मणांचे आगर. अर्थात् तेथील राजमठ नेहमी गजबजलेले असणार. ते 'रचमचेचे स्थान' स्वामींना कसे आवडणार ? हीवरळी, डोमेग्राम ही त्यामानाने शांत गावे. तेथे स्वामी राजमठात उतरले हे स्वाभाविक आहे.

ऋद्धिपूर आणि डोमेग्राम ह्या दोन्ही ठिकाणी उंचमठ आणि राजमठही स्थाने शेजारी शेजारी होती. स्थानपोथीतील ही वर्णने पहा.

ऋद्धिपूर येथील उंचमढ आणि राजमढ

तया राजमढाच्या दक्षिणविभागी :

डोमेग्राम येथील राजमठ तेथ तीन मढ । महाप्रचंड पूर्वामुख उंचमढू ।। ४९

एकु दक्षिणामुखः एकु पूर्वामुख एकु उत्तरामुखः आणि उंचमठ दक्षीणामुख ... ... ... ... अवस्थान जालें ।। ५०

यावरून उंचमठ आणि राजमठ ही स्थाने ऋद्धीपुरात आणि डोमेग्रामीही जवळजवळच होती असे दिसते. ऋद्धीपूर येथील उंचमठात नृसिंहमूर्ती असल्यामुळे आणि तेथील उंचमठ आणि राजमठ ही दोन्ही स्थाने श्रीगोविंद प्रभूंची निवासस्थाने असल्यामुळे राजमठ म्हणजे नृसिंहमंदिर असे उत्तरकालीन महानुभावांनी मानले आहे हे स्पष्ट दिसते.

## ३२. देवताशास्त्रीय तथ्ये :

१. श्रीनृसिंह या देवतेचा वैदिक विष्णू ह्या देवतेशी अतूट संबंध आहे. वैदिक विष्णूची सर्व वैशिष्टचे ( विष्णू आणि इंद्र, विष्णू आणि वज्र, विष्णू आणि यज्ञीय काष्ठयूप, विष्णू आणि राज्यप्राप्ती, विष्णू आणि दिवसारात्री, शस्त्राअस्त्रानं अवध्य असलेला नमुचि राक्षस ) नरसिंहाच्या स्वरूपात पहायला मिळतात.

२. देवताकल्पना अतिशय गतिमान असतात. अनेक कारणामुळे त्या पालटतात. नवनवीन रंगरूपे धारण करतात. त्या सर्वांचा विचार साकल्याने व्हावा. एकांतिकतेने नव्हे.

३. एखाद्या देवतेविषयी विचार करताना ती केवळ उग्र वा वीर स्वरूपाची आहे. अथवा वृक्षसर्पादिकांच्या पूजेसारखी आदिम स्वरूपाची आहे एव्हढेच लक्षात घेऊन तिचे यक्षत्व अथवा द्राविड स्वरूप ठरविण्यास धावू नये.

४. देवतांचे उन्नयन, त्यांचे विष्णूच्या अवतारांत समावेशन हे आपण समजतो तितके सोपे नसते. विष्णूच्या अवतारात ज्या सिंहमुखी यक्षाचा समावेश झाला त्या यक्षाच्या माहात्म्याविषयीचे पूर्वकालीन पुरावे नोंदविण्याची नितांत आवश्यकता आहे. मत्स्यपुराणातील अगदी महत्त्वहीन सिंहमुखी यक्ष ( तोही शिवगणात सामील झालेला ) एव्हढाच पुरावा काहीही सिद्ध करू शकणार नाही.

५. नरसिंह कथेच्या बाबतीत इंद्र नमुचि कथा टाळून पुढे जाताच येणार नाही.

६. लीळाचरित्र – स्मृतिस्थळ आदी ग्रंथात सर्वच नृसिंह मंदिरांना राजमठ म्हटलेले नसता स्वमत–सिध्यर्थ तसे धरून चालणे योग्य नाही.

७. देवतांचे उन्नयन होते तशाच त्या स्वभाव–सारखेपणाने अवनत होतात. त्यांचे अधःपतन होते. इंद्र, ब्रह्मा आदि देवतांचे अधःपतन उदाहरण म्हणून दाखविता येईल. नृसिह देवता तिच्या उग्रत्वामुळे अभिचारमूर्तीत अवनत झाली असे वाटते.

८. नरसिंह या देवतेचे स्वरूप भारत–इराणी ( Indo-European ) असावे असे वाटते. भारतावरील इराणी–संस्कृतीच्या प्रभावाचे अक्षरशः असंख्य दुवे प्रख्यात विद्वान् गुरुवर्य देविसिंहजी चौहान ह्यांनी नोंदविले आहेत. याविषयी त्यांचे 'भारत–इराणी संस्लेष' (प्रकाशक महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, नारायणपेठ, पुणे) हे पुस्तक पहावे.

इराण प्रदेश अती प्राचीन काळापासून मिश्र प्राणी विशेषांसाठी (Composite Animals) प्रख्यात आहे. मनुष्यमुखी सिंह अथवा सिंहमुखी मनुष्य याची अनेक रूपे तेथे सापडतात. मनुष्यमुखी सिंहाला ते नरमसीन म्हणतात. मनुष्य–मुखधारी पंख असलेल्या सिंहाची आकृती आजही पारशी इमारतींवर असते. आजही इराणी लोकात नरीमान हे नाव लोकप्रिय आहेच. नरमसीन हा सैन्यसंचालन करीत असल्याची चित्रे डी. मॉर्गन मिशनला बाबीलोनीयात सापडली आहेत. त्यात नरमसीनांच्या ध्वजावर सूर्य आहे, विष्णू हा आदित्यमंडळातील आहे. तो तीन पावलात आकाश व्यापतो म्हणून त्रिविक्रम आहे. आकाशात प्रवास करणारा सोनेरी पक्षी (गरुड = सूर्य = सुपर्ण) त्याचे वाहन आहे. भगवंतानीही 'आदित्यानामहं विष्णू' असे म्हटलेच आहे. म्हणून नरमसीनाच्या ध्वजावर सूर्य आहे.

९. सूर्यपुत्र यम आहे. इराणचा प्रख्यात राजा यमशिद अथवा जमशिद होता. आजही यमशिद–जमशिद हे नाव इराणी लोकात मशहूर आहे.

त्यामुळे विष्णू-नृसिंह सूर्य-यमाशी संबंधित आहे. विष्णू हा इंद्राशी संबंधित आहे. इंद्र हा सरडा (Lizard) होऊन पतित झाला अशी कथा आहे. आजही इराणमध्ये पर्सीपोलिसच्या अवशेषात राजा जमशीदच्या सिंहासनाच्या अवशेषावर सिंह आणि सरडा या आकृती आहेत. प्रख्यात कवी उमर-खय्याम ह्याच्या

They say the Lion and Lizard keep

The throne where Jamshy'd gloried and drank deep.

ह्या कवितेतही तोच भाव आहे. मिथ्र ही इराणी सूर्यदेवता भारतीय देवता-चक्रात 'मित्र' झाली आहे. मुलतान येथे प्रख्यात नृसिंहमंदिर होते. मुलतानचे अपर नाम प्रह्लादपूर होते.

प्रख्यात मराठी कवी दत्तपदांकित मुकुंद याने अनेक तीर्थयात्रा केल्या. तो मूलस्थान येथेही गेला होता. तेथील नृसिंहमंदिराचे भग्न अवशेष त्याने पाहिले होते.

मूलस्थान प्रसिद्धनाम नगरी जैसी अयोध्यापुरी
जेथे जन्म धरी नृसिंह बरवा प्रल्हाद राखे हरी
तर्णीकुंडही रामतीर्थ लहरी हे चंद्रभागातीरी
केले सज्जनमज्जने निजकरी संतोषलो अंतरी ॥

यात मूलस्थान हे नरसिंहाचे 'मूलस्थान' (जन्मस्थान, प्रादुर्भवस्थान) असल्याचा स्पष्टच उल्लेख आहे. 'संदेश रासक' हे अप्रतिम विरहकाव्य लिहि-णारा अपभ्रंशकवी अब्दुर्रहमान हा मुलतानचाच.

१०. तस्मात् देवता-संकल्पनांचा इतिहास लिहिताना अपुऱ्या माहितीवर, पुसट दुर्बल पुराव्यावर आधारलेली प्रमेये एकारलेली आणि अकारण गैरसमज पसरविणारी ठरतात. त्याने सत्यान्वेषण दुर्घट ठरते. आणि म्हणून 'Mythological and etymological hypotheses are good servants but bad masters' हे P. Von Bradke यांचे वचन उद्धृत करून थांबतो.

**संदर्भ-टीपा** :

१. डॉ. रा. चिं. ढेरे, लोकसंस्कृतीची क्षितिजे, पृ. ४७-६५
२. डॉ. य. खु. देशपांडे, ऋद्धिपूर-वर्णन प्रस्तावना पृ. २९
३. डॉ. वि. भि. कोलते, महानुभाव खंड १ ला. पृ. १५७
४. डॉ. यू. म. पठाण, ऋद्धिपूर माहात्म्य अध्याय ४, ओवी १४, ३७

५. डॉ. वि. भि. कोलते, स्थानपोथी (१९७६) पृ. ४६
६–११. क्रमाने तत्रैव पृ. ६. तत्रैव पृ. १३
१२–१८. तत्रैव पृ. ३०, ३१, ३२, ३५, ४९, ६४ (तळटीप) ८७, ६५
१९–२४. तत्रैव पृ. ४९
२५. डॉ. शं. गो. तुळपुळे, लीळाचरित्र एकांक लीळा ३०
२६. तत्रैव. पूर्वार्ध लीळा १७४
२७. डॉ. वि. भि. कोलते, गोविंदप्रभू चरित्र लीळा क्र. २१३
२८. डॉ. वि. भि. कोलते, स्थानपोथी पृ. ९५
२९–३०. डॉ. वि. भि. कोलते, लीळाचरित्र उत्तरार्थ लीळा ११, २०, ७१ इत्यादी
३१. अमरकोश. स्वर्गवर्ग १७
३२. डॉ. यू. म. पठाण, शल्यपर्व, प्रस्तावना पृ. १८
३३. डॉ. वि. भि. कोलते, महानुभाव तत्त्वज्ञान पृ. ३८–४४
३४. T. A. Gopinathrao.
३५–३६. Corpus Inscriptionum Indicarum Vol. III.
३७–३८. स्मरणातून.
३९. डॉ. वि. भि. कोलते, लीळाचरित्र पूर्वार्ध लीळा क्र. ४५९.
४०. तत्रैव उत्तरार्ध लीळा, क्र. १२४.
४१–४६. डॉ. वि. भि. कोलते. श्रीगोविंदप्रभूचरित्र. लीळा क्र. १०४–१२०
४७. डॉ. वि. भि. कोलते स्थानपोथी पृ. ९५
४८. Epigraphia Indica Vol xxvi pp.300–313.
४९. डॉ. वि. भि. कोलते स्थानपोथी. पृ. ७४
५०. तत्रैव. पृ. ६२

* *

# श्रीचांगदेव राउळ – एक चिंतन

## १. फलटणचे चांगदेव राउळ :

महानुभाव परंपरा परमेश्वराचे पाच अवतार मानते. त्यांचे नित्य स्मरण आणि चरण–शरण हे महानुभावीयांचे व्यवच्छेदक लक्षण आहे. हे पंचावतार असे.

जैसे द्वापरी श्रीकृष्णचक्रवर्ती ।। १ ।।
जैसे सिंहाद्री श्रीदत्तात्रेय प्रभू ।। २ ।।
जैसे द्वारावतीए चांगदेव राउळ ।। ३ ।।
जैसे ऋद्धीपुरी गुंडम राउळ ।। ४ ।।
जैसे प्रतिष्ठानी चांगदेव राउळ ।। ५ ।।

यांना पंचकृष्ण म्हटले जाते. ही महानुभाव पंथाची पूर्वी आहे. यात तिन्ही मानवी अवतारांच्या नावामागे राउळ अशी संज्ञा येते. ती सामान्यतः आदरसूचक संज्ञा आहे असे समजून त्याच्याकडे विशेष लक्ष संशोधकांनी दिलेले नव्हते. पण डॉ. रा. चिं. ढेरे यांनी ही संज्ञा गंभीर चितनाचा विषय बनविली आहे. आणि महानुभाव पंथाचे द्वैती, श्रीदत्तात्रेय–श्रीकृष्ण भक्तीपर तत्त्वज्ञान, ईश्वर–देवता प्रपंच–जीव आदी चार स्वतंत्र पदार्थांची मान्यता, जीव–देवता–ईश्वर संबंध, श्रीचक्रधरस्वामींची विहार–विवेचन पद्धती यांचा किंचितही विचार न करता त्यांना शैव–पाशुपत संप्रदायात ढकलण्याचा एकारलेला प्रयत्न केला आहे.

## २. राउळ–व्युत्पत्ती विचार :

श्रीचांगदेव राऊळ या नावातील राउळ या संज्ञेविषयी विस्तृत भाष्य डॉ. रा. चिं. ढेरे ह्यांनी चक्रपाणी ग्रंथाच्या पृष्ठ २०९–२१४ वर केले आहे.

त्यांच्या विवेचनाचे सार असे. " चांगदेव राउळ आणि त्यांचे गुंडमादि शिष्य ह्यांच्या नावातील राउळ हे पद नाथ, राशि, शिव, शंभु, ध्वज या उत्तरपदांनी युक्त अशा शैव साधूंच्या नावाप्रमाणेच संप्रदाय–द्योतक आहे, हे उघड आहे. यादवकालीन मराठी वाङ्मयात राउळ हा शब्द सद्गुरु वगैरेंचा सादर उल्लेख करण्याच्या निमित्ताने वारंवार आलेला दिसतो. विवेकसिंधूमध्ये तो या अर्थाने अनेकदा वापरलेला दिसतो. हा शब्द राजकुलापासून व्युत्पादण्याचा प्रयत्न केला गेला आहे. परंतु अर्थदृष्टचा विचार करता राजकुल या शब्दाशी 'राउळ' शब्दाचे हे उपयोजन मुळीच मेळ खात नाही. 'राजकुल' हे राउळ अथवा रावळ शब्दाचे कृत्रिम संस्कृतीकरण ठरेल. डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी यांनी यथार्थतेने असे दाखवून दिले आहे की, रावळ हा शब्द लाकुल (लकुलीशानुयायी) या शब्दापासून बनलेला आहे. डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी ह्यांनी यथार्थतेने असे दाखवून दिले आहे 'रावळ' हा शब्द 'लाकुल' शब्दापासून बनलेला आहे. 'रावळ' या शब्दाने स्वतःला उल्लेखिणारे मेवाड नरेश बाप्पा रावळ हे लाकुलीश पाशुपत संप्रदायाचे अनुयायी होते. बाप्पा रावळ हा हारित राशी नामक आचार्याचा नम्र शिष्य होता नाथ संप्रदायाची रावळ शाखाही प्रसिद्ध आहे. या शाखेतील साधूंचा संचार हा अफगाणिस्थानपर्यंत आढळतो. यांच्यात हिंदुबरोबर मुसलमान अनुयायीही मोठ्या प्रमाणावर आहेत.

चांगदेव राउळाच्या शिष्य परिवारात 'राउळ' पदान्त नावे असलेले शिष्य होते. उधळीनाथ हे नाथ–पदान्त नाव असलेला नाथ जोगीही त्यांचा शिष्य होता. त्याच्याकडूनच चक्रधरांनी वयस्तंभिनी विद्येचा स्वीकार केला. यावरून असे म्हणता येते की लाकुल पाशुपत हे नाथपंथात प्रविष्ट झाल्यानंतरच चांगदेव राउळ हे लाकुल अथवा लाकुल संप्रदायाचे दीक्षित बनले होते. म्हणजे ते शुद्ध लाकुल पाशुपत नव्हते. तर नाथांपैकी लाकुल पाशुपत होते. 'नाथ संप्रदायी राउळ' होते.

कृष्ण मुनी डिंभाने लिहिलेल्या फलटण माहात्म्य ह्या ग्रंथावरून चांगदेव राउळ हे कट्टर वेदमार्गानुयायी होते आणि वेदविरोधी जैनांचे कठोर विरोधक होते. सिंघणदेव यादवाचे गुरु विभूतिराउळ हे ज्ञानमार्गी महात्मे होते. जैनांनी त्यांना पराभूत केले. हे विभूती राउळ पुढे कालभैरव पूजक झाले."

थोडा पाल्हाळ करून डॉ. ढेरे यांचे प्रतिपादन शक्यतो विस्ताराने नोंदविले आहे. त्यांच्या विवेचनाचे सार असे.

१. राउळ हे पद नाथ, राशि, शिव, शंभु ह्या उत्तरपदांनी युक्त अशा शैव साधूंच्या नावाप्रमाणेच संप्रदायद्योतक आहे.

२. हा शब्द राजकुलपासून व्युत्पादिता येत नाही. राजकुल हे 'रावळ' किंवा 'राऊळ' शब्दाचे कृत्रिम संस्कृतीकरण ठरेल.

३. रावळ अथवा राऊल हा शब्द 'लाकुल' (लकुलीशानुयायी) असा अर्थ दिग्दर्शित करतो.

४. खानदेशात 'रावळ' ही एक धर्मप्रधान ( = ? ) जात आढळते. त्यांच्या मराठी जातिपुराणात राउळ योग्याचा जो वेश वर्णिला आहे तो शिवयोग्याचाच आहे.

५. शिलाहारवंशीय हरिपालदेव ह्यांच्या आगाशी शिलालेखात (ता. वसई. जि. ठाणे) त्यांचा महाप्रधान पद्मशिव राउल असल्याचा उल्लेख आहे. शिवपदान्त शैव आचार्य हे पाशुपतांपैकी 'शैवसिद्धान्त' ह्या पहिल्या शाखेचे अनुयायी आहेत. पद्मशिवाचे 'राउळ' हे विरुद लक्षात घेण्यासारखे आहे.

६. यानंतर डॉ. ढेरे ह्यांनी शैव-पाशुपतांचा महाराष्ट्रातील संचार विस्ताराने नोंदविलेला आहे.

## ३. लकुलीश आणि लकुलीशानुयायी 'लाकुल':

या सर्व विवेचनाचा नीट अर्थबोध होण्यासाठी लकुलीश अथवा नकुलीश त्याच्या विषयी थोडा विचार करू. लकुलीश संप्रदायाचा प्राचीनतम उल्लेख महाभारताच्या नारायणीय संहितेत मिळतो.[1] वायुपुराण आणि लिंगपुराणाच्या (अध्याय २३ आणि २४ अनुक्रमे) मधूनही लकुलीश संप्रदायाची उगम-कथा आपणास कळते. ती अशी.

शिवाने आपल्या भक्तगणास आश्वासन दिले की विष्णूने मथुरेत वासुदेव कृष्णाचा अवतार घेतला म्हणजे मी भृगुकच्छ देशात अवतार ग्रहण करीन. त्याप्रमाणे गुजरात प्रदेशात शिव लकुलीश रूपाने अवतरले. आणि त्याने पाशुपत मताची प्रतिष्ठा केली. ह्या अवताराच्या हाता लकुट, लकुल, लगुड ( = दंड) असे म्हणून त्यास लकुलीश (अथवा नकुलीश म्हणजे दंडधारी) अवतार म्हणतात. या लकुलीशाचे कुशिक, गर्ग, मित्र, कौरुष्य असे चार शिष्य झाले. त्यांच्यापासून लकुलीश– पाशुपत मत अस्तित्वात आले.[२]

ह्या लकुलीशाने पंचार्थविद्या अथवा पंचाध्यायी नामक ग्रंथ लिहिला असेही सांगितले जाते. राजस्थान, मध्यप्रदेश आणि कर्नाटक आदी प्रांतातील अनेक शिला–शासनांमधून लकुलीशमतानुयायी शैव साधकांचा निर्देश येतो. ह्या लकुलीशाचे पंथानुयायी ते लाकुल अथवा राउळ. आणि म्हणून ज्या कुणा

भिक्षु, श्रमण, जोगी, संन्याशी ह्यांची नावे 'राउळ पदान्त' आहेत ते सर्व लाकुल अथवा लकुलीशमतानुयायी समजण्याचा मोह अभ्यासकांना होत आहे. राजकुल या शब्दाचे अपभ्रष्ट रूप राउल नसून राजकुल हे लाकुल–राउल ह्या शब्दाचे कृत्रिम संस्कृतीकरण ( उद्भ्रंश, Urbanisation ) ठरेल असा अभ्यासकांचा तर्क आहे.

## ४. लाकुल संप्रदायावरच वैष्णव संप्रदायाची छाप :

लाकुल संप्रदायाच्या उगमाची ही पुराणोक्त कथा वाचताना इसवी-सनापूर्वीच्या पहिल्या दुसऱ्या शतकातील वैष्णव पांचरात्र संप्रदायाच्या उगमाची आठवण येते. त्या काळात वासुदेव–कृष्ण उपासनेचा संप्रदाय झपाट्याने पुढे आला. आणि घोसुंडी–नागरी ( राजस्थान ), मोरा ( मथुरा ), बेसनगर ( विदिशा–उज्जयिनीजवळ ) इत्यादी ठिकाणच्या शिलालेखात वासुदेव–कृष्ण उपासना, प्रद्युम्न, अनिरुद्ध, शाब, संकर्षण ह्यांच्यासहित श्रीकृष्ण–वासुदेव ह्याची पूजा, (emanatory form) श्रीकृष्ण–वासुदेवाला देवदेव आणि भगवान म्हणणे (Henotheism) इत्यादी सर्व संप्रदायलक्षणे आढळतात. याच वेळी पांचरात्र–वैष्णव उपासनेचा प्रारंभ झाला. अहिर्बुध्न्य संहिता आदी ग्रंथांची निर्मिती झाली. तिरुपती येथील विष्णुमंदिरात आजही वैखानस आणि पांचरात्र–पूजाविधान केले जाते.[३]

अर्थात् लकुलीशाने 'श्रीकृष्णाच्या बरोबरीने मी अवतार घेतो' असे सांगणे ह्यातून लकुलीश संप्रदायावरचा वैष्णव प्रभाव स्पष्ट होतो. लकुलीशाने रचलेल्या पंचार्थविद्या या ग्रंथनामावर 'पांचरात्र' ह्या नावाची छाप स्पष्ट दिसते. प्रारंभी ह्या पाशुपतांना 'शिव–भागवत' म्हणत असत. ही तर त्यांच्यावरच्या वैष्णवप्रभावाची स्पष्ट खूण आहे. आणि म्हणून लकुलीश–पाशुपत संप्रदायाचा उगम पांचरात्र वासुदेव–कृष्ण उपासनापंथाच्या अनुकरणातून झाला हे डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी ह्यांनीही नोंदविले आहेच.[४] डॉ. भांडारकर तर सांगतात की, कुणातरी लकुलीश नामक माणसाने पांचरात्र सिद्धांताचे अनुकरण करून शैव सिद्धान्त काढला. त्याचे नाव मागे पडून लोक त्या संप्रदायास पाशुपत म्हणू लागले. कर्नाटकातील एका शिलालेखात तर असा उल्लेख आहे की 'लकुलीशाला अशी भीती वाटली की लोक त्याचे नाव विसरून जातील म्हणून तो परत अवतीर्ण झाला ?

## ५. लाकुल–राउळ शब्दसंबंध :

आतापर्यंतच्या विवेचनावरून डॉ. रा. चिं. ढेरे लाकुल आणि राउळ हे समानार्थी शब्द समजतात असे दिसते. ह्याचाच अर्थ असा होईल की भार-

तीय संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश आणि देशी भाषांमधील साहित्य विश्वात राउळ वा तत्सम–तद्भव शब्द हे लकुलीश–आविर्भावानन्तर, अवतार ग्रहणानंतर यावयास हवेत. पण प्रत्यक्षात मात्र चित्र उलटेच दिसते. उदाहरणार्थ पुढील विवेचन पहा.

१. भगवान बुद्धाच्या पुत्राचे नाव 'राहुल' होते हे सर्वश्रुत आहे. हे नाव राजुल–राउल–राहुल असेच व्युत्पादावे लागते. ही गोष्ट लक्षात न आल्यामुळे भगवान बुद्धाने मुलांचा जन्म हा आपल्या गृहत्याग करण्याच्या मार्गातला अपशकून आहे असे समजून त्याचे नाव 'राहू' ठेवले आणि मग ते पुढे 'राहुल' झाले अशी कृत्रिम व्युत्पत्ती तयार करण्यात आली आहे. ती अर्थातच बनावट दिसते.

भगवान बुद्धाने आपल्या पुत्राला–श्रामणेर राहुल ह्याला–जो उपदेश केला तो 'राहुलोवादसुत्तं' म्हणून प्रख्यात आहे. बौद्ध साहित्यातील मज्झिम-निकायांतर्गत ते एक अती गुण–गंभीर सूत्र आहे. सम्राट अशोकाच्या भाब्रु–वैराट येतील लघुप्रस्तर लेखात त्याने संघातील भिक्षूंना अशी शिफारस केली आहे की त्यांनी विनयसमुकसे (विनय-समुत्कर्ष), अलिय वसानि (आर्य–वंशानि), अनागतभयानि, मुनीगाथा, मोनेयसुत्ते (मोनेय्यसूत्र), उपतिसपसीने (उपतिष्यप्रश्न) आणि लाघुलोवादे (राहुलवाद)[५] ही सूत्रे नेहमी वाचावीत. इथे स्पष्टपणे राहुल-हा शब्द राजुल ह्या शब्दाचा अपभ्रंश दिसतो. आणि त्या पासूनच 'लाघुल' हा अपभ्रंश झालेला आहे. आमचे असे प्रतिपादन आहे की भगवान शिवाचा जो अवतार गुजरात प्रदेशात कारवण येथे झाला त्याचे मूळ नावही राजुल अथवा राहुल असावे. पण राजुल-लाघुल-लाकुल ही अपभ्रंश परंपरा लक्ष्यात न राहिल्यामुळेच त्याला लाकुल–लकुलीन म्हणण्यात आले. व हातात लाकुड–दंड घेतल्या गेलेल्या त्याच्या मूर्तीची कल्पना केल्या गेली. ते कसेही असो. राजल–राहुल–लाघुल ही अपभ्रंश मात्र परंपरा गुजराथेत लकुलीशाचा अवतार होणे, त्याच्या अनुयायांना लकुलीशानुयायी म्हणून लाकुल नाव पडणे ह्याच्या पूर्वीची आहे हे निश्चित.

## ६. प्राकृत साहित्यातील 'राउळ':

राउळ हा शब्द लाकुलपासून व्युत्पादिला पाहिजे. राजकुल हे 'लाकुल' ह्या शब्दाचे कृत्रिम संस्कृतीकरण ठरेल असा डॉ. हजारी प्रसाद द्विवेदींचा हवाला डॉ. ढेरे देतात. पण प्राकृत साहित्यात राउल हा शब्द राजा, स्वामी, प्रभू ह्या अर्थी आणि राजकुल ह्या अर्थी वारंवार येतो. उदाहणार्थ पुढील उल्लेख पहा.

१. सर्वच प्राकृत कोशात राउल ह्या शब्दाचा अर्थ राजकुल, राजांचा समूह, राजांचा गण, राजांचा वंश ह्या अर्थी येतो. अमरकोशही 'रजिक' म्हणजे राजसमूह असा अर्थ देतो. तो 'राउळ' ह्या शब्दाला जवळचा आहे. प्राकृत प्रकाश, कुमारपाल-चरित, जसहर[२] –चरित्र, प्राकृत–पैंगल इत्यादी ग्रंथात तो राजकुल ह्याच अर्थी येतो.

२. मोहराज–पराजय ह्या प्राकृत काव्यग्रंथातील

जं इदिसस्स राउलस्स
दूरेण पणामो कीरदी जत्थ
बंभणो एवं विडिविज्जंति

हा उल्लेख पहा. इथे राउल शब्द राजा, राजकुल ह्या अर्थी आला आहे.

३. धर्मविधी–प्रकरण ह्या प्राकृत–काव्य–ग्रंथात तर तो स्पष्टपणेच राजा ह्या अर्थी आला आहे. ह्या काव्यग्रंथातील ही रचना पहा

तो किंपी धणं सयणेही
विलसियं किंपी वणिपुत्तेही
किंपी गयं राओले एस
अपुत्तती भणिउण ।।

यात राओल–राउळ शब्दाचा स्पष्टपणेच राजा असा अर्थ आहे. ह्या सर्वच प्राकृत ग्रंथकारांनी राउल म्हणजे राजा अथवा राजकुल, राजांचा समूह गण असा अर्थ लाकुल ( लकुलीशानुयायी ) ह्यांच्यापासून घेतला असे समजायचे काय ? बरे, तृप्यन्तु दुर्जनाः ह्या न्यायाने तसे मानले तरी लाकुल ह्या शब्दाचे राउळ हे रूप कधी झाले, त्याला राजा अथवा राजकुल असा विसंगत अर्थ कां चिकटला, त्याची अपभ्रंश वा उद्‌भ्रंश परंपरा काय आहे याची साधार नोंद करणे हे शोधशीलांचे कर्तव्य ठरत नाही काय ? शके १६५७ च्या एका पत्रातही दिवाण–राउळ असा शब्द असून येथे राउळ शब्दाचा अर्थ राजाची कुटुंबीय मंडळी असाच घ्यावा लागतो.[१]

## ७. मेवाडचा आद्य नरेश बाप्पा रावळ :

मेवाड येथील शिसोदेवंशीय राजे हे भगवान एकलिंगजीचे पूजक. उदयपूरहून १४ किलोमिटर अंतरावर असलेल्या एकलिंगजी अथवा कैलाशपुरी नामक गावी भगवान एकलिंगजीचे मंदिर आहे. ह्या मंदिरात शिवाची चतुर्मुख प्रतिमा आहे. पण वरच्या भागात एक मंदिर नकुलीश अथवा लकुलीशाचे आहे.

त्यात शिवाची नग्न, उर्ध्वलिंग मूर्ती आहे. येथेच हारितराशी नामक शैव-पाशुपत योग्याने प्रसाद दिला म्हणून बाप्पा रावळ ह्यास राज्यप्राप्ती झाली अशी कथा सांगितली जाते. एकलिंगजीच्या मंदिरावर ह्या कथेचे शिल्प पण आहे. हे मंदिर आम्ही दोनदा प्रत्यक्ष पाहिलेले आहे. बाप्पा रावळ हा हारित-राशि नामक लकुलीश पंथानुयायी योग्याचा लाकुलाचा–राउळाचा शिष्य होता म्हणून त्याच्या नावात राउळ हे पद आहे असा तर्क डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी ह्यांनी मांडला आहे आणि डॉ. ढेरे ह्यांनी तो उद्धृत केला आहे. पण हा तर्क पूर्णतः बरोबर नाही. कसे ते पहा.

१. आपण मांडलेला तर्क पूर्णतः खरा ठरण्याची शक्यता नाही किंवा आपण ह्या बाबतीत सर्वच पुरावे नोंदवू शकलो नाही अशी साशंकता डॉ. हजारीप्रसादजींच्या लिखाणात दिसते. ते लिहितात,

'मेवाडचे गहिलोत, आबुचे परमार आणि जालौरचे चौहान हे राजे स्वतःच्या नावामागे राउळ हे पद लावतात पण आणखी कुणा राजवंशाने ते धारण केले असल्यास मला माहीत नाही' ( मूळ हिंदी वाक्यांचा मराठी सारांश )[७] या राजांनी 'रावळ' पदवी लावल्याची उदाहरणे ते अनुक्रमे अशी देतात.

१. तां रावलाख्यां पदवीं दधानो बाप्पाभिधानो स राजा
(बाप्पा रावळ विषयीचा राजप्रशस्ती काव्यातील भाग)

२. एवमिदं व्यवस्था स चंद्रावतीपति राजकुल श्री सोमसिंहदेवेन
(आबू–देलवाडा येथील प्रशस्तीलेख)

३. महाराजकुल श्री सामंतसिंहदेव विजयराज्ये
(सांचोर येथील शिलालेख)

आता यात रावळ अथवा राजकुल ही पदवी राजत्वसूचक आहे हे स्पष्ट दिसते. या पदवीच्या व्युत्पत्तीविषयी विवेचन पुढे केलेलेच आहे. राजवैभव भोगणाऱ्या शिष्याचे नाव राउळपदान्त आणि त्याच्या लकुलीशमतानुयायी गुरुचे नाव मात्र 'राशि' पदान्त ही गोष्टही काही वेगळेच सूचन करणारी वाटत नाही काय ?

शिवाय बाप्पा रावळचे घराणे मूलतः सूर्योपासक होते. त्यांच्या केशरी ध्वजावर बालसूर्याचा उदय अंकित असे. बाप्पा रावळाचे मूळ नावही बाप्पादित्य असे सांगितले जाते. त्याच्या घराण्यात सात घोड्यांची पूजा प्रचलित आहे. चितोडच्या किल्ल्यात ह्या सात घोड्यांच्या पूजेचे स्थान आहे. त्याला रावळ ही पदवी तो प्रारंभी लहानसा राजा असल्यामुळे लावल्या गेली असावी.

त्याची राणी सौराष्ट्रातील होती. तिचे कुलदैवत व्यान देवी. तिची मूर्ती सौराष्ट्रातून आणून त्याने चित्तौड येथे तिची स्थापना केली. हीच चित्तौडच्या घराण्याची कुलदेवता. अर्थात् बाप्पा रावळ हा पूर्णतः शव नव्हता असेच दिसते.

## ८. शैव–पाशुपत आणि रावल हे पद :

लकुलीश ह्या शिवाच्या अवतारापासून लाकुलीश अथवा लाकुल हा संप्रदाय निर्माण झाला. पण शैव–पाशुपतांना ' राउळ ' म्हणत असत काय ? शिव, शंभु, राशी, ध्वज, शंकर ह्या पदांप्रमाणे ' राउळ ' हे पद ( मगते लाकुल शब्दाचा अपभ्रंश असो, वा उद्‌भ्रंश असो) आपल्यानावामागे जोडल्याचे उदाहरण दाखवावयास नको काय ?

ज्या अनेकानेक शिलाताम्रप्रशासनांचा उल्लेख डॉ. रा. चिं. ढेरे ह्यांनी महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यभारत ह्या प्रदेशातील शैव–पाशुपतांचा प्रभाव दाखविण्यासाठी केला आहे. त्यातील एका तरी शैव–पाशुपत योग्याचे नाव राउळ पदान्त असल्याचे ते दाखवू शकले आहेत काय ? त्यांनी केवळ शिलाहार नृपती हरिपालदेव ह्याच्या आगाशी येथील शिलालेखातील ' पद्‌मशिव राउळ ' नामक महाप्रधान ह्याचा उल्लेख केला आहे त्याविषयीचे विवेचन पुढे येणारच आहे.

## ९. शैवेतर पंथातील राउळ :

राउळ हे पद जर लाकुलमतानुयायी शैव साधूंच्या नावाचे सूचन करीत असेल तर शैवेतर साधूंच्या नावामागे ते पद येऊच शकणार नाही. डॉ. रा. चिं. ढेरे ह्यांनी हा मुद्दा लक्षातच घेतलेला दिसत नाही. इतर धर्मपंथातील साधू ' राउळ ' पदान्त नावे लावीत असत ह्याचीही उदाहरणे पहा

१. यादवसम्राट रामचंद्रदेव ह्याच्या शके १२१७ मधील मन्नेरमोसलेवाड येथील शिलालेखात मूलसंघांतर्गत देशीयगणातील नेमिचंद्र ह्या जैन आचार्याला नेमीचंद्र राउळ असे संबोधिले आहे ( Annual Reports on South Indian Epigraphy 1918–19 No. 256 page 22)

२. कुमठ ( जि. दक्षिण कानडा, कर्नाटक ) येथील जैन शिलालेखात मूलसंघ, देशीय गणातील विशालकीर्ती राउल ह्याचा उल्लेख आहे. शिलालेखाची तिथी शके १२६६, सुभानु संवत्सर, श्रावण वद्य ११ अशी आहे. ( Ibid 1947–48 No. 239 p. 40 )

३. त्याच जिल्ह्यातील कोरम येथील शिलालेखात सांतरवशीय नृपती पांडय भूपाल ह्याने बलात्कार गणातील वसंतकीर्ती राउल ह्याच्या विनंतीवरून वारकुरुं ( वारकुरूम = आधुनिक कोरम ) येथील जैनमंदिरासाठी काही

भूमीदान केल्याचा उल्लेख आहे. लेखांची तिथी शके १३३१ पुष्य शु १०, गुरुवार अशी आहे. ( Ibid 1928–29 No. p. 530 p. 40 )

४. अमरापूर ( कर्नाटक ) येथील लेखात मूलसंघ, देशीयगण, कोण्ड-कुन्दान्वय, पुस्तक गच्छ, यिगळेश्वर-बळिद त्रिभुवनकीर्ती राउळ ह्याचा उल्लेख आहे. लेख शके १२०० मधील आहे. ( अमरापूर शिलालेख Epigraphia Carnatica Vol. xii, Sira Tq. No. 32.)

५. याच त्रिभुवनकीर्ती राउळाचा शिष्य मलधारी बालचंद्र राउळ ह्याचा उल्लेख हेग्गेरे येथील शके १२२० च्या लेखात आलेला आहे ( Epigraphia Carnatica Vol. xii Chikkanayakanhalli Tq No. 24 ).

अर्थात् शैव–पाशुपतेतर साधूंना देखील 'राउळ' ही पदवी लावली जात असे दिसते. इथे तर ती जैन आचार्यांना लावल्या गेली आहे. इथे 'राऊळ' शब्दाचा अर्थ लाकुल अथवा शैव पाशुपत योगी असा घेताच येणार नाही.

## १०. आगाशी शिलालेखातील पद्मशिव राउल :

शिलाहार नृपती हरिपालदेव ह्यांचा शके १०७२ ( इ. स. ११५० ) या वर्षातील एक शिलालेख कोकण प्रदेशात आगाशी ह्या ठिकाणी सांपडला आहे. लेखाची भाषा संस्कृत–मराठी अशी संमिश्र आहे. ह्या लेखांचे प्रथम संपादन डॉ. अ. स. अळतेकर आणि आ. ने. उपाध्याय ह्या दोघा विद्वानांनी केले. डॉ. शं. गो. तुळपुळे ह्यांच्या 'प्राचीन मराठी कोरीव लेख' ह्या ग्रंथात ( क्र. ८ ) आणि महामहोपाध्याय डॉ. वा. वि. मिराशी ह्यांच्या 'शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख' ह्या ग्रंथात ( क्र. २५ ) ह्या लेखाचा समावेश आहे. या लेखात हरिपाल देवाच्या महाप्रधानाचे नाव पद्मशिव राउळ असे आलेले आहे. आणि म्हणून राउळ हे शैव–पाशुपत योगी असावेत असे डॉ. रा. चिं. ढेरे यांचे प्रतिपादन आहे. यावर आम्ही पुढील प्रमाणे विवेचन करतो.

१. ह्या लेखातील पद्मशिव हे नाव शैव–पाशुपत योग्याचे नसून महाप्रधानाचे आहे.

२. तो शैव-पाशुपत-योगी असेल तर राज्यकारभार कसा करू शकेल ?

३. शिवाय त्याच्या नावात शिव हे संप्रदायदर्शक पद आहेच. मग पुन्हा राउळ (लाकुल ह्या अर्थी) हे उपपद कशाला ? या दोन शिव संप्रदाय वाचक पदांनी अत्युक्तीचा दोष पदरी येणार नाही काय ?

४. ह्या आगाशी लेखाचा ठसा डॉ. शं. गो. तुळपुळे ह्यांच्या प्राचीन मराठी कोरीव लेख ह्या ग्रंथात दिला आहे. (प्रतिमा पृ. क्र. ८). तेथे 'राउल' शब्द वाचू जावे तो या शब्दातील 'ल' एव्हढेच अक्षर जेमतेम दिसते. बाकीचा भाग फुटून गेला आहे. अर्थात् 'राउल' हे वाचनही अनुमानीतच आहे.

सारांश शिलाहार नृपती हरिपालदेव ह्याचा महाप्रधान पद्मशिव हा आपणास राउल ह्या पदाविषयी नेमकेपणाने काहीच सांगत नाही. उलट त्याच्या नावामागे असलेले 'राउल' उपपद त्याचे महाप्रधानत्व, राजप्रति-निधित्व सुचवित असल्यामुळे येथे राउल हा शब्द 'राजकुल' ह्या शब्दाचे रूप असण्याचाच संभव अधिक आहे. यासाठी आम्ही पुढीलप्रमाणे विवेचन करतो.

## ११. शिलाहार लेखातील भोपक व्योमशिव :

याच शिलाहार वंशातील राजा मल्लिकार्जुन ह्याच्या राज्यकाळातील शके १०८३ या वर्षातील शिलालेख वसई येथे सापडला होता. तो आता मुंबईस प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्ये ठेवला आहे. ह्या लेखाचे प्रथम संपादन एपिग्राफीआ इंडिकाच्या ३३ व्या खंडात झाले आहे. या लेखाचा उद्देश्य महा-दुगी वझा याचा पुत्र लाषण वंगक याने कुठल्यातरी देवस्थानाचा जीर्णोद्धार केला आहे हे सांगण्याचा आहे. यात राजगुरु वेदशिव ह्यांच्यासह भोपक व्योम शिव ह्याचा उल्लेख आहे. यावरून भोपक व्योमशिव हाही राजगुरु असल्याचा तर्क म. म. डॉ. मिराशी ह्यांनी केला आहे. आणि अपरादित्य द्वितीय ह्या राजाच्या परळ शिलालेखात तसा उल्लेख असल्याचे तळटीपेत नमूद केले आहे.

पण परळ लेखात व्योमशिवाचा राजगुरु म्हणून अजिबात उल्लेख नाही. ह्याच द्वितीय अपरादित्य द्वितीय ह्या शिलाहार राजाच्या लोनाड शिला-लेखात भोपक व्योम शंभू ह्याचे नाव येते. त्याने व्योमेश्वर देवाचे मंदिर बांधून त्याला काही शेते दान केली असे वर्णन आहे. इथे त्याचा महाप्रधान असा उल्लेख आहे. लोनाड शिलालेखाची तिथी शके ११०६ अशी आहे.

या नंतर येतो द्वितीय अपरदित्य ह्याच्या काळातील परळ शिलालेख. तो शके ११०८ मधील आहे. त्यात महाप्रधान भोपक व्योमशिव ह्याचा उल्लेख येतो. तेथे मात्र त्याच्या नावामागे 'राजकुले' हे पद दिसते.

अर्थात् भोपक व्योमशिव वा व्योमशंभू ह्याच्या कर्तृत्वाचे तीन टप्पे आता असे सांगता येतील.

१. वसई येथील शके १०८३ च्या लेखात त्याचा उल्लेख राजगुरु वेदशिव ह्यांच्यासह येतो. तो त्याचा अनुयायी ( Lay disciple ) असावा. ह्या लेखात राजगुरु वेदशिव वा त्यांचा अनुयायी व्योमशिव ह्यांच्या नावामागे

'राउल' पद नाही हे लक्षात ठेवण्याजोगे आहे. त्याच्या स्तुतीसाठी 'संपत्ती-शाखः', 'याचककल्पवृक्षः' इत्यादी शब्द वापरले आहेत. व्योमशिव श्रीमंत गृहस्थ दिसतो. तो निदान शैव-योगी तरी नाही.

२. यानंतर त्याचा उल्लेख भोपक व्योमशंभु ह्या नावाने शके ११०६ लोनाड शिलालेखात येतो. येथे तो महाप्रधान या पदावर आसीन आहे. पण त्याच्या नावामागे 'राउल' पद नाही.

३. द्वितीय अपरादित्य ह्याच्या शके ११०८ च्या परळ शिलालेखात तो आपणास पुन्हा भेटतो येथे मात्र 'समस्त राज्यचिंताभारं समुद्वहति महा–मात्य भोपा व्योमशंभू राजकुले' असा उल्लेख आहे.

अर्थात् येथे 'राजकुले' हा शब्द राजत्व, महाप्रधानत्व अथवा राजासम अधिकार सुचविणारा आहे हे उघड आहे. व्योमशंभू जेव्हा राजसत्ता गाजविणारा अधिकारी नव्हता, वेदशिवाचा साधा शिष्य होता तेव्हा त्याच्या नावामागे 'राउल' हे पद मुळीच नव्हते. त्याचा गुरू प्रख्यात शैव पंडित वेदशिव ह्याच्याही नावामागे ते नाही. अजिबात नाही.

राजकुल हे पद व्योमशिव वा व्योमशंभु ह्याच्या नावामागे आले आहे तो समस्त राज्याचा राज्यकारभार पाहू लागल्यानतर (समस्त राज्य चिंता भारं समुद्वहति). अर्थात् राजकुल ह्या शब्दाचा लाकुल अथवा लकुलीशानुयायी ह्यांच्याशी अजिबात संबंध नाही हे स्पष्ट दिसते. इथे सम्राट अपरादित्याचा सर्वोच्च अधिकारी म्हणून त्याच्या नावामागे राजकुल ही उपाधी आली आहे. मध्ययुगात ब्राह्मणांच्या नावामागे पुष्कळदा 'राउत' असे पद लागत असे.[८]

## १२. राउळांचे ज्ञातिपुराण :

ह्या राऊत पदाचा तर राऊत>राऊद>राउल असा अपभ्रंश क्रम नसावा ना ? ठक्कर, भट्ट, पंडित अशी उपपदे ब्राह्मणांच्या नावामागे असत. त्यातीलच राउत हे पद दिसते. खानदेशात रावळ नामक एक जात आहे. ह्या ज्ञातीचे एक ज्ञातिपुराण प्रकाशित झाले आहे. त्यात राऊळ पुराणकाराने राउळ योग्याचा वेश वर्णिला आहे तो असा

ज्ञानविभूति चर्चुनि अंगी । केला शुद्ध बैरागी
अलक्षमुद्रा दोन्ही भागी । लेवविल्या स्वकर्णी ॥
आडबंद कौपिनी कटिप्रदेशी । शोभिन्नली तेजोराशि
दंडकमंडलु वेगेसी । शिवे आपण दिधला ॥
झोळी पावडी देऊनी । माळा मेखळा तेचि क्षणी
सेली गळा लेवउनि । सिंगी आयुध दिधले ॥

या ओव्या उद्धृत करून हा वेष 'उघड उघड' नाथ जोग्याचाच वेष आहे असे डॉ. रा. चिं. ढेरे सांगतात. या ओव्या उद्धृत करून त्यांनी काय साधले आहे कोण जाणे ? हा वेश जर नाथपंथी जोग्याचा असेल तर चांगदेव राउळ हे मुळीच नाथपंथी राउळ नाहीत असेच म्हणावे लागेल. कारण चांगदेव राउळ हे नाथपंथी जोग्याच्या वेषाने रहात, असे लीळाचरित्र सांगत नाही. लीळाचरित्र तर ते आपल्या हातात सूप–खराटा वागवीत आणि द्वारकेचे रस्ते झाडून कचरा सुपात भरून गोमती नदीत टाकीत असे वर्णन आहे. ही शीतला–मातंगी देवीची आयुधे आहेत असे डॉ. रा. चिं. ढेरे यांनीच विल्यम ऋुक ह्याच्या. The Popular Religion and Folk–lore of Northern India ह्या ग्रंथाच्या आधारे नोंदविले आहे.

गोविंदप्रभू अथवा गुंडम राउळ हे तर स्त्री वेशाने राहत. हा वेश शाक्त–तांत्रिक जोग्याचा आहे असे डॉ. ढेरे ह्यांचे भाष्य आहे. श्रीचक्रधर-स्वामी अथवा प्रतिष्ठानीचे चांगदेव राउळ हे तर आंगी, टोपरे, फुटा, सोन-सळी शेला, मेघवर्ण दुटी, पाटाऊ–पाग, त्रिवडी, वाहाणा अशा वेशात राहत. ते उर्ध्वपौंड्र गंध वैष्णव पद्धतीने धारण करीत. शक्ती स्वीकारापूर्वी त्यांना 'गोपालमंत्री दीक्षा : गोपाळण्ही आण :' होती. तरी त्यांच्या नावामागे 'राउळ' हे उपपद आहे म्हणून त्यांना लाकुल–शैव पाशुपत अथवा नाथपंथी जोगी मानायचे कां ? याचाच अर्थ असा की विभूती, अलक्षमुद्रा, शैली शृंगी धारण करणाराही शैव–पाशुपत, हाती सूप–खराटे धारण करणाराही पाशुपत किंचित स्त्रीवेशाची झांक असलेला पोशाख करणारा शाक्त तांत्रिकही पाशुपत आणि अत्यंत नेटकेपणे वस्त्र प्रावरणे वापरणारा आणि वैष्णवी गंध लावणारा पाशुपतच. कां तर त्यांच्या नावामागे 'राउळ' पद येते म्हणून. ते तर जैन आचार्यांच्याही नावामागे लावले जाते, तेव्हा 'राउळ' ह्या संज्ञेविषयी वेगळा विचार करावा लागणार हे उघड दिसते.

## १३. राउळ शब्दाची दुसरी व्युत्पत्ती :

आणि म्हणून लाकुल ह्या शब्दापासून राउळ हा शब्द तयार झाला असे मानण्यापेक्षा राउळ शब्दाची दुसरी व्युत्पत्ती शोधावीशी वाटते. 'थंडी वाजते' आणि 'सनई वाजते' ह्या दोन्ही वाक्यात वाजणे हे क्रियापद येते. पण ते दोन वेगवेगळ्या तऱ्हांनी व्युत्पादावे लागते. थंडी वाजते ह्या वाक्यात त्याची व्युत्पत्ती बाध = बांधणे या धातुपासून तर दुसऱ्या वाक्यात ती वाद् = वाजणे ह्या धातुपासून मांडावी लागते.

या शब्दाची व्युत्पत्ती –

अ. राव>रावो-रावु>रावुलु( स्वार्थे ' लु ' )>रावुलु>रावुळ> राउळ

ब. राज > राजुल ( स्वार्थे ' ल ' ) >राउल>राउळ

क. राउत>राउद>राउल>राउळ

अशी दोन प्रकारे मांडता येईल. राजुल हा शब्द छोटा राजा, राजा ह्या अर्थी वापरल्या गेल्याची आणि राजुल, राजल अशी विशेषनामे ठेवल्या गेल्याची अनेक उदाहरणे दाखविता येतील. उदाहरणार्थ

१. यादव सम्राट सिंघणदेव द्वितीय ह्याचा महाप्रधान बीचीराज ह्याची कन्या राजलदेवी हिचा लक्ष्मेश्वर शिलालेख. ही जैन होती. (Reports on South Indian Epigraphy 1915-36 p. 161) राहुलजु नावाच्या एका देशी शब्दांच्या कोशकाराचा उल्लेख हेमचंद्रसूरीने केला आहे. बुधमंगलदेव या जैन मुनीचा शिष्य राहुल नामक होता.[९] (नेमीनाथांच्या नियोजित पत्नीचे नाव राजुल होते.)

२. गुजराथ–राजस्थानमध्ये छोटया–मोठया राजांना सर्रास ' रावळ ' म्हणतात.

३. गुजराथमधील मध्ययुगीन हिंदू–मुस्लीम संघर्षाची पार्श्वभूमी असलेली एक कथा– सौ. मृणालिनी देसाई ह्यांच्या लेखणीतून उतरलेली–वाचल्याचे स्मरते. ह्या कथेत मेरामण हा देवीचा स्त्रीवेषधारी पुजारी असतो. सर्व राजांना उद्देशून तो ' रावळ सगळा भेग ' असे धिक्काराचे उद्‌गार काढतो.

३. डुंगरपूर येथील राजांना महारवळ ही पदवी आहे.

४. आंध्रातील लोक कोणत्याही क्षत्रियाला–मग तो राजा असो की नसो–राजन् म्हणतात असा उल्लेख मीमांसासूत्रावरच्या शबर भाष्यात आला आहे.[१०]

## १४. राउळ–राजसत्तेतील महत्त्वाचा अधिकारी :

आणि म्हणूनच प्राचीन शिलाताम्रशासनांमधून राजसत्तेतील महत्त्वाच्या अधिकाऱ्याचा उल्लेख राउळ अथवा वड्डराउळ ( मोठा राउळ ) असा येतो. याची अक्षरशः शेकडो उदाहरणे दाखविता येतील. उदाहरणार्थ

१. चालुक्य नृपती त्रिभुवनमल्लदेव ह्याच्या सण्ड येथील शिलालेखातील अधिकारी गोविंदरस हा वनवासे आणि मेल्पट्टे ह्या ठिकाणी ' वड्डरावुळ '

होता असे म्हटले आहे. राजाच्या उत्पन्नाचा एक फार मोठा भाग ह्या वड्डुरावुळांकडे जात असे. त्याला ' वड्डुरावुळद सुंक ' असे म्हणत असत. हा कर वसूल करण्यासाठी वेगळे अधिकारी नेमलेले असत. ' वड्डुरावुळ ' ह्या अधिकाऱ्याचे उल्लेख शेकडो कर्नाटकीय आणि आंध्र शिलालेखातून येतात. गोविंदरस हा वड्डुरावुळ होता ( Epigraphia Carnatica vol. VII Shikarpur Tq. No. 311 ] अशी कितीतरी उदाहरणे दाखवता येतील.

२. महाराष्ट्रातील दान-शासनातही राउळ हा शब्द राजसत्ता वा राजकिय अधिकाऱ्याचा बोधक म्हणूनच येतो. सम्राट सिंघणदेवाच्या पाटण ( ता. चाळीसगाव जि. धुळे ) येथील प्रख्यात शिलालेखाखातील [११] मराठी ागात आलेले

इयां पाटणी जे केणे उघटे तेयाचा असिआऊ जो राउला होता
ग्राहकापासी तो मठा दीन्हला.

हे वाक्य पहा येथे राउल हा शब्द उघडपणे राजसत्तेला ( पाटण येथील सर्वाधिकारी राजसेवकाला ? ) उद्देशून उपयोजिलेला दिसतो. ह्या लेखाचा काळ शके ११३९ असा आहे.

शिलाहार नृपती हरिपाल देवाच्या रानवड शिलालेखातही [१२] ( शके ११८१ ) ' पर्वनिमित्ते – – – श्रीराउले – – – दामोदर भट्टाचिया – – – भाऊवांप्रती संकरंती दीन्हलीआ ' असे वाक्य येते. येथे स्पष्टपणे राउल शब्दाचा राजा, अधिकारी ह्या अर्थी उपयोग आहे.

## १५. यादवकालीन साहित्यात ' राउळ ' :

राउळ ह्या शब्दाचा ' लकुलीशाचा अनुयायी–लाकुल–शैव–पाशुपत योगी ' असा अर्थ घेणे डॉ. रा. चिं. ढेरे ह्यांना सोयीचे आहे. पण यादवकालीन मराठी साहित्यात हा शब्द राव, राजा, सर्वाधिकारी ह्या अर्थाने वापरला जात असे हे आता दाखवू.

अ. नरींद्र कवीच्या रुक्मिणी–स्वयंवर ह्या काव्यात द्वारकेचे, तेथील भक्कम तटबंदीचे ( पौळीचे ) आणि सैन्याचे वर्णन आहे त्यात नरींद्र कवीने

माझारीली ती पौळीभीतरी । राउळीची साहाने आयुधे चारी
तेथं थोवेकारांच्या आवारी । होत दिशाभूल ॥ ८७६ ॥

ह्या ओवीतून श्रीकृष्णाच्या–द्वारकानगरीच्या राउळाच्या–सैन्याचे वर्णन केले आहे. नरींद्र हा कृष्णाचा निःसीम भक्त आहे. साल कवी, नृसिह कवी ह्यांना त्याने ' ऐसेही द्वारकेचा रामहाटु वर्णितेती तरी तुमचेया पापा पुरश्चरण होते '

अशा शब्दात ठणकाविले आहे. तो श्रीकृष्णास शैव पाशुपत योगी या अर्थाने राउळ म्हणणार नाही हे उघड आहे. शैव पाशुपत जोग्याजवळ चतुरंग सैन्यही असणार नाहीच.

ब. कवीश्वर भास्करभट्ट बोरीकर ह्यांच्या शिशुपालवध ह्या काव्यातील यादव सैन्याच्या प्रयाणाचे वर्णन प्रसिद्धच आहे. या सैन्याच्या प्रयाणामुळे अतिशय धांदल-गडबड उडाली. एक हडपीण ( सैनिकांना विडे देणारी स्त्री ) घाबरून हात वर करून उभी राहिली. तिच्या 'चोळियांची पाखे' वरती उचलली जाऊन तिचा स्तनभार उन्मुक्त झाला. तिच्या कुचपर्वताचे घाट चढता उतरता राउतांचे–सैनिकांचे–डोळे थकून गेले. ते जागीच उभे राहिले. मग सेनापती रागावले.

तव दळवै कोपले : चाला गा राउतन्हो म्हणितले
**राउळ** जवळा पातले : मागिला भारी ।।५६०।।

ह्या ओळीत स्पष्टपणे राऊळ हा 'स्वामी-गोसावी' ह्या अर्थीचा शब्द आला आहे.

क. मूर्तिप्रकाश ह्या मुनी केशिबासविरचित काव्यात डोमेग्रामचे महत्त्व सांगताना

की ते ममतेचे मंडळ : दयेची दानसाल
भद्री बैसुनी **राऊळ** : वेच करी ।।३९५।।

ह्या ओळीत चक्रधरांना ' राजा ' ह्या अर्थाने राउळ म्हटले आहे.

ड. कवी दामोदरपंडिताच्या वछाहरण ह्या काव्यात श्रीकृष्णाला उद्देशून स्वामी, राजा ह्या अर्थी राउल हा शब्द लावलेला आहे. उदाहरणार्थ

ऐया काजा देऊ नेणता जाला : तव ब्रह्मा निजभुवना गेला
गोप वासरुआ सुरवाडु केला : **राउलिची** म्हणौनी ।।२६४।।
**राउलिची** चोरि केली थोरी : परि उपसाहावे मुरारी
श्रुष्टिकर्ता पूर्वापारी : म्हणौनिया ।।३८०।।

या दोन्ही ओव्यांमधून श्रीकृष्णाला राजा, स्वामी ह्या अर्थाने राउळ म्हटलेले स्पष्ट दिसते.

इ. राउळ म्हणजे राजवाडा, राजकार्यालय, देवाचे मंदिर, राउळगण म्हणजे राजाचे अंत:पूर अशा अर्थाचे तर कितीतरी उल्लेख दाखविता येतील.

सारांश असा की महानुभावीय उपासक श्रीचक्रपाणी राउळ, श्री चांगदेव राउळ, गुंडम राउळ असा शब्दप्रयोग करतात तेव्हा राउळ हा शब्द ' स्वामी ' ह्या अर्थी वापरतात.

सर्वश्रेष्ठ सामर्थ्यवान् ह्या अर्थी राव हा शब्द वापरला जात असे. त्याचीच राउ-रावो अशी उकारान्त रुपे होतात. ( स्त्री भणिजे मत्त द्रव्याचा रावो कीं गा : सूत्रपाठ, आचार, सूत्र क्र. ९ ). या रुपांना स्वार्थी 'ल' हा प्रत्यय लागून राउल हे रूप सिद्ध होते. 'जे देहे ते देवे' ह्या न्यायाने स्वामी, प्रभू अशा लौकिक अर्थाचा हा शब्द ईश्वराला, गुरुला लावला जाऊ लागला. भट्टारक ही राजाची पदवी जैन गुरुंना आणि जैनेतर आचार्यांनाही लावली जाते. ठाकुर हे छोटया राजाचे पद श्रीकृष्णाला, श्रीरामकृष्णपरमहंसांना लावले जाते. तसाच हा प्रकार आहे.

महानुभावपंथीय आपल्या **परमेश्वर अवताराला** 'राउळ' म्हणून संबोधतात. ह्याचा अर्थच असा की राउळ ह्या शब्दाला लाकुल मतानुयायी संन्यासी अथवा शैव-पाशुपत योगी यापेक्षा काही वेगळा अर्थ आहे. श्रीचक्रपाणी राउळ आणि श्रीचक्रधर-राउळ हे शैव पाशुपत योगी नव्हतेच नव्हते. श्री गोविंदप्रभू अथवा गुंडम राउळही शैव-पाशुपत योगी नव्हते. अन्यथा इतर सर्व परिवार चक्रधरस्वामी, गोविंदप्रभू ह्यांना 'राउळ' म्हणत असता **दीक्षिताची कन्या : उपासनेयाची सून : नाथपंथी उपदेशू** : असलेली भक्त आउसा मात्र या दोघांनाही 'जी: जी: स्वामी जगन्नाथा' म्हणून संबोधते त्याची संगती कशी लावायची ? ( लीळाचरित्र पूर्वार्ध लीळा ३४१, उत्तरार्ध लीळा १०, १३, १९६ गोविंदप्रभू चरित्र लीळा क्र. १८६–१८९, १९२ इत्यादी पहा ).

## १६. 'तत्त्वसार' ग्रंथातील राउळ :

महाराष्ट्राला चांगा वटेश्वर ह्या सिद्धाचे चरित्र चांगले ज्ञात आहे. व्याघ्रावर बसून हातात सर्पाचा चाबुक घेऊन हा सिद्ध ज्ञानेश्वरादी भावंडांच्या भेटीसाठी आला होता ही कथा सर्वत्र लहानथोरांस परिचित असते. हा वटेश्वर नामक सिद्धाचा शिष्य. त्याचा तत्त्वसार नामक ग्रंथ प्रसिद्ध आहे. हा ग्रंथ त्यांनी हरिश्चंद्र गडावर शके १२३४ मध्ये लिहून संपविला. त्यात मागील सिद्धांची नावे सांगताना

अवधूत गुंडम राउळ शबरी
मनु अजागिरी
जिराबाई खेचरी
देमादेवी ॥८७७॥

असे एका गुंडम राउळाचे नाव आहे. महानुभावांना 'वेडेपिसे राउळ' म्हणून वंदनीय असलेल्या गोविंदप्रभूंचे नाव 'गुंडम राउळ' असेच आहे. या दोन्ही व्यक्ती एकच होत्या असे मानण्याचा मोह डॉ. रा. चिं. ढेरे यांना न होता तर

नवलच. ' पंचीकृत विवेक ' आणि शिवदीनकेसरी मठातील नाथसिद्धांच्या यादीत ज्या गुंडम राउळांचा समावेश आहे ते म्हणजेच तत्त्वसार ग्रंथातील गुंडम राउळ आणि तेच महानुभावांच्या पंचकृष्णांपैकी गुंडम राउळ अथवा गोविंदप्रभू असे डॉ. रा. चिं. ढेरे यांचे प्रतिपादन आहे. 'श्री. गोविंदप्रभूचरित्र' ग्रंथाचे संपादक विद्वद्रत्न डॉ. कोलते यांचे यावर भाष्य असे.

' तथापि गुंडम राउळ अथवा गोविंदप्रभू हे नाथपंथीय सिद्धयोगी म्हणून त्या वेळी अथवा त्या नंतरही कधीच प्रसिद्ध नव्हते. तेव्हा तत्त्वसार ग्रंथातील गुंडम राउळ कुणीतरी वेगळा असला पाहिजे. याचा अर्थ इतकाच की महानुभावपंथाप्रमाणेच नाथपंथातदेखील कुणीतरी गुंडम राउळ ह्या नावाचा सत्पुरुष होऊन गेला असावा. '[३]

वास्तविक डॉ. वि. भि. कोलते ह्यांचे हे विवेचन पुरेसे यथातथ्य आणि स्पष्ट आहे. नाथपंथीय सिद्धांच्या, ८४ सिद्धांच्या, वज्रयानी, सहजयानी सिद्धांच्या अनेकानेक याद्या भिन्नभिन्न स्थळी, भिन्नभिन्न काळी तयार झालेल्या आहेत. त्यात फार कमी एकवाक्यता आढळते. गोरक्ष, गहिनी, मछिंद्र यांच्या सारख्या महनीय सिद्धांचीही नावेही काही याद्यातून आढळत नाहीत. काही नावे मात्र बऱ्याचशा याद्यांमध्ये येतात. त्यात गुंडरिपा अथवा गौरुहपा यांचे नाव आहे. हे जातीने फासेपारधी असून डिसूनगरचे राहणारे होते. लीलापा गुंडरिया–हातिपा अशी काहीशी यांची परंपरा आहे. यांच्या नावावर काही पदे चर्यागीतीमध्ये दिलेली आढळतात. अर्थात् नाथसिद्धांमध्ये गुंडरिपा अथवा गोरुहपा नामक कुणीतरी वेगळा सिद्ध होता हे डॉ. वि. भि. कोलते ह्यांचे अनुमान सत्य ठरत आहे. हा गुंडरिपा कर्नाटक देशाचा रहिवासी होता असे तिबेटी परंपरा सांगते. कर्नाटकांत ' गुंडू ' हे नाव अक्षरशः सर्वसामान्य आहे. अर्थात् तत्त्वसारातील गुंडम राउळ हा महानुभावीय पंचकृष्णांपैकी गुंडम राउळ अथवा गोविंदप्रभू यांच्यापेक्षा वेगळा ठरतो. तत्त्वसारात उल्लेखिलेली शबरी ( शबरीपा ), अजगिरी ( अजोगिपा ) इत्याही नावेही ८४ सिद्धांच्या यादीत सापडतात.

## १७. चांगा वटेश्वर, चांगदेव राउळ, गोविंदप्रभू :

बरे इतकेही करून गोविंदप्रभू म्हणजेच तत्त्वसारातील सिद्धांच्या यादीत असलेले गुंडम राऊळ हे डॉ. रा. चिं. ढेरे यांचे मत स्वीकारावे तर श्रीचक्रधरस्वामी म्हणजेच द्वारावतीकार चांगदेव राउळ, तेच विवेकसिंधूकर्त्या मुकुंदराजाचे परमगुरु हरिनाथ आणि तेच चांगा वटेश्वर असे ते स्वतःच प्रतिपादन करतात. तेव्हा डॉ. ढेरे यांचे मत मान्य केले तर आपणासमोर ज्या समस्या निर्माण होतात त्या अशा.

१. श्रीहरिनाथ, चक्रधरस्वामी आणि चांगा वटेश्वर ही एकच व्यक्ती मानावयाची.

२. श्रीचक्रधरांनी शके ११९६ मध्ये उत्तरापंथे बीजे केले असे डॉ. वि. भि. कोलते यांनी ज्योतिर्गणिताच्या सहाय्याने सिद्ध केले आहे चांगा वटेश्वरांनी आपला 'तत्त्वसार' हा ग्रंथ शके १२३४ मध्ये लिहिला हे डॉ. रा. चिं. ढेरे ह्यांना मान्य आहे. या दोन तिथ्यांचा मेळ ते कसा घालतात कुणास ठाउक?

३. चांगा वटेश्वर हेच जर द्वारावतीकार चांगदेव राउळ असतील तर गोविंदप्रभू हे त्यांचे शिष्य ठरतात. मग चांगा वटेश्वरांनी आपल्या तत्त्वसार ग्रंथातील सिद्धांच्या यादीत आपल्याच शिष्याच्या नावाचा समावेश करावा हे विचित्र वाटत नाही काय ?

४. बरे एकदा द्वारावतीकार चांगदेव राउळ हेच चक्रधरस्वामी असे मान्य केल्यावर गोविंदप्रभू हे चांगदेव राउळांचे शिष्य महानुभाव परंपरेने ठरतात. ते डॉ. रा. चिं. ढेरे ह्यांना मान्यही आहे. पण मात्र पुन्हा चक्रधर हे गोविंदप्रभूंचे शिष्य होते. चक्रधर हेच चांगा वटेश्वर आणि गोविंदप्रभूंचे नाव चिघू ( चिद्धव हे त्याचे संस्कृतीकरण ) तेव्हा चिधादेवी चांगा हे गुरुनामयुक्त नाम चक्रधरांना चांगले साजून दिसते असेही डॉ. ढेरे यांचे प्रतिपादन आहेच. [१४]

५. सारांश हरिनाथ, द्वारातीरकार चांगदेव राउळ, चक्रधरस्वामी, चांगा वटेश्वर या चारही नावाने वावरणारी व्यक्ती एकच होती असे डॉ. रा. चिं. ढेरे यांचे प्रतिपादन आहे. यासाठी त्यांनी स्वतःच स्वीकारलेल्या मतांची कशी उलघाल केली आहे ते आपण पाहिलेच. मांजर कसेही फेकले तरी ते चार पायांवरच पडते असा त्यांच्या संशोधनाचा प्रकार आहे.

## १८. चांगदेव राउळांचे चरित्र :

महानुभावांच्या पंचकृष्णांपैकी फलटणचे चक्रपाणी राउळ अथवा द्वारावतीकार चांगदेव राउळ हे एक महत्त्वाचे अवतार होत त्यांचा जन्म फलटण येथे कऱ्हाडे ब्राह्मणांच्या घरात जनकनायक आणि जनकाइसा ह्यांच्या पोटी झाला. त्यांच्याविषयी जेमतेम १४ लीळा डॉ. वि. भि. कोलते ह्यांच्या लीळाचरित्र ह्या बृहद्ग्रंथात आहेत. कै. ह. ना. नेने आणि डॉ. शं. गो. तुळपुळे संपादित लीळाचरित्राच्या पाठात तर ती संख्या याहूनही कमी आहे. या लीळामधील अतिमानवी चमत्कारांचा भाग वजा केला तर काउरळीच्या कामाख्येच्या रतिदानाच्या आग्रहामुळे त्यांनी आपले शरीर त्यागले हा महत्त्वाचा भाग आहे. काउ-

रळीची कामाख्या नावाची योगिनी श्रीचक्रपाणी राउळांची परीक्षा घेण्यासाठी आली. तिने त्यांच्याकडे रतिदान मागितले. ती सात अहोरात्र त्यांच्या गुंफेच्या दाराशी उभी होती. शेवटी चक्रपाणी राउळांनी ते ' पूर ' म्हणजे शरीरच त्यागून नव्या शरीरात प्रवेश केला अशी ही कथा आहे.

या कथेचा सरळ अर्थ असा की भोग मागणाऱ्या योगिनी, त्यांच्याशी रतियुद्ध खेळणारे सिद्धयोगी, त्यांच्या अनेकानेक विकृत आचारांच्या कथा ह्याला समाज विटला होता – समाजातले सत्पुरुषही विटले होते. एरव्ही बहुडीने आव्हान करताच कान्ह अथवा कन्हपा जोगी रतियुद्धाला तत्काळ तयार होतो. [१५] आणि चक्रपाणी राउळ मात्र देहत्यागच करतात यांची संगती कशी लावायची. डॉ. रा. चिं. ढेरे ह्यांनी मात्र ह्या कथेतून नेमका उलटा अर्थ काढला आहे. त्यावरही फारसे स्पष्टीकरण न देता " उर्ध्वरेता योगी म्हणून त्यांची ख्याती होती. उर्ध्वरेता योगी हा रतिप्रसंगीच पारखला जातो हे उघड आहे " अशी शेरेमारी केली आहे.

यावर सहज आक्षेप असा की चांगदेव राउळांची उध्वरेता म्हणून प्रसिद्धी असल्याचे लीळाचरित्र सांगत नाही. अजिबात सांगत नाही. उलट लीळाचरित्र असे सांगते की तापसांना तपापासून ढळविणे हा काउरळीच्या कामाख्येचा आवडता छंद होता. [१६] ती आली होती रतिदान मागून त्यांचे तप ढळविण्यासाठी. त्यांच्या उर्ध्वरेतेपणाची परीक्षा घेण्यासाठी नव्हे. श्रीचक्रपाणी जर नाथसिद्ध असते तर ही परीक्षा–हे आव्हान त्यांनी आनंदाने स्वीकारले असते. त्यांच्या साधनेच्या मार्गावर ते त्यांना लाभदायक ठरले असते. अर्थात काउरळीच्या कामाख्येविषयीची ही " लीळा " चक्रपाणी राउळांचा सिद्धमार्गातील घृणित आचाराविषयीचा तीव्र निषेध दाखविण्यासाठी यते. त्याच लीळेवरून ते नाथसिद्ध असल्याची कल्पना करणे चुकीचे ठरेल.

## १९. श्रीचक्रपाणी राउळ आणि कायावरोहण :

काउरळीच्या कामाख्येच्या रतिदानाच्या आग्रहामुळे चक्रपाणी राउळांनी देहाचा त्याग केला. ' पुर त्यजिले ' त्याच वेळी भडोच येथे प्रधानाच्या पुत्राचा मृत्यू झाला होता ते शरीर त्यांनी स्वीकारले. लकुलीश ह्या शिव-अवताराच्या परकाया प्रवेशाची कथाही भृगुकच्छ – भडोचजवळ घडली आहे. अर्थात ह्या दोन्ही कथांतील साम्य तेव्हाच जाणवते. पण ह्या दोन्ही कथा सारख्या आहेत हा केवळ योगायोग नसावा असे डॉ. रा. चिं. ढेरे ह्यांचे त्याच्यावर अनावश्यक भाष्य आहे.

वास्तविक बत्तीस महापुरुष लक्षणे, त्रिकाल ज्ञान, परकाया प्रवेश इत्यादी कथांचे आकृतीबंध भारतभर सर्व धर्म, पंथ, संप्रदायांत सारखेच आहेत. एकाच सांस्कृतिक पार्श्वभूमीवर उदयाला आलेल्या ह्या सर्व धर्मसंप्रदायांची विश्वकल्पना ( कोशकल्पना Cosmology ) आणि पुराणकल्पना ( Mythology ) एकच आहे. आणि म्हणून हे संप्रदाय परस्परांचे सारखेच ऋणी असतातही आणि नसतातही. चांगदेव राउळ, लकुलीश, शंकराचार्य ह्यांच्या परकाया प्रवेशाच्या कथांचे आकृतीबंध सारखेच आहेत हे लुई रनू ह्या संशोधकाने आपल्या Religions of Ancient India ह्या ग्रंथांत पूर्वीच ( १९५३ ) नोंदविलेले आहे. [१७] गोरक्ष, कानिफ, जालंदर ह्यांच्या जन्मकथाही अशाच सिद्ध झाल्या आहेत. भगवान बुद्ध आणि महावीर तीर्थंकर ह्यांच्या मातांना गर्भावस्थेत पडणाऱ्या स्वप्नाचे असेच साम्य आहे.

परमेश्वराचे अवतार स्वीकार करण्याचे तीन प्रकार महानुभाव मानतात. हे तीन प्रकार गर्भीचा, दवडीचा आणि पतित स्वीकार असे आहेत. परमेश्वर मातेच्या गर्भात येतात तो गर्भीचा अवतार, मृत शरीर स्वीकारतात, तो पतित स्वीकार अवतार आणि आधी मातेच्या गर्भात असलेला जीव दवडवून तेथे अवतार घेणे हा तिसरा प्रकार. वैशालीमधील प्रख्यात क्षत्रिय वीर सिद्धार्थ ह्याची क्षत्रिय पत्नी त्रिशला हिच्या गर्भात महावीरांनी अवतार घेतला पण इंद्राने तो जीव तेथून काढून, दवडवून तो सिद्धार्थ क्षत्रियाची ब्राह्मण पत्नी देवनन्दा हिच्या गर्भात घातला असे श्वेतांबर जैन परंपरा सांगते. हा प्रकार महानुभावांच्या ' दवडीच्या अवतार स्वीकार ' पद्धतीशी अगदी जवळचा वाटतो. तेव्हा असले कथाबंध ( Motifs ) सर्वत्र सारखेच असतात. त्यापासून दूरान्वयित अनुमाने काढणे फारसे फायद्याचे नसते. तशी साम्यस्थळे तर यशोदासुत कृष्ण आणि जीजस क्रिस्त ह्यांच्याही चरित्रात दाखविली जातात. त्यावरून अनुमाने काढणे फारसे फलदायी नसते. आणि तशीच अनुमाने काढावयाची असतील तर ती निदान सुसंगत असावीत एव्हढीच नम्र अपेक्षा सामान्य अभ्यासकांची असते.

## २०. श्रीचांगदेव राउळाचा वेश :

फलटण येथे अवतार स्वीकारल्यानंतर आणि माहूर येथे श्रीदत्तात्रेयप्रभूकडून शक्ती स्वीकार केल्यानंतर श्रीचक्रपाणी राउळ हे द्वारका येथे राहू लागले. तेथे ते हाती सूप–खराटा धारण करीत आणि खराटयाने रस्ते झाडून, केर–कचरा सुपात भरून गोमती नदीत नेऊन टाकत. अर्थात् त्यांच्या हातात सूप–खराटा असे एव्हढेच आपणास विदित आहे, त्यांचा इतर वेष

कसा असे हे आपणास ठाऊक नाही. मूर्तीप्रकाशकार केशिराजबासांनी आपल्या मूर्तीप्रकाश ह्या ग्रंथात

> घेउनि मनुक्षवेखाची अवगणी: केली अवधूत–धर्माची संपादणी
> द्वारके क्रीडले चक्रपाणिः तया नमन माझे ।। १५ ।।

यावरून श्रीचक्रपाणी राउळ ' अवधूत ' होते–नाथपंथी सिद्ध होते अशी तर्क-परंपरा डॉ. रा. चिं. ढेरे यांनी मांडली आहे. आता नाथ–सिद्ध म्हटल्यानंतर त्याचा वेश लाकुलीशानुयायी–लाकुलासारखा–म्हणजे शैली, शृंगी, पाऊडी, त्रिशुळ, कटोरा असा असावयास हवा होता. नाथपंथी जोग्यांच्या कंथा, खापरी, दंड यांचे उल्लेख लीळाचरित्रात अनेक योग्यांचे संदर्भात येतात. स्वामींना वेरुळ येथे भेटलेल्या संतोष नामक योग्याजवळ कंथा, खापरी, दंड होता. त्यांच्या प्रतिस्पर्धी योग्याजवळही ही संप्रदाय चिन्हे होती. हीवरळी ( जालना ) येथे स्वामींनी ' जोगीवेखे मनभुली ' लीळा केल्याची नोंद लीळाचरित्रात आहे. येथेही त्यांनी कंथा, खापरी स्वीकाल्याचा उल्लेख आहे. अशा संप्रदाय चिन्हांचा माग–मूसही द्वारावतीकार चक्रपाणी ह्यांच्या हातात असल्याची नोंद नाही. उलट त्यांच्या हातात आहे खूप खराटा.

तेव्हा मूर्तीप्रकाशकार केशिराज सूरी जेव्हा ' चक्रपाणींनी अवधूत धर्माची संपादणी केली ' असे म्हणतात तेव्हा त्यांना ' अवधूत ' हा शब्दाचा सर्वसाधारण सत्पुरुष, संन्याशी हाच अर्थ अभिप्रेत आहे असे म्हणावे लागते.

वरे इतकेही करून श्रीचक्रपाणींच्या हातात सूप–खराटा असल्यामुळे ' चांगदेव राउळांच्या हातातील या वस्तू मातंगीच्या आयुधाचे प्रतिक म्हणून असतील काय ? तसे असले तर मातंगीपट्ट ह्या संप्रदायाच्या संस्थापनेशी त्यांचा संबंध अनुमानावा लागेल काय ? ' असेही डॉ. रा. चिं. ढेरे यांचे विवेचन आहे.

मग लकुलीशानुयायी–पाशुपत मत, त्याचे पुढे नाथपंथात समावेशन होणे, लाकुल या शिवयोग्याचा नाथपंथी रावळ होणे आणि तोच मातगी संप्रदायाचा संस्थापक होणे यात काय परस्परसंबंध आहे देव जाणे ?

ह्यातून अनेक प्रश्न निर्माण होतात. शीतला वा मातंगी देवीची आयुधे सूप आणि खराटा आहे असे मानले तरी त्या देवीचे उपासक ही आयुधे हातात बाळगतील काय ? उपास्य दैवताची आयुधे उपासक हातात बाळगतात काय ? मातगी वा शीतला ह्या लोकदेवता. त्यांचे संप्रदाय आदिम काळापासून वर्तत असता चक्रपाणी राउळांना मातंगी पट्टाचे संस्थापक मानता येईल काय ? लोक दैवतांच्या संप्रदायांना संस्थापक असतात काय ? स्वतः श्रीचक्रपाणी राउळ हे

डॉ. ढेरे ह्यांच्या मतानुसार कट्टर वैदिक धर्मानुयायी, जैनमतांचे खंडन करून वेदांचा उद्धार करणारे, लकुलीश मतानुयायी शैव–पाशुपत योगी, तेच हरिनाथ होते असे डॉ. रा. चिं. ढेरे ह्यांचेच मत असल्यामुळे मुकुंदराजांसारख्या आद्य-कविकीर्तीचे परमगुरु, म्हणून शांकर–अद्वैत मतांचे पुरस्कर्ते, श्रीचक्रधररूपाने श्रीकृष्णोपासक आणि एका परिपूर्ण तत्त्वज्ञानावर आधारित द्वैती भक्तीचा मार्ग प्रवर्तित करणारे असताना मातंगी संप्रदायाची आयुधे हातात धारण करतील काय ? चक्रधरस्वामी तर वैष्णव पद्धतीप्रमाणे उर्ध्वपौण्ड्र टिळा धारण करीत. त्यांना गोपालमंत्री दीक्षा होती. तेच हरिनाथ असतील तर त्यांच्या दक्षिण जंघेवर श्रीवत्सलांछन खूण होती असे त्यांचे परमशिष्य मुकुंदराज सांगतात. सारांश मातंगी पट्टाची स्थापना, जैनमत खंडण, वेदमार्गाची प्रतिष्ठा, श्रीकृष्ण उपासनेचे महत्त्व सांगणाऱ्या महानुभाव पंथाचे प्रवर्तन, हरिनाथरुपाने पाशुपत-व्रत साधना, काश्मिरी प्रत्यभिज्ञान संप्रदायाची झाक असलेला शांकर अद्वैत मार्ग रूढ करणे, पुन्हा चक्रधररुपाने शिव–विष्णू देवता 'अमोचक' आहेत असे म्हणणे, क्षुद्र देवी-देवतांचा निषेध सांगणे आणि तरीही मातंगी पट्टाची आयुधे मिरवितच राहणे इत्यादी सर्व गोष्टी एकाच व्यक्तिमत्त्वात सामावणे शक्य आहे काय ? मातंगी पट्टाची महाराष्ट्रातील ठाणी डॉ. ढेरे ह्यांनीच नोंदविली आहेत. ती डोमेग्राम (जि. अहमदनगर), जटवाडा (जि. औरंगा–बाद) इत्यादी ठिकाणी आहेत. यातील एकही देवस्थानाच्या पुजाऱ्याजवळ सूप अथवा खराटा ही आयुधे कां नसावीत ? चक्रपाणी राउळ जर वेदमार्गसंरक्षक आणि शांकर अद्वैत मार्गाचे संस्थापक – ( हरिनाथरुपाने ) होते तर गोविंद–प्रभूंचा शांकर अद्वैत संन्यास असता त्यांना सूप–खराटचाने मारून त्यांचा दंड मोडून टाकण्याचे कारण काय ? इत्यादी अनेक प्रश्न अनुत्तरीतच राहतात.

## २१. श्रीगुंडम राउळांचा वेश :

श्रीगोविंदप्रभू अथवा गुंडम राउळ हे ऋद्धिपूर येथे असत. अनंतनायक आणि नेमांबिका या काण्व ब्राह्मण दंपतीच्या गृही त्यांनी अवतार स्वीकारला. ते 'आरिख वेशाने' राहात. म्हणजे सोळा हात धोतर स्त्रीप्रमाणे नेसणे, कुंकू लावणे वगैरे हा वेश उघड–उघड शाक्त–तांत्रिकाचा आहे असे डॉ. ढेरे यांचे मत आहे. मग जर गुंडम राउळ हे नाथसिद्ध असतील–अगदी चांगा वटेश्वराने आपल्या तत्त्वसार ग्रंथातील यादीत त्यांचा समावेश करावा इतके महत्त्वाचे नाथसिद्ध असतील-तर त्यांचा वेश शाक्त तांत्रिक कसा ? म्हणजेच सूप–खराटा धारण करणे, माथी जवादी कस्तुरी भरून स्त्री वेशाने राहणे, सेली, शृंगी कंथा खापरी घेऊन जोगी वेशाने राहणे, उर्ध्व पौंड्र टिळा लावीत राजस वेशाने राहणे ही सर्वच लक्षणे एकाच संप्रदायाची समजायची काय ? महानुभावपंथ,

नाथपंथ, राउळ पंथ, मातंगी पट्ट हे सर्वच एकच होते असे म्हणायचे काय ? या सर्वांचा जर 'एकोळाच' सिद्ध करायचा असेल तर मग पुराव्याची उतरंड तरी कशाला रचायची ? हे सर्व-संप्रदाय एकाच सांस्कृतिक पार्श्वभूमीवर वावरत असल्यामुळे त्यांचे परस्परांवर असलेले प्रभाव नोंदवणे फार कठीण आहे काय ?

## २२. श्रीचांगदेव राउळांचे शिष्य :

मूळ लीळाचरित्रातील उण्यापुऱ्या १४ लीळांमधून श्रीचक्रपाणी राउळांचे चरित्र आपल्या समोर येते. चांगदेव राउळांचे बावन्न अनुग्रहित शिष्य होते. त्यापैकी एक शिष्य श्रीचक्रधरस्वामी वेरूळ येथे असता त्यांच्या दर्शनासाठी आले होते. श्रीचक्रधर स्वामी एकांक अवस्थेत विमनस्कपणे भ्रमण करीत असता कांतीनगरी ( हल्लीचे कांटोल जि. नागपूर ) येथे गेले होते. चांगदेव राउळांचे एक शिष्य तेथे 'राजगुरु' म्हणून राहत होते. श्रीचक्रधरांचे सुकलेले शरीर पाहून त्यांनी त्यांना वयस्तंभिनी विद्या दिली असे वर्णन लीळा-चरित्र एकांकात येते श्रीचांगदेव राउळांचा शिष्य असलेल्या ह्या राजगुरुचे नाव कै. ह. ना. नेने आणि डॉ. शं. गो तुळपुळे संपादित पिढीपाठाच्या पोथ्यांमधून नाही. उत्तरकालीन महानुभाव ग्रंथकारांनी ते उधळीनाथ असे दिले आहे. डॉ. कोलते ह्यांच्या नूतन संपादित लीळाचरित्रात ते आलेले आहे. पण त्या लीळेचा पाल्हाळिक विस्तार पाहता त्यांनी उत्तरकालीन पाठ स्वीकारला आहे असे वाटते.

पण 'राउळ' हे पद धारण करणाऱ्या चांगदेव राउळांच्या शिष्याचे नाव उधळी-नाथ असे 'नाथ' पदान्त कसे असा प्रश्न डॉ. रा. चिं. ढेरे यांना पडला आहे. याचे उत्तर ते असे देतात की पुढे केव्हातरी लाकुल अथवा राउळ ह्या पंथाचा समावेश श्रीगुरुगोरक्षनाथप्रणीत नाथसंप्रदायात झाला असावा. आणि म्हणून चांगदेव राउळाच्या शिष्यपरिवारात गुंडम राउळांसारखा राउळ जोगी आणि उधळीनाथांसारखा नाथसिद्ध आहे. गोरक्षनाथांनी स्वतःच्या सहा आणि शिवप्रणित सहा अशा बारा पंथांचे एकत्रीकरण केले असे सांगितले जाते. हे पंथ असे.

शिवप्रणित सहा पंथ

१. भूजचे कंठनाथ
२. पेशावर रोहतकचे पागलनाथ
३. अफगाणिस्थानचे रावळ
४. पंख वा पंक.
५. मारवाडचे बन
६. गोपाल वा 'रामके'

गोरक्षनाथप्रेणित सहा उपपंथ

१. हेडनाथ
२. आईपंथाचे चोलीनाथ
३. चांदनाथ कपिलानी
४. रतढोंडा, मारवाडचा बैराग पंथ अथवा रतननाथी
५. जयपूरचे पावनाथ
६. ध्वजनाथ महावीर

अशी ही बारा पंथांची व्यवस्था आहे.[१८] यात 'रावळ' पंथी जोगी आहेत तेच लाकुलानुयायी शैव– पाशुपत जोगी असे डॉ. ढेरे यांचे प्रतिपादन आहे. पण यावरही काही आक्षेप संभावतात ते असे.

१. गोरक्षनाथांच्या बारा पंथांत सामील झालेला हा राउल अथवा रावळ पंथ कोणता? तो लकुलीशानुयायी लाकुल पंथच होय असे समजण्यासाठी आपणाजवळ काय प्रमाणे आहेत? लाकुल शैव संप्रदायाचा फार मोठा प्रसार कर्नाटक भागात होता. शैव, पाशुपत आणि कापालिक ह्या शाखांचा विस्तार कमी अधिक प्रमाणात देशभर असता त्याची कालामुख शाखा मात्र कर्नाटक पुरतीच मर्यादित राहिलेली दिसते.[१९] त्यांचे अक्षरशः हजारो शिलालेख कर्नाटक प्रदेशात आणि कर्नाटकाच्या सीमावर्ती महाराष्ट्र प्रदेशात सापडतात. यात अनेक कालामुख आचार्य राजगुरुपद भूषवित असत असे दिसते.

२. आता गोरक्षनाथाचा समय इ. स. ९७० ते १०७० असा डॉ. रा. चिं. ढेरे यांनीच मानला आहे. तोच डॉ. म. रा. जोशी ह्यांनी स्वीकारला आहे.[२०] अर्थात लाकुल संप्रदाय जर गोरक्षनाथांनी नाथ–पंथात समाविष्ट केले असतील तर १२ व्या–१३ व्या शतकात त्यांचे लकुलीशानुयायी म्हणून स्वतंत्र अस्तित्व जाणवावयास नको किंवा शिवप्रेरित सहा उपपंथात कालामुख, कापालिक, पाशुपत, कारुणिक सिद्धान्ती वा त्यांच्या अन्य पंथाचा उल्लेख यावयास हवा. पण शिवप्रेरित सहा पंथांत तर कंठरनाथी, पागलनाथी, पंख वा पंक, मारवाडचे बन, गोपाल वा 'रामके' यांचा समावेश आहे. नाही म्हणायला ज्यांचा ओढून ताणून 'लाकुल' पंथाशी संबंध दाखवता येईल असा केवळ रावळ ह्या पथाचा उल्लेख आहे.[२१]

पण हे रावळही अफगाणिस्थानचे रावळ म्हणून ओळखले जातात. यांची वस्ती तिकडेच जास्त आहे. यांच्यात मुसलमान जोगी बहुसंख्येने असतात. हे आपला उद्‌गम नागनाथापासून सांगतात. म्हणून त्यांना नागनाथी राउळ म्हणतात. स्वतः डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी यांनी असे नोंदविले आहे की राउळ

पंथी आपला उद्गम धर्मनाथ–नामक नाथसिद्धापासून मानतात. धर्मनाथ हा पेशावरचा रहाणारा होता. तिथून ते धिनोधर ह्या ठिकाणी आले. त्याच्याही जन्माविषयीच्या अद्भूत कथा आहेतच. चारणदेवी नामक विधवेकडून त्याला नाथपंथी दीक्षा मिळाली. त्याचेच नाव रावळपीर पडले. रावळपिंडी हे ग्रामनाम ह्या जोग्यांमुळेच पडले आहे. धर्मनाथ अतिशय उत्तरकालीन आहे. [२२]

३. पागलनाथी आणि रावळ एकमेकांत मिसळून गेले आहेत. पागल–नाथी हे चौरंगीनाथ अथवा भक्त पूरण ह्यांच्यापासून आपला उद्गम सांगतात. ज्वालामुखी येथील राजा रसालु ह्याचा चौरंगीनाथ हा सावत्रभाऊ. ज्वाला–मुखीचा राजा माननाथ ह्याने नाथपंथी दीक्षा चौरंगीपासून घेतली. स्वतः चौरंगीनाथ आपल्या पित्याचे नाव मालवाहन असे देतो. सालवाहन हा सियालकोटचा राजा होता. [२३] चौरंगीनाथाचा प्राण–संकली नामक ग्रंथ आहे. त्याची भाषा भोजपुरी वाटते. हा ग्रंथ त्याने सिद्धतांत्रिकाचे मूलस्थान नालंदा विहार येथे असता रचला असावा. वायुतत्त्वभावनोपदेश हाही ग्रंथ त्याच्या नावावर आहे.

अफगाणिस्थानच्या रावळातही मादिया आणि गल (पागल पंथी) अशा दोन उपशाखा आहेत. त्यांचे मुख्यस्थान रावळपिंडी ह्या ठिकाणी आहे. उपर्युक्त रसालुच्या पित्याचे नाव गज असे होते. त्याची राजधानी ती गजबनी अथवा गजनी. असा ह्या नाथपंथांतर्गत रावळ शाखेचा व्याप अफगणिस्थान, पेशावर, रावळपिंडी भागाशी संबंधित आहे. [२४]

## २३. रावळ वेदविरोधी होते काय ?

ह्या नाथपंथांतर्गत रावळ शाखेत मुसलमानांचा भरणा अधिक आहे. हे स्वतः डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी ह्यांनी नोंदविले आहेच. याविषयी स्वतः त्यांनीच दिलेले स्पष्टीकरण त्यांच्यात शब्दात पुढे देतो.

‘ ... ... .. और इस्लाम अनेके बाद सारा देश जब दो प्रधान प्रतिस्पर्धी दलों के रूपमे विभक्त हो गया तो किनारे पर पडे हुअे अनेक संप्रदायों को दोनों में से किसी एक को चन लेना पडा। अधिकांश लोग ब्राह्मण और वेदप्रधान हिंदू समाज में शामील होने का प्रयत्न करने लगे। कुछ संप्रदाय मुसलमान भी हो गये। ... ... शैवों ने भी ऐसा किया और शाक्तो ने भी। परंतु कुछ मार्ग इतने वेद विरोधी थे कि उनका सामंजस्य किसी प्रकार इन मतोंसे नहीं हो सका वे धीरे–धीरे मुसलमान होते रहे।’ [२५]

आणि नानकदेव, गोरक्षनाथ आणि बाप्पारावळ, गोरक्षनाथ आणि प्रख्यात जैन कवी बनारसीदास ह्यांच्या भेटींच्या कथा अशाच निर्माण झालेल्या आहेत. यातील जैन कवी बनारसीदास हे तर सतराव्या शतकातील आहेत.

५. पण आपणास स्पष्टपणे जाणवते की गोरक्षनाथांच्या कालानंतरही ( इ. स. ९७०–१०७० ) लकुलीशाचा पंथ आपले स्वतंत्र अस्तित्व–गोरक्षाला शिवाचा अवतार मानूनही टिकवून होता. ज्या सित्रा प्रशस्तीमध्ये गोरक्षकाच्या मंदिराचा उल्लेख आहे तिचाच काळ १२७४ इ. स. असा आहे. तस्मात् गोरक्ष-नाथांच्या पंथामध्य राउळ अथवा लाकुल पंथ मिसळून गेला हे मत जरा जपूनच स्वीकारावे अशी सूचना करावीशी वाटते.

६. गोरक्षनाथांनी संघटित केलेल्या बारा पंथांपैकी सहा गोरक्षप्रेरित अशी विभागणी आहे. वास्तविक पहाता या बारा पंथांच्याही वेगवेगळ्या याद्या उपलब्ध आहेत. त्यातील काहींमध्ये तर रावळ नावच नाही. शिवप्रेरित सहा आणि गोरक्षप्रेरित बारा अशी अठरा पंथांची यादी ब्रिग्जने दिली आहे. यातील शिवप्रेरित संप्रदायांमध्ये मुसलमानांचा भरणा सर्वात जास्त आहे हे डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी ह्यांचे मत चिंत्य आहे. ( एक सरसरी निगाह से देखनेपर भी स्पष्ट हो जायगा आज भी उन्हीं संप्रदायोंमें मुसलमान जोगी अधिक हे जो शिवद्वारा प्रवर्तित और बादमें गोरक्षनाथ द्वारा स्वीकृत थे। [२८] )

७ याचाच अर्थ असा होईल की मूळ लाकुल अथवा राउळ संप्रदाय ( जो शिवप्रेरित आणि गोरक्षनाथ द्वारा स्वीकृत असे डॉ. ढेरे मानतात ) तो 'वेदबाह्य' विकृताचरणी आणि भ्रष्ट आचारा-विचाराचा असला पाहिजे. परंतु लाकुल संप्रदायांचा इतिहास असा नाही. लाकुल–आचार्य अतिशय शुद्ध-चरणी आणि यम–नियम दक्ष असत. तेव्हा गोरक्षनाथांच्या बारा संप्रदायाच्या यादीत असलेले हे पेशावर–अफगाणिस्थानचे 'रावळ' कुणी वेगळेच दिसतात. असेच मानावे लागते.

८. बरे इतकेही करून महाराष्ट्रातील श्रीचक्रपाणी अथवा चांगदेव राउळ, श्रीचक्रधरस्वामी अथवा चांगदेव राउळ, चांगावटेश्वर, ( कारण ह्या तिन्ही व्यक्ती एकच आहेत असा डॉ. ढेरे ह्यांचा तर्क आहे ), मुकुंदराजांचे परमगुरु हरिनाथ (हेच चक्रधरस्वामी होत असा डॉ. ढेरे ह्यांचा लाडका सिद्धांत आहे ) या सर्वांना लाकुलीश–पाशुपत पंथीयच मानायचे काय असा प्रश्न शिल्लक राहतोच.

श्री हरिनाथ हे शैव–पाशुपत होते. त्यांनी स्वत: पाशुपतव्रत आचरिले होते. आणि म्हणून त्यांची तत्त्वज्ञानसरणी ही काश्मिरी शैव–प्रत्यभिज्ञान

संप्रदायाला जवळची होती. त्यांच्या प्रशिष्याने - मुकुंदराजाने–विवेकसिंधु ग्रंथात शंकराचार्यांच्या अद्वैत तत्त्वज्ञानाचा आधार घेऊन विवेचन केले असले तरी त्यावर काश्मिरी शैव–प्रत्यभिज्ञान संप्रदायाची छाप आहे. आता मुकुंदराजांचे परमगुरु जरी पाशुपत मतानुयायी होते तरी त्यास लकुलीश संप्रदायांतर्गत पाशुपत कसे ठरवावे ? केवळ मुकुंदराज आपल्या गुरुला आदरार्थी राउळ ह्या शब्दप्रयोगाने संबोधतो म्हणून ?

चांगदेव अथवा चांगा वटेश्वर यांचा तत्त्वसार हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. चांगा वटेश्वर, चक्रपाणी राउळ आणि चक्रधरस्वामी ही एकच व्यक्ती आहे असा साक्षीदार पुढे आल्यास डॉ. ढेरे यांना अजिबात आश्चर्य वाटणार नाही असे ते म्हणतात. तेव्हा त्यांना चांगा वटेश्वर, चक्रपाणी राउळ, चक्रधरस्वामी आणि हरिनाथ ह्या चारही नावाने वावरणारी व्यक्ती एकच होती असे अभिप्रेत आहे असे म्हणावे लागेल. ( श्रीगोविंदप्रभू अथवा गुंडम राउळ ह्यांनाच त्यांनी ह्या **एकत्त्वापासून** कां मोकळे सोडले कुणास ठाऊक ? ) मग आता असे म्हणावे लागेल की हरिनाथ रूपाने पाशुपत व्रताचे आचरण आणि शांकर अद्वैत तत्त्वज्ञानाचा उपदेश, श्रीचांगदेव राउळ रूपाने लाकुल संप्रदायाची उपासना, त्याच रूपाने हातात सूप–खराटा वागवीत मातंगी संप्रदायाची संस्थापना, शांकर अद्वैत संन्यास धारण करणाऱ्या गोविंद-प्रभूंचा संन्यास दंड मोडून टाकणे, त्याच रूपाने फलटण येथे जैनांशी सामना करून वेदमार्गाची प्रतिष्ठापना करणे, वेदकर्माचरण पुन्हा ' चाली लावणे ', पुन्हा चक्रधररूपाने श्रीशैलपर्वती जाऊन गोरक्षनाथाची शिष्या मुक्ताई हिचे शिष्यत्व पत्करणे, पुन्हा श्रीगुंडम राउळांकडून शक्ती स्वीकार करणे, महानुभाव ह्या नवीन पंथाचे संपूर्णतः द्वैती तत्त्वज्ञान निरूपित उभय गंगातीरावर परिभ्रमण करणे, आपण नाथसिद्ध असल्याचे लपवीत नाथसिद्धांच्या कथा रसाळपणे सांगणे, राउळ ही नाथसिद्धवाचक उपाधी धारण करणे, शेवटी चांगा वटेश्वर रूपाने तत्त्वसार ग्रंथ लिहून त्यात चौऱ्यांशी सिद्धांच्या यादीत स्वतःचा शिष्य गुंडम राउळ, चक्रपाणी इत्यादींचा उल्लेख करून ठेवणे इतक्या सर्व गोष्टी एकाच व्यक्तिमत्त्वात बसवाव्या लागतील. मग चक्रपाणी हे नाव यादवकालीन महाराष्ट्रातील एक मोठीच पोतडी ( Hold–all ) होईल की हाताला येईल ते आणि सापडेल ते त्यात कोंबावे.

तस्मात् ह्या सर्वसमावेशक संशोधनपद्धतीने यादवकालीन धर्मजीवनातील गूढे आणि समस्या सुटतील अशी सुतरां संभावना नाही.

## २४. संशोधन–शास्त्राच्या मर्यादा :

आणि म्हणून आम्ही आग्रहाने असे प्रतिपादन करतो की संशोधन–शास्त्राच्या कसोटचा बेदरकारपणे पायदळी तुडवीत पुरोगामीपणाचा आव घालून अक्षरश: निरंकुश पद्धतीची जी संशोधनपद्धती महाराष्ट्रात रूढ होते आहे ती महाराष्ट्राच्या संशोधन-परंपरेला फारशी भूषणावह नाही. सण, उत्सव, लोकदेवता, लोकगायक, रूढी–चालीरीती ह्यांचा इतिहास लिहितांना उत्तरकालीन पुरावा वापरता येतो, पुराव्याचे कालानुक्रम वा अस्सलपणा काटेकोरपणे ठरविण्याची आवश्यकता नसते हे कुणीही मान्य करील. पण व्यक्तींचे इतिहास आणि चरित्रे लिहिताना हीच पद्धती वापरून कसे चालेल ? जिथे शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर दोन दशकांच्या आत त्यांचे चरित्र लिहिणारा कृष्णाजी अनंत सभासद त्यांच्या सुरतेच्या दोन लुटींविषयी घोटाळे करतो तिथे चांगदेव राउळांना चार–पाचशे वर्षांनी उत्तरकालीन असलेला, अविश्वसनीय अशा वाइंदेशकरवेलीतला, स्वत: भरमसाठपणे वाटेल ते दडपून लिहिणारा, स्वत:च्याच लिखाणात परस्पर-विसंगती निर्माण करणारा कृष्णमुनी कवी डिंभ हा यादवकालातील व्यक्तींच्या चरित्ररेखा लिहिण्यासाठी वापरताना थोडाही संयम दाखविला जाऊ नये काय ?

## २५. राउळ—संज्ञा आणि वेश ।

श्रीचक्रपाणी राउळ, श्रीचक्रधरस्वामी आणि श्रीगुंडम राउळ ह्यांच्या नावामागील राउळ हे उपपद पहाताच डॉ. ढेरे ह्यांना लाकुल संप्रदायी शैव–पाशुपतांची आठवण होते. मग महानुभावपंथाचे उपर्युक्त तिन्ही परमेश्वर–अवतार लाकुल अथवा नाथसिद्ध असावेत असे ते ठरवतात. यासाठी राउळांच्या ज्ञातिपुराणातून शैली, शृंगी, पावडी, त्रिशूळ, मेखळा असा राउळ जोग्यांचा शैव-वेशही काढून दाखवतात. म्हणजेच ह्या महानुभावीय परमेश्वर अवतारांना राउळ अथवा शैव-योगी ठरवायचे ते राउळ ह्या उपपदामुळे आणि रावळांच्या ज्ञातिपुराणात रावळ हे शैव-योगी आहेत ह्या आधारावर, पण हेही मान्य केले तर आणखी समस्या निर्माण होतातच. त्या अशा

१. चक्रपाणी–राउळांच्या शैव वेशाचा कुठेही उल्लेख नाही. ते तर हातात सूप-खराटा धारण करीत.

२. गोविंदप्रभू तर भांगी जवादी, भवरी आदी लक्षणांनी स्त्रीवेशाने राहत. हा तर शाक्त तांत्रिक वेश आहे. मग त्यांच्या नावामागे राउळ हे लकुलीशानुयायीत्व दाखविणारे उपपद कसे ? मग पुन्हा त्यांनी शांकर अद्वैत

संन्यास का घेतला ? मातंगी पट्टाची आयुधे धारण करणाऱ्या चक्रपाणी राउळांनी त्यांना शाक्त संप्रदायी दीक्षा दिली म्हणावी तर ते स्वतः तर नाथसिद्ध होते, वेदमार्ग प्रतिष्ठापनाचार्य होते, त्यांना लाकुल मतानुयायी ठरविण्यासाठी महाराष्ट्रातील शैव-पाशुपत आचार्यांचा फार मोठा आढावा डॉ. ढेरे ह्यांना घ्यावा लागला आहे.

३. पण अगदी महाराष्ट्रातही इसवी सनाच्या बाराव्या शतकापर्यंत शैव-पाशुपत आचार्यांचे स्वतंत्र अस्तित्व दिसते. रट्टवंशीय बल्लाळाच्या शिलालेखातील शैव आचार्यांचे उल्लेख इ स. ११९० च्या सुमाराचे आहेत. अशा अवस्थेत चक्रपाणीसारखा शैव पाशुपत योगी मातंगी संप्रदायाची संस्थापना करील हे कसे पटावे ?

४. श्रीचक्रपाणी राउळ हे मनुष्यवेशाची अवगणी घेऊन अवधूत धर्माची संपादणी करीत होते असे केशिराजबासांच्या मूर्तिप्रकाशाच्या आधारावरून डॉ. ढेरे ह्यांनी नोंदविले आहे. इथेही अवधूत म्हणजे नाथसिद्ध असा अर्थ ते सोयीस्करपणे घेतात. पण अन्यत्र मात्र ते अवधूत म्हणजे विधिनिषेधातीत अवस्थेत वावरणारा महापुरुष असा अर्थ करतात. आता कोणत्याही पंथ उपपंथाचा साधक असो तो साधनेच्या सिद्धीनंतर विधिनिषेधातीतच असतो. श्रीकृष्णासाठी ' जनम जनम क्वारी ' राहिलेली मीराबाई, कूडल-संगमदेवाला आर्ततेने हाकारणारे बसवेश्वर, समुद्राच्या निळचा पाण्याचा रंग पाहताच कृष्णरुपाची आठवण होऊन बेभान होणारे चैतन्यप्रभू, महारांना श्राद्धान्न खाऊ घालणारे श्रीएकनाथ सगळेच लौकिक अर्थाने विधिनिषेधातीत असतात. पण तरीही उपास्य दैवत, संप्रदाय, संप्रदायचिन्हे, गुरुपरंपरा इत्यादी गोष्टी ते मानतातच. कारण तो त्यांचा साधनामार्ग असतो. कारण सिद्धपद प्राप्त झाल्यावरही लौकिक अर्थाने कर्म उरतेच. ते देह असेपर्यंत करावेच लागते. या कर्माला आध्यात्मिक परिभाषेत कुलालचक्राचे अतिरिक्त भ्रमण म्हणतात. घट तयार झाल्यावरही कुंभाराचे चाक फिरतच असते. त्यामुळे सिद्धत्व प्राप्त झाले तरी नित्य-नैमित्यिक कर्मे, साधना-संप्रदाय ह्यांचा त्याग करता येत नाही. आणि म्हणून अनेक शिष्य आपल्या गुरुला अवधूत, गोसावी, स्वामी, प्रभू, नाथ, सिद्ध, सर्वज्ञ आदी म्हणतात. पण जिथे जिथे अवधूत वा नाथ शब्द आला तिथे तिथे नाथसंप्रदाय वा शैव पाशुपत संप्रदायच अभिप्रेत आहे असा अर्थ काढणे उचित नसते. वैष्णव संप्रदायातील कित्येक आचार्यांची नावे ' नाथ ' पदान्त आहेत. वैष्णव संप्रदायातील गोस्वामी विठ्ठलनाथ ह्यांच्या नावात ' नाथ ' पद स्वामी ह्याच अर्थाने आले आहे. त्यावरून ते नाथपंथीय असल्याचे अनुमान काढणे कितपत युक्तीसंगत ठरेल.

तेव्हा कुण्याही सत्पुरुषाच्या चरित्राचा आणि चरित्र कार्याचा विचार करताना केवळ त्यांच्या नावातील उपपद अथवा वेश ह्यांचा विचार करून चालणार नाही. त्याचा संप्रदाय, परंपरा आणि त्याच्या साधनामार्गात मान्य असलेले तत्त्वज्ञान ह्यांचा विचार टाळून चालणार नाही.

## २६. कृष्णमुनी कवी डिंभ :

आपल्या चक्रपाणी राउळ म्हणजे लाकुल मतानुयायी नाथसिद्ध ह्या मतांचे समर्थन करण्यासाठी डॉ. रा. चिं. ढेरे ह्यांनी आधार घेतला आहे कृष्ण-मुनी कवी डिंभ ह्याचा. त्याच्या आधारहीन, भरमसाठ आणि स्वतःशीच विसंगत असलेल्या ( Self-Contradictory ) लेखन पद्धतीचा समाचार आम्ही चक्रपाणी-चिंतन ह्या ग्रंथात पृ. ५९ ते ७० वर घेतलाच आहे. ह्या कवीला नव्या कथा बनवून सांगण्याची अनिवार हौस आहे. सिंघणदेव यादवाचे गुरु हे प्रतिष्ठान अथवा पैठण येथील ज्ञान मार्गी साधू होते. त्याचे नाव विभूती राउळ. जैनांनी त्यांना वादात हरवले आणि त्यांचा 'ज्ञान' मार्ग हा मातंगमूळ असल्याचे सिंघणदेव यादवाला पटवून दिले. त्याला जैन धर्माची दीक्षा दिली. मग बद्रिकाश्रमी 'धर्मऋषीचा कुमर । जया नाव नारायण अवतार । तेणे धरिला मानवी अवतार । तिये फळस्थळी ।।' या प्रकारे बद्रिकाश्रमातील धर्मऋषीच्या कुमराने नारायणाने फलटण येथे चक्रपाणी राउळाचा अवतार घेऊन जैन मताचे खंडण केले आणि वेदकर्माचरण । चाली लाविले ।। ही कथा कृष्णमुनीने नव्यानेच निर्माण करून दडपून दिली आहे. डॉ. ढेरे या कथेवर पूर्णपणे विश्वास ठेवण्यास तयार आहेत. आता या कथेतील अगदी उघड दिसणाऱ्या विसंगती नोंदवितो.

१. सिंघणाचे गुरु हे प्रतिष्ठानाचे विभूती राउळ होते. म्हणजेच ढेरे मतानुसार ते लाकुलीश-पाशुपत अथवा नाथ-सिद्ध होते. कृष्णमुनी कवी डिंभ त्यांना ज्ञानमार्गी म्हणतो. पण लकुलीश-पाशुपत पंथाचे व नाथसिद्ध पंथाचे अपर नाव 'ज्ञान मार्ग' होते याचा पुरावा काय ? मत्स्येंद्रनाथांपासून मीन, पिपिलिका आणि विहंगम मार्ग प्रकटले. शैव-पाशुपतांच्याही अनेक शाखा अनेक नावांनी ओळखल्या जातात. पण त्यात एखाद्या शैव शाखेला 'ज्ञानमार्ग' म्हटल्याचे पुरावे यावयास हवेत. गोरक्षप्रणित पंथाचे नाव तर सिद्धान्त मार्ग असे होते.

२. हा शैव-पाशुपत योगी विभूती राउळ मातांग मुळीचा असल्याचे जैन सांगणार आणि सिंघणासारखा सम्राट त्यावर विश्वास ठेवणार हे अंमळ चमत्कारिकच वाटते.

३. अशा शैव-पाशुपत राउळ योग्याची बाजू घेण्यासाठी अवतार होणार तो विष्णूचा. तो चक्रपाणी–रूपाने हातात मातंगी पट्टाचा सूप–खराटा घेऊनच. आणि क्षपणिकांचा पराभव करून तो ' राउळ मार्ग ' स्थापणार नाही तर ' वेदकर्म चाली लावणार ' आता चक्रपाणी–राउळांच्या हातात सूप–खराटा असल्यावर त्यांचा मार्ग ' मातंग मूळ ' आहे हे सिंघणाला पुन्हा कोणी पटविण्याची अजिबात आवश्यकताच उरत नाही हे चक्रधरस्वामींच्या निष्ठावन्त पाइकाच्या–कृष्णमुनीच्या लक्षात आले नाही यावरूनच त्याची 'स्वतंत्र प्रज्ञा' व्यक्त होत नाही काय ?

४. बरे, पराभूत झालेला हा विभूती राउळ निराश होऊन करतो काय तर काळभैरवोपासक होतो. आणि त्याविषयी कृष्णमुनी कवीडिंभाला म्हणे खंत वाटते. आणि मूलतः शिवमंदिरात पुजारी म्हणून राहणारे ' तपोधन ' हे लाकुल पाशुपत संप्रदायाचे अनुयायो होते आणि ते पुढे महाराष्ट्रात गावोगावी असलेल्या काळभैरव मंदिरातील उपासनेत भराडी म्हणून रुजू झाले ही त्याला डॉ ढेरे यांची पुस्ती. जणू काही शिव आणि काळभैरव ह्या दोन देवता आहेत ! भैरव–तंत्र, भैरव–आगम, भैरव–अवस्था, भैरव–अष्टक आदींची मान्यता शैव–पाशुपत संप्रदायात प्राचीन कालापासून नाही काय ? शैव–पाशुपत मार्गात भैरवी अथवा चक्र यांचे काय महत्त्व आहे हे विशद करून सांगावे लागेल काय ? शिवमंदिरात असणारे भरटक ' महाराष्ट्रात गावोगाव असणाऱ्या ' काळभैरव मंदीरात जाऊन ' भराडी ' झाले व नाथपथी झाले या प्रतिपादनाला काय म्हणावे ? भरटक म्हणजे सेवक. तो भृत्य या शब्दापासून आला आहे उत्तर भारतात त्यांना ' भराई ' म्हणतात. ' सरभराई ' शब्दात तोच भाव आहे.

सारांश कृष्णमुनी कवी डिंभासारख्यांच्या साक्षी नीट तपासून, पारखून स्वीकारल्या पाहिजेत असे नम्रपणे सुचवावेसे वाटते.

५. आणि शेवटी कृष्णमुनी कवी डिंभ अथवा दर्शन–प्रकाशकार मयंकसुत मुरारी ह्याच्या साक्षी प्रमाण धरतांना महानुभाव पंथाची काय नावे होती हेही निश्चित करावी लागतील. ज्ञानमार्ग, मुंडी दर्शन, न्याय-वैशेषिक ही नावे ह्या ग्रंथकारांनी बेजबाबदारपणे महानुभाव पंथासाठी वापरली आहेत. ती वापरत असताच शैव–पाशुपत, नाथपंथी, न्याय–वैशेषिक ह्यांच्यावर बेसुमार तोंडसुखही घेतले आहे. त्याची चर्चा मागे चक्रपाणी–चिंतन ह्या ग्रंथात पृष्ठ १२०–१३६ वर आलेलीच आहे. तस्मात् ह्यांच्या लिहिण्याला धरबंध नाही हेच खरे. त्यांच्या साक्षीवर विसंबून किती लांब-रुंद आणि परस्पर–विरोधी अनुमाने काढीत राहायचे हा ज्याच्या त्याच्या भाबडेपणाचा प्रश्न आहे. पण

मग आपण परखड, पुरोगामी इत्यादि इत्यादि आहोत हा मुखवटा मात्र टाकून द्यावा एवढेच सांगावेसे वाटते. असो

तेव्हा महानुभाव पंथीय आपल्या परमेश्वर-अवतारांना राउळ म्हणतात तेव्हा ते 'ते' संबोधन केवळ आदरार्थीच वापरतात. जैनांमध्येही त्यांच्या आचार्यांना उद्देशून राउळ ही संज्ञा लावली जातेच. तस्मात चक्रपाणि–राउळ, चक्रधरस्वामी अणि गुंडम राउळ ह्यांना नाथसिद्ध म्हणणे धाष्टर्याचेच ठरेल.

राउळ ह्या शब्दाची दुसरीही व्युत्पत्ती असू शकेल हे ध्यानात घेतले जावे. त्या व्युत्पत्तीनुसार ह्या संज्ञेचा अर्थ लावण्याचा प्रयत्न व्हावा.

महानुभावपंथीय आपण शैव असल्याचे लपवितात, श्रीचक्रधर आणि हरिनाथ एकच असल्याचे लपवितात, श्रीएकनाथ महाराज आपली गुरुपरंपरा लपवितात, श्रीमुकुंदराज आपल्या गुरुचे ( ढेरे मतानुसार रामदेव दादोसांचे ) निंदास्पद चरित्र लपवून ठेवतात, श्रीचक्रधर आपली श्रीशैलयात्रा व तांत्रिक साधना लपवून ठेवतात असे मानत गेल्याने सर्व प्रश्न सुटतील असे नव्हे आणि म्हणून काही गोष्टी संशोधकांनी अगदी धर्म म्हणून पाळल्या पाहिजेत असे सुचवावेसे वाटते.

विवेचनाचा विस्तार वाढला. पाल्हाळ आणि पुनरुक्तीचा दोष पत्करूनही विवेचन सुस्पष्ट व्हावे असा प्रयत्न केला आहे. तेव्हा वाचकांची क्षमा याचना करून पुढील निर्णय नोंदवतो.

१. यादवकालीन धर्म साधनेची गूढे उकलताना उत्तरकालीन पुरावे वापरणे फारसे इष्ट नाही. तसे ते वापरले तरी त्यातील सत्यासत्यतेचा कस नीट तपासून पाहिला जावा. निदान ते परस्पर–विसंगत नाहीत इतके तरी-तपासून बघावे. निदान त्यातील काही भाग उद्धृत करून आणि बाकीचा गाळून टाकून, ओव्या पुढेमागे करून, काही ओव्या गाळून वाचकांची दिशाभूल करू नये.

२. एखादे अनुमान मांडतांना ते सावधपणे मांडावे. त्याला विरोधी जाणारे पुरावेही असू शकतील याची शक्यता नाकारू नये. त्या अनुमानांच्या आधारावर फार मोठाले निष्कर्ष काढू नयेत.

३. संशोधन हा ज्ञान–यज्ञ आहे. आपल्या विरोधी जाणाऱ्या मतांची दखल न घेणे, आपलीच मते पुन्हा–पुन्हा मांडत राहणे, आपल्या सिद्धान्तांचे खंडणपर लिखाण जणू झालेच नाही अशी भूमिका घेणे, आपण सांगितलेल्या तथाकथित सिद्धान्ताला सामोरे जाण्यातच बुद्धीचे सार्थक आहे असे आधीच

म्हणून ठेवणे, आपण फार निरलस, भावनाशील, शोधवेडे, निष्पाप संशोधक आहोत असा भास निर्माण करीत अक्षरशः मनाला येईल ते लिहीत राहणे, आपल्या सिद्धान्ताचे खंडण करणारे संशोधक प्रतिगामी आहेत असा भास निर्माण करणे ह्या काही फार प्रशंसनीय गोष्टी नव्हेत.

४. ताजमहाल हा हिंदू राजवाडा आहे असे सिद्ध करताना श्री. पु. ना. ओक ह्यांनी जी बेसुमार दडपेगिरी केली, वटेश्वर येथील शिलालेखाविषयी ज्या कोलांट उड्या मारल्या त्या पाहून 'राजकारणातील भ्रष्टाचार आता संशोधन क्षेत्रातही शिरला' असे हताश उद्गार महामहोपाध्याय गुरुवर्य डॉ. वा. वि. मिराशी ह्यांनी काढले.[१९] मराठी साहित्य संशोधनाविषयी तशी वेळ महाराष्ट्रात न येवो हीच प्रार्थना.

* *

## संदर्भ-टीपा


१. डॉ. आर्. जी. भांडारकर, शैविजम, वैष्णवीजम अँड मायनर रिलीजस सेक्टस् पृ. ७२

२. तत्रैव

३. डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी, मध्यकालीन धर्मसाधना. पृ. ३९–४०

४. डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी, नाथसंप्रदाय, पृ. १५६ व पुढे

५. Hultzsch. Corpus Inscriptionum Indicarum Vol. I

६. महाराष्ट्र–इतिहास मंजरी. सं. द. वि. आपटे. पृ. १८९.

७. डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी. नाथसंप्रदाय पृ. १५६ व पुढे

८. डॉ. वा. वि. मिराशी. कलचुरी नृपती आणि त्यांचा काल पृ. ५२

९. डॉ. हीरालाल जैन. भारतीय संस्कृतीमे जैन धर्मका योगदान. पृ. १६१–१९८.

१०. डॉ. अ. स. अळतेकर. दी राष्ट्रकूटाज अँड देअर टाईम्स पृ. २६४.

११. एपिग्राफिआ इंडिका. खंड १ ला. पृ. ३३८–३४६.

१२. प्राचीन मराठी कोरीव लेख. क्र. ३२. पृ. १५६–१६१.

१३. डॉ. वि. भि. कोलते. गोविंदप्रभूचरित्र. प्रस्तावना पृ. ३३.

१४. डॉ. रा. चिं. ढेरे. चक्रपाणी. पृ. १४५.

१५. डॉ. वि. भि. कोलते. लीळाचरीत्र. उत्तरार्ध लीळा क्र. १९४,

१६. तत्रैव. पूर्वार्ध लीळा क्र. १६.

१७. Louis Renou. Religions of Ancient India. p. 94.
१८. डॉ. प्र. न. जोशी. नाथसंप्रदाय, उदय व विस्तार. पृ. १५३–१५४.
१९. Dr. B. G. L. Swamy & Nanjudan. Bulletin of the Institute of Traditional Culture Madras. 1972. p. 101.
२०. डॉ. म. रा. जोशी. विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक १९६८, पृ. २१४.
२१. डॉ. प्र. न. जोशी. नाथसंप्रदाय. पृ. १५३–१५४.
२२. डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी. नाथसंप्रदाय. पृ. १५६ व पुढे
२३. तत्रैव.
२४. डॉ. प्र. न. जोशी. नाथसंप्रदाय. पृ. १८५.
२५. डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी. तत्रैव.
२६. डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी, मध्यकालीन धर्मसाधना. पृ. ८०–८१.
२७. तत्रैव.
२८. Cintra Inscription. Epigraphia Indica Vol. I. pp. 271 f.
२९. डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी, मध्यकालीन धर्मसाधना. पृ. ८०–८१.
३०. डॉ. वा. वि. मिराशी. संशोधन–मुक्तावली सर ७ वा. पृ. २३०.

* *

## संदर्भ ग्रंथ :

### १. प्राचीन साहित्य :


१. श्रीज्ञानेश्वर

ज्ञानेश्वरी : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि शिक्षणखाते ( दु. आ. ) १९६३.

२. म्हाइंभट

अ. लीळाचरित्र : संपादक ह. ना. नेने.

( एकांक, पूर्वार्ध खंड १, २, ३, उत्तरार्ध ) प्रकाशक बाबू गोविंद सहाय १९३७.

ब. लीळाचरित्र : संपादक शं. गो. तुळपुळे

( एकांक, पूर्वार्ध भाग १, २, उत्तरार्ध भाग १, २ ). प्रकाशक सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर, १९६४–६७.

क. लीळाचरित्र, संपादक : डॉ. वि. भि. कोलते, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ १९७९.

३. श्रीमुकुंदराज

विवेकसिंधु : संपादक कृ. पां. कुलकर्णी

लेखन–वाचन भांडार. पुणे १९५७.

४. श्रीचक्रधर–निरूपित सूत्रपाठ

प्रकाशक माधवराज पंजाबी

राजापेठ, अमरावती.

५. म्हाइंभट

गोविंदप्रभू चरित्र ( दु. आ. ) १९६०.

६. नरेंद्र

रुक्मिणी–स्वयंवर

( दु. आ. ) १९६६

७. बाइदेव व्यास ( ? )

स्थान–पोथी

( दु. आ. ) १९७६

८. भास्करभट्ट बोरीकर

शिशुपालवध

१९७२

९. विश्वनाथ व्यास

ज्ञान प्रबोध

१९७३

१०. दामोदर पंडित
वछाहरण
( ति. आ. ) १९७९
( क्र. ५ ते १०. सर्व ग्रंथांचे संपादन डॉ. वि. भि. कोलते आणि प्रकाशन अरुण प्रकाशन, मलकापूर यांचे आहे ).
११. रवळो व्यास
सह्याद्री वर्णन. संपादक डॉ. वि. भि. कोलते
१९६४. पुणे, विद्यापीठ पुणे
१२. केशिराज व्यास
मूर्तिप्रकाश. संपादक डॉ. वि. भि. कोलते
१९६२. विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर
१३. कृष्णमुनी कवी डिंभ.
ऋद्धिपूर माहात्म्य. संपादक डॉ. यू. म. पठाण
१९७९. प्राचीन साहित्य प्रकाशन संस्था, सोलापूर
१४. कृष्णमुनी कवी डिंभ
आत्मतीर्थ प्रकाश. संपादक म. श्रीकृपणदास महानुभाव
१९६४. गीता आश्रम, हैदराबाद.
१५. नवरसनारायण
शल्यपर्व. संपादक डॉ. यू. म. पठाण
१९६४. मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद.
१६. महानुभाव इतिहास प्रकर्ण
संपादक अ. का. प्रियोळकर
१९६५ मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय. दादर, मुंबई – १४
१७. चांगा वटेश्वर
तत्त्वसार. संपादक डॉ. ह. रा. दिवेकर
१९६३. प्राचीन ग्रंथसंग्रहालय उज्जयिनी. ( म. प्र. )
१८. मतिरत्नाकर व दर्शन प्रकाश
१९०१. चित्रशाळा प्रेस, पुणे
१९. शेख महंमद
योग संग्राम संपादक वा. सी. बेंद्रे
१९५९. पी. पी. एच्. बुकस्टॉल. खेतवाडी मुंबई – ४.
२०. शेख महंमद
कविता संग्रह संपादक. वा. सी. बेंद्रे
१९६१. पी. पी. एच्. बुकस्टॉल मुंबई.

२१. एकनाथ महाराज.
चतु:श्लोकी भागवत. संपादक. न. वि. पणशीकर
( श्रीसंत एकनाथकृत आठ ग्रंथ. )
१९६ . यशवंत प्रकाशन पुणे – २.
२२. एकनाथ महाराज
एकनाथी–भागवत.
१९२९. दामोदर सावळाराम आणि मंडळी.
२३. महिपती.
एकनाथ व तुकाराम चरित्र. संपादक. ज. र. आजगावकर
१९४४. बाँत्रे बुक डेपो. मुंबई – ४
२४. कृष्णदास जगदानंदनंदन
प्रतिष्ठान चरित्र. संपादक. र. हृ. कोटणीस.
२५. हाल सातवाहन
गाथा सप्तशती. संपादक स. आ. जोगळेकर
१९५६. प्रसाद प्रकाशन, पुणे.

**२. अर्वाचीन लेखकांचे ग्रंथ :**

२६. डॉ. वि. भि. कोलते
श्रीचक्रधरचरित्र (दु. आ.)
१९७७, अरुण प्रकाशन, मलकापूर.
२७. डॉ. वि. भि. कोलते
महानुभाव तत्त्वज्ञान (चौ. आ.)
१९७५ अरुण प्रकाशन मलकापूर.
२८. डॉ. य. खु. देशपांडे (कै ).
ऋद्धिपूर वर्णन
१९२९ आर्यसंस्कृती, पुणे.
२९. डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी (कै.)
नाथसप्रदाय
१९५० हिंदुस्थानी अॅकेडेमी. उ. प्र.
३०. डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी (कै.)
मध्यकालीन धर्मसाधना (चतुर्थ संस्करण)
१९७० साहित्य भवन इलाहाबाद.
३१. एकनाथ दर्शन खंड १ ला
१९५२, एकनाथ संशोधन मंदिर, औरंगाबाद

३२. सेतुमाधवराव पगडी
सूफी संप्रदाय
११५३. ग. पां. परचुरे प्रकाशन मंदिर मुंबई–४
३३. डॉ. वा. सी. बेंद्रे
तुकारामाची गुरुपरंपरा
मौज प्रकाशनगृह, मुंबई–४
३४. वा. सी. बेंद्रे
तुकारामाचे संत सांगाती
१९५८, मौज प्रकाशन गृह, मुंबई–४
३५. डॉ. रा. चिं. ढेरे.
विविधा
३६. डॉ. रा. चिं. ढेरे
श्रीगुरुगोरक्षनाथ चरित्र व परंपरा
३७. डॉ. रा. चिं. ढेरे
मुसलमान मराठी संतकवी
१९६७. ज्ञानराज प्रकाशन, पुणे
३८. डॉ. रा. चिं. ढेरे
दत्तसंप्रदायाचा इतिहास
३९. डॉ. रा. चिं. ढेरे
श्रीनृसिंह सरस्वती चरित्र व कार्य
४०. डॉ. रा. चिं. ढेरे
लोकसंस्कृतीची क्षितिजे
१९७१. विश्वकर्मा साहित्यालय, पुणे-३०
४१. डॉ. चंद्रबली पांडेय
तसव्वुफ अर्थात् सूफी मत.
१९४८. सरस्वती मंदिर, बनारस
४२. रामपूजन तिवारी
सूफीमत : साधना और साहित्य
१९५६. ज्ञानमंडल लिमिटेड, बनारस
४३. श्याममनोहर पांडेय.
सूफी–काव्य–विमर्श.
१९६८ विनोद पुस्तक मंदिर, आग्रा.

४४. प्र. न. जोशी
नाथसंप्रदाय
१९७७ राजीव प्रकाशन ग्रंथ प्रकाशक ठाणे – २
४५. यदुवंशी
शैवमत
४६. रा. ग. हर्षे
ज्ञानदेवी
१९४७ प्रकाशक रा. ग. हर्षे पुणे – ४
४७. पां. ना. कुलकर्णी
संशोधन–धारा
१९६७. व्हीनस प्रकाशन पुणे
४८. देवीसिंह चौहान
भारत – इराणी संस्लेष
१९७३. महाराष्ट्र राष्ट्र भाषा सभा पुणे ३०.
४९. ना. दि. मायी
शरनीरा.
१९७४. जावरकर बंधू, मालटेकडी अमरावती
५०. वि. ल. भावे
महाराष्ट्र–सारस्वत.
१९६३. पॉप्युलर प्रकाशन, मुंबई ३४
५१. श्रीनिवास दीक्षित.
१९६८ ( दु. आ. ) प्रकाशक, मीनाक्षी दीक्षित कोल्हापूर– १
५२. Dr. Shriniwas Ritti & G. C. Shelke
Inscriptions of Nanded District
1968 Yashwant College, Nanded
५३. डॉ. रा. चिं. ढेरे
चक्रपाणी
१९७७ विश्वकर्मा साहित्यालय, पुणे
५४. डॉ. वा. वि. मिराशी
शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख.
१९७४ विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर.
५५. गुलाम सरवर लाहोरी
खजानेयत–उल–अस्फीया

५६. डॉ. कोलते. वि. भि.
महानुभाव–संशोधन खंड १ ला.
१९६२ अरुण प्रकाशन, मलकापूर.

५७. डॉ. शं. गो. तुळपुळे
प्राचीन मराठी कोरीव लेख
१९६३. पुणे विद्यापीठ पुणे

५८. डॉ. शं दा. पेंडसे ( कै. )
भागवतोत्तम एकनाथ.
१९७१. नागपूर प्रकाशन. सीताबर्डी नागपूर.

५९. Louis Renou.
Religions of Ancient India
1953. Munshiram Manohardas Dehli.

६०. Dr. R. G. Bhandarkar
Shaivism, Vaishnavism and other minor Sects.

## ३· नियतकालिके

६१. युगवाणी.
६२. नवभारत.
६३. प्रतिष्ठान.
६४. विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक.
६५. महाराष्ट्र साहित्य पत्रिका.
६६. मराठी संशोधन पत्रिका.
६७. महानुभाव.
६८. Corpus Inscriptionum Indicarum.
६९. Epigraphia Indica.
७०. Annual Reports on South Indian Epigraphy.
७१. Epigraphia Carnatica.
७२. Indian Antiquary.
७३. नवनीत.
७४. Marathwada University Journal.
७५. भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक.

* *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२९६५
ग्रं. क्र. 23639
विषय १५।७।८३
शाखा (स्थळ)

**ब्रह्मानंद देशपांडे ह्यांचे इतर ग्रंथ**

REFBK-0023731

१. The Gupta Administration.

२. देवगिरीचे यादव
( महाराष्ट्र शासनाने उत्कृष्ट ग्रंथ – निर्मितीसाठी पारितोषिक देऊन गौरविलेला ग्रंथ )

३. शोधमुद्रा
( महाराष्ट्रातील शिलालेखांचे संशोधन आणि चिकित्सक अभ्यास )

४. शब्दवेध
( प्राचीन मराठी साहित्यातील शब्दांच्या अर्थाची चर्चा )

५. चक्रपाणि–चिंतन
( डॉ. रा. चिं ढेरे ह्यांच्या ' चक्रपाणि ' ह्या ग्रंथातील विवाद्य मतांचे सडेतोड खंडण )

६. भुत्तो–एक वादळ.

आगामी
मराठवाड्यातील ऐतिहासिक कथा

**परिचय प्रकाशनची दर्जेदार ग्रंथ-संपदा.**

१. बाहुलीचे डोळे – महावीर जोंधळे
बाल गीत संग्रह
( दुसरी आवृत्ती )

२. तुमचं – आमचं जग ( प्रौढ वाङमय )
चंद्रकान्त पांडव

३. आसवं गाळणारी कासवं
– महावीर जोंधळे यांची अद्‌भूत बालकादंबरी ( दुसरी आवृत्ती )

४. आनंद मेळा
बाबा भांड
बालकादंबरी

५. तीन शोध निबंध
– ब्रह्मानंद देशपांडे प्राचीन मराठी साहित्यातील कूटांचा उलगडा करणारा
दर्जेदार ग्रंथ

एक व्यासंगी आणि
साक्षेपी संशोधक म्हणून
ब्रह्मानंद देशपांडे
हे अल्पावधीतच महाराष्ट्रात
ख्यातनाम झालेले आहेत.

अचूक आणि तपशीलवार
माहिती साक्षेपी आणि काटेकोर
विवेचन ही त्यांच्या सिध्दहस्त
लेखणीची वैशिष्ट्ये.

प्राचीन मराठी साहित्य
संशोधनाच्या क्षेत्रात त्यांनी
अतिशय मोलाची भर घातली आहे.